पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
www.peoplespost.in

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ । अंक २३ वा । मूल्य : रु. ३० । दिनांक : १६ ते ३१ जुलै २०२२

# हिंदुत्व गरळ ओकतो भारत माफी मागतो



पाक्षिक समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ ।
अंक २३ । मूल्य : रु. ३० । दिनांक : १६ ते ३१ जुलै २०२२

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
गायत्री ग्राफिक्स्

**संपादकीय पत्रव्यवहार**
द पीपल्स पोस्ट कार्यालय
सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद – ४३१००१

**संपर्क**
८८८८५४१८२२ । ९५८८४५११५१

E mail : thepeoplespost2014@gmal.com

(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
* अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असलेच असे नाही.
* अंकातील कोणताही मजकूर पूर्वपरवानगी शिवाय वापरता येणार नाही.

**ऑनलाईन समन्वयक**
प्रतीक माधुरी

द पीपल्स पोस्ट | 8888541822

• **जाहिरात विभाग संपर्क**
९८२११४४५४०९ / ८८०५१५१४५२

अंकाची वार्षिक वर्गणी ६००/– रुपये फक्त

• **द पीपल्स पोस्ट बँक अकाऊंट डिटेल्स्**
द पीपल्स पोस्ट : SBI Bank
शाखा : समर्थनगर, औरंगाबाद
AC No. 37856373419
IFSC CODE : SBIN0007919
MICR No. : 431002010

ऑनलाईन पेमेंटसाठी येथे स्कॅन करावे

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष द पीपल्स पोस्ट या नावाने काढावा

**संपादकीय :** ... मनुची प्राणप्रतिष्ठा करणारे मुक्त विद्यापीठ बंदच करा – ३/ नवउदारमतवादाचा अंत होतोय; पुढे काय? – **रुटगर ब्रेगमॅन** – ५ / ‘हिंदुत्ववादी राजकारणाच्या पाऊलखुणा’ विषयी थोडे... – **प्रमोद मुजुमदार** – १४ / भटके विमुक्त जमाती : आरक्षण आणि जगण्याचे प्रश्न – **सुभाष वारे** – १८ / **इतना सन्नाटा क्यूं** – मौनाला धर्म असतो का? – **जयदेव डोळे** – २१ / **दिल्ली दरबार** – भाजप का जिंकतो, त्याला हरवणार कसे? – **विचक्षण बोधे** – २४ / अराजकाच्या गर्तेत श्रीलंका – **भास्कर नाशिककर** – २७ / मार्क्स – आंबेडकर संवाद चालू आहे – **डी. राजा, एन. मुथूमोहन** – ३१ / **मुलाखत** – तमाशा कलावंत शिरढोणकर – **डॉ. मोहन लोंढे** – ३४ / **ग्रंथ परिचय** – सुसंस्कारित करणारी काटेरी पायवाट – **डॉ. सतेज दणाणे** – ३६ / **आज–कालचे प्रश्न** – **पंक्चरवाला** – ३८ / **कविता** – जिथे तिथे – **श्रीपाद भालचंद्र जोशी** / बुद्ध – **सुधीर इंगळे** / नाटक – **डी.के. शेख** – ४३.

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक धम्मपाल भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए–४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. * संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. क्र. MAHMAR/2018/76460

संपादकीय

# मनुची प्राणप्रतिष्ठा करणारे मुक्त विद्यापीठ बंदच करा


महाराष्ट्राचे एक नवनिर्माते यशवंतराव चव्हाण यांच्या पुरोगामी विचारांचे जतन, संवर्धन करण्याच्या हेतूने त्यांचेच एक शिष्य शरद पवार यांनी नाशिकमध्ये मोठा गाजावाजा करत तेहतीस वर्षांपूर्वी स्थापन केलेल्या विद्यापीठात भारतात जातिव्यवस्था गच्च करण्यासाठी स्मृती तयार करणारा आणि वर्षानुवर्षे या व्यवस्थेत कोट्यवधी जनतेला गुलाम करणारा मनु अतिशय चलाखी करून शिरला. तो अभ्यासक्रमात घुसला आणि एका अर्थाने त्याची विधिवत प्राणप्रतिष्ठा झाली. जेव्हा प्राणप्रतिष्ठा होते तेव्हा त्याला विद्यापीठातून हलवता येत नाही. भारतीय राज्यघटनेतील धर्मनिरपेक्षतेला विरोध म्हणजे मनु... कल्याणकारी राष्ट्राला विरोध म्हणजे मनु, जात गच्च करण्याचे काम इमाने-इतबारे करणारा पुरुष म्हणजे मनु आणि मूठभर उच्चवर्णीयांच्या सत्तेला आशीर्वाद देणारा मनु. तो तेहतीस वर्षांपूर्वी पुतळ्याच्या रूपाने जयपूरच्या उच्च न्यायालयासमोर उभा राहिला आणि 'कोई है माई का लाल मुझे हटानेवाला' असे आव्हान त्याने दिले. ते देशातल्या, महाराष्ट्रातल्या पुरोगामी सरकारला आणि आम्ही क्रांतिकारी आहोत, असा दावा करणाऱ्या समाजालाही स्वीकारता आले नाही.




पुढे मनुवाद्यांची सत्ता राज्यात आणि केंद्रात अधूनमधून येत राहिली. अनेक ठिकाणी म्हणजे देशातील शिक्षण, संस्कृती, जाती येथे मनुची प्राणप्रतिष्ठा सुरू झाली. पुतळ्यातील मनु सत्ताधाऱ्यांच्या मदतीनेच प्रवास करत अनेक विद्यापीठांत, शाळा-हायस्कूलच्या क्रमिक पुस्तकांत आणि धर्म सभांमधून प्रवास करत करत नाशिकच्या मुक्त विद्यापीठात पोहोचला. ज्ञानगंगा घरोघरी हे ब्रीद पोहोचवणाऱ्या विद्यापीठाला आपण मनुस्मृती घरोघरी पोहोचवतोय आणि संविधानाचाही अपमान करतोय, याची लाज कधी वाटली नाही. एक-दोन नव्हे तर तब्बल वीस वर्षे बी.ए. तृतीय वर्षाच्या राज्यशास्त्राच्या पुस्तकात त्यांनी मनुला जागा दिली. दादोजी कोंडदेव आणि कोणी समर्थ संत यांना छत्रपती शिवाजी महाराजांबरोबर जोडले. गंमत म्हणजे या कालावधीत कुणीच याकडे लक्ष दिले नाही. या कालावधीत दोन-तीन लाख पोरे मनुस्मृतीचा अभ्यास करून पास झाली. समाजाच्या मुख्य प्रवाहात आली. एका अर्थाने दोन-तीन पिढ्यांना सडलेल्या भूतकाळात नेण्यात आले. ब्रह्मचारी काय, कौटिल्य काय किंवा मनु काय, हेच त्यांच्या अभ्यासाचे विषय झाले.

समर्थांना आणणाऱ्यांना या पुस्तकात फुले-शाहू-आंबेडकरांना जागा द्यावीशी वाटली नाही. 'हू वेअर शूद्राज्' असा इतिहास लिहिणाऱ्या डॉ. बाबासाहेबांचा एखादा परिच्छेद या पुस्तकात टाकावा, असे वाटले नाही. त्याऐवजी मनुस्मृतीचे सामाजिक महत्त्व काय, असा प्रश्न अनेकदा विचारण्यात आला. मनु हा अभ्यासक्रमाचाच भाग बनवल्याने तो अवतरणारच होता. दादोजी कोंडदेव आणि आणि समर्थांमुळे छत्रपती शिवाजी महाराज घडले, हे रेटून सांगण्यात आले. त्याविरुद्धही कोणी आवाज उठवला नाही आणि उठवला नाही म्हणून

मनू चालत राहिला, धावत राहिला.




प्रतिक्रांतीचा मार्ग वेगवेगळ्या ठिकाणांहून जात असतो. त्यात शिक्षण हे एक महत्त्वाचे आणि सोयीचे ठिकाण असते. ते नवे कारभारी आणि हिंदुत्ववादी सहज वापरतात. मूलतत्त्ववादाचा, धर्मनिरपेक्षतेला नाकारणारा, धर्माचा पाळणा जोरात हलवणारा एखादा धडा पुस्तकात नेला, की यांचे काम सोपे होते. कोट्यवधी पोरांच्या मेंदूत हा विषय बसतो. त्यांच्या पालकांच्या आणि खिचडीवर पोरे गोळा करणाऱ्यांच्या डोक्यातही हा विषय बसतो. गंज सुरू होते. आताही तसेच होते. मनुचे सामाजिक काम काय सांगायचे? ब्राह्मण ब्रह्माच्या मुखातून आला? स्त्रिया पापयोनी आहेत? शूद्रांना ज्ञानाचा आणि प्रतिष्ठेचा अधिकार नाही? शूद्रांनी सतत गुलाम होऊन वरच्यांची विनामोबदला सेवा करायची? जाती समाजपुरुषाचे अवयव आहेत? काय सांगायचे या मनुविषयी? मनुस्मृती ही समाजाला, धर्माला लागलेली एक कीड आहे. म्हणून म. फुल्यांनी तिला विरोध केला. शाहू महाराज वेदोक्त प्रकरणात लढले आणि डॉ. बाबासाहेबांनी १९२७ ला ती महाडमध्ये जाळूनच टाकली. मनुस्मृती म्हणजे स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि जातीतील समाज खाऊन टाकणारी एक व्यवस्था आहे. शिक्षण क्षेत्राने मनुस्मृती शिकवून काय साध्य केले, असा प्रश्न उद्या कोणी विचारला, तर जीर्णमतवादी समाज घडवण्यास मदत केली, असे त्याचे उत्तर देता येईल. पाद्यपूजेचे एक नवे साधन तयार केले असे म्हणता येईल.

वीस वर्षांनी मुक्त विद्यापीठाच्या पुस्तकातील हा मनुवाद एआयएसएफ, छात्र भारती आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या लक्षात आला. त्यांनी आंदोलने केली. आंदोलनावर विद्यापीठातील प्रभारी असलेल्या आणि नसलेल्या पांढऱ्या हत्तींनी दिलेले उत्तर आणखी संतापजनक आणि निर्लज्जपणाचे आहे. हे कसे झाले हे आम्हाला ठाऊक नाही, असे सांगत वातानुकूलित कॅबिनमध्ये बसून नाजूक झालेली आपली चामडी सांभाळण्याचा त्यांनी प्रयत्न केला. एक पुस्तक वीस वर्षे चालते, कालबाह्य होऊनही चालते, हेच विद्यापीठातील बड्या धोंडांना ठाऊक नसेल, तर त्यांनी नोकरीत राहण्यात तरी काय अर्थ. आपल्याकडून संविधानविरोधी कृत्य केले गेले, मनु चालवणे म्हणजे राज्यघटनेतील धर्मनिरपेक्षतेला नख लावणे, हे थर्ड क्लास विषयावर आणि त्यातही विद्यापीठाशी संबंधितच विषयावर पीएच.डी. मिळवून पात्रतावान होणाऱ्यांना कसे काय कळले नाही? या सर्वांविरुद्धच संविधान विद्रोहाचा गुन्हा दाखल करायला पाहिजे. कोणी गाईविषयी, धर्माविषयी 'ब्र' काढला, तर तो राष्ट्रद्रोही ठरवला जातो, मग विद्यापीठातील पांढऱ्या हत्तीचे आणि सहावा-सातवा वेतन आयोग स्वंथ करणाऱ्यांचे काय करायचे? यावरही विद्यार्थी संघटनांना आणि भल्या समाजाचे स्वप्न पाहणाऱ्यांनी प्रश्न विचारायला पाहिजेत. या निमित्ताने विद्यापीठाचे 'दूध का दूध, पानी का पानी' करण्याची वेळ आली आहे. स्वायत्ततेच्या नावाखाली कोणी मनु चालवत असेल, तर या स्वायत्ततेचाच फेरविचार करायला पाहिजे. काही अपवाद वगळता या विद्यापीठाला उजव्या विचारांचेच कुलगुरू अधिक लाभले आहेत. असे कुलगुरू, की जे घरोघरी कधीच दिसले नाहीत. स्वतःऐवजी त्यांनी मनुच घरोघरी सोडून दिला. अनेक वर्गांसाठी पुस्तके न तयार करू शकलेल्या, कॉपी करून पास करण्याची हमी देणाऱ्या, उत्तरपत्रिका नीट न तपासता फर्स्ट क्लासची गॅरन्टी, वॉरन्टी देणाऱ्या आणि समाज व विद्यार्थ्यांची मानसिक-बौद्धिक पिळवणूक करून गल्ला जमवणाऱ्या, एकाच कुटुंबातील अनेकांना मुक्त नोकऱ्या देणाऱ्या, महत्त्वाच्या महापुरुषांची अध्यापने नावापुरती चालवणाऱ्या, एकेकाला अनेक पुस्तके लिहिण्याचे जणू काही कंत्राट देणाऱ्या, समाजापासून तुटून कुठे तरी ओढ्याकाठी चंगळवादी संसार मांडणाऱ्या या विद्यापीठाची गरजच काय, कसा प्रश्न समाजाने उपस्थित केल्यास विद्यापीठ काय उत्तर देईल? बघतो, पाहतो, आम्हाला ठाऊक नव्हते, अशीच कातडीबचाव उत्तरे असतील. समाजाच्या करातून अशी विद्यापीठे चालतात; पण ती नीट चालणार नसतील, तर बंद केलीलीच बरी. ज्ञानगंगा घरोघरी नाही, तर मोजक्या लोकांच्या बाटलीत गेलीय. मुळात ज्ञानगंगा अवतरलीच नाही, तर धनगंगा आणि मनुगंगा अवतरलीय. विद्यापीठ याची गांभीर्याने दखल घेणार नाही. तसे असते, तर वीस वर्षांपासून ही चूक लक्षात आलीच नसती, असे घडलेच नसते.

आता मुक्त विद्यापीठ कोणता इतिहास, कोणते साहित्य शिकवते बघा. एकूण काय, तर एखादी शहाणी कमिटी बसवून या साऱ्यांचेच स्कॅनिंग केल्यास आणखी बऱ्याच भानगडी बाहेर येतील. त्या-त्या विभागात राहून, मोठ्या खुर्चीत ढुंगण टेकवूनही आम्हाला काहीच ठाऊक नाही म्हणणाऱ्यांना पहिल्यांदा बाहेर पडायला सांगा. इतकी वर्षे पगार आणि पद कशासाठी घेतले हे विचारा. नव्या पिढीचा आणि समाजाचा मेंदू सडका बनवणे, हे सर्वांत मोठे अघोरी कृत्य आहे. याला कोणीच जबाबदार नाही का? समाजातल्या साऱ्याच क्रांतिकारी गोष्टींवर खोट्या इतिहासाचे पांघरूण घालणे गैर नाही का? समाजाने समोर येऊन विचार करावा आणि भावी पिढीचे आणखी नुकसान होणार नाही यासाठी वर्गणी काढून एक गोदरेजचे कुलूप विकत घेऊन ते विद्यापीठाकडे द्यावे. ज्ञानदान केंद्रांना, समाज घडवणाऱ्या केंद्रांना वाळवी लागणे किंवा वाळवीसाठी अशा केंद्रांनी स्वतःच खाद्याची कोठारे उघडणे केवळ गैर आणि गैर असते. निमित्त मनुचे असले तरी त्यानिमित्ताने विद्यापीठाची खरी-खोटी वस्त्रे तपासण्याची वेळ आली आहे. ती दवडता कामा नये. विद्यापीठाने दिलेल्या आश्वासनांवर विसंबून राहता कामा नये. मनु नसलेली प्रश्नपत्रिका काढून या विषयाची नव्याने परीक्षा घेतली, तरच विद्यापीठाने जन्माला घातलेल्या रांजणभर पापातील एक थेंब कमी होईल. बाकी रांजण संपवण्यासाठी रांजण जन्माला घालून तो सतत टिकवून धरणारे विद्यापीठच बंद करावे लागेल. ●●●

# नवउदारमतवादाचा अंत होतोय ; पुढे काय?

**मागील ४० वर्षे वर्चस्व गाजवणारी विचारधारा अस्तंगत होत आहे. तिची जागा कोण घेईल? कोणालाही हे निश्चितपणे सांगता येत नाही. याची कल्पना करणे कठीण नाहीये, की हा पेचप्रसंग आपणाला यापेक्षाही अधिक गडद अंधाऱ्या मार्गावर घेऊन जाईल. राज्यकर्ते अधिक सत्ता हस्तगत करण्यासाठी त्याचा वापर करतील. ते त्यांच्या जनतेच्या स्वातंत्र्यावर मर्यादा घालतील आणि वंशवाद व द्वेषाच्या ज्वालांना भडकवतील; परंतु परिस्थिती भिन्न असू शकते. गोष्टी बदलू शकतात. आपण इतर मार्गानेसुद्धा कल्पना करू शकतो.**



**रूटगर ब्रेगमॅन**

काही लोकांना असे वाटते, की या 'कोविड-१९' महामारीचे राजकीयीकरण करू नये. हे असे करणे म्हणजे आपण स्वतःबरोबर आहोत या वातावरणात वावरण्यासारखे आहे. हे असे वागणे म्हणजे एखाद्या कट्टर धार्मिक नेत्याने हा देवाचा प्रकोप आहे किंवा हा 'चायनीज व्हायरस' आहे, असे म्हणून लोकांना घाबरवून टाकणे किंवा कल कसा आहे, हे पाहून आपण सर्व जण प्रेम, काळजी, जागरूकता यांच्या नवीन युगात प्रवेश करत आहोत आणि जिथे सर्वांसाठी पैसे मोफत असतील, अशी भविष्यवाणी करण्यासारखे आहे. जगात असेही काही लोक आहेत. ज्यांना असे वाटते, की आता बोलण्याची खरंच वेळ आली आहे. आता बोललेच पाहिजे. आता या क्षणाला जे निर्णय घेतले जात आहेत, त्यांचे भविष्यात दूरगामी परिणाम होतील किंवा ओबामांच्या कर्मचारीवर्गाच्या प्रमुखाने सन २००८ मध्ये लेहमन ब्रदर्सच्या दिवाळखोरीनंतर एक वक्तव्य केले होते. ते म्हणाले, की 'एखादा गंभीर प्रेचप्रसंग वाया जाऊ नये, असे तुम्हाला कधीही वाटणार नाही.'

सुरुवातीच्या काही आठवड्यांमध्ये माझा नाही म्हणणाऱ्यांच्या बाजूने राहण्याचा कल होता. मी यापूर्वी प्रेचप्रसंग संधी निर्माण करतात याबद्दल लिहिले होते; परंतु आता हे क्लृप्तीविहीन अगदी अपमानास्पद वाटायला लागले आहे. त्यानंतर आणखी बरेच दिवस गेले. हळूहळू असे दृष्टीस यायला लागले, की पेचप्रसंग काही महिने, एखादे वर्ष किंवा त्यापेक्षाही जास्त कालावधी लांबणार आहे आणि एखादे दिवशी हे सगळे तात्पुरत्या कालावधीसाठी लादलेले प्रेचप्रसंग विरोधी उपाय कायमस्वरूपी बस्तान मांडून बसतील. आपल्या पुढ्यात काय मांडून ठेवलंय हे कोणालाही माहीत नाही; परंतु हे नेमके अशामुळे, की आपल्याला माहीत नाही. भविष्य अत्यंत





अनिश्चित आहे. आपण याविषयी बोललं पाहिजे.

**लाट वळत आहे**

४ एप्रिल २०२० रोजी ब्रिटनस्थित फायनान्शिअल टाइम्सने एक संपादकीय प्रकाशित केले, जे येणाऱ्या काही वर्षांमध्ये इतिहासकार उद्धृत करतील, यात शंका नाही. फायनान्शिअल टाइम्स हे जगातील आघाडीचे व्यापारी वृत्तपत्र आहे; परंतु प्रामाणिकपणे सांगायचे झाल्यास हे वृत्तपत्र अगदीच पुरोगामी विचारांचे नाहीये. वैश्विक

राजकारण आणि भांडवल यामधील सर्वांत धनाढ्य व सर्वशक्तिमान लोकांकडून हे वृत्तपत्र वाचले जाते. प्रत्येक महिन्याला हे वृत्तपत्र निर्लज्जपणे ''how to spend it'' (खर्च कसा करावा) असे शीर्षक असलेली मासिक पुरवणी जहाज, महल, घड्याळे आणि कार याविषयी प्रकाशित करत असते; परंतु या संस्मरणीय शनिवारच्या सकाळी या वृत्तपत्राने हे प्रकाशित केले, ''पुरोगामी सुधारकांना... मागील चार दशकांतील रूढ असलेल्या योजनेच्या दिशेला विरुद्ध दिशेने वळवत आहेत... ठेबलावर ठेवणे गरजेचे आहे. सरकारांनी अर्थव्यवस्थेमध्ये अधिक सक्रिय भूमिका स्वीकारण्याची गरज आहे. त्यांनी सार्वजनिक सेवांकडे एक उत्तरदायित्व म्हणून न पाहता एक गुंतवणूक म्हणून पाहिलेच पाहिजे आणि त्यांनी कामगार बाजाराला कमी असुरक्षित करण्यासाठी नवीन मार्ग शोधले पाहिजेत. अजेंड्यावर पुनर्वितरण पुन्हा येईल. ज्येष्ठ नागरिक आणि श्रीमंत लोकांना दिलेल्या विशेषाधिकार यांच्यावर प्रश्नचिन्ह उठेल. पायाभूत उत्पन्न आणि संपत्तीवरील कर अशा आजपर्यंत विचित्र गणल्या गेलेल्या योजनांची सरमिसळ होईलंच?''

इथे हे काय चालले आहे? भांडवलदारांचे हे व्यासपीठ हे असे अचानकपणे अधिक पुनर्वितरण, मोठी सरकारे आणि अगदी मूळ उत्पन्नाची कशी काय वकिली करायला लागले आहे? अनेक दशके ही संख्या छोटे सरकार, कमी कर, मर्यादित सामाजिक सुरक्षितता अशा भांडवलवादी नमुन्याच्या मागे खंबीरपणे उभी राहिली किंवा जवळजवळ टोकदार कडांनी बंदिस्त राहिली.

''मी तहहयात तिथे काम केले आहे. फायनान्शिअल टाईम्सने मानवी चेहरा असलेल्या मुक्त व्यापारी भांडवलवादाची वकिली केली आहे. संपादकीय मंडळाने आपणाला या स्वरूपात मोठी नवीन दिशा दिली आहे. असा त्या वृत्तपत्रासाठी सन १९८६ पासून लिहिलेल्या पत्रकाराने प्रतिसाद दिला. ''





त्या संपादकीयमध्ये या सगळ्या कल्पना केवळ आकाशातून आलेल्या नाहीत. त्यांनी खूप दीर्घ अंतराचा प्रवास केला आहे. काठापासून ते मध्यभागापर्यंतचा हा प्रवास झालेला आहे. हा प्रवास अराजकी, अशांत शहरांपासून ते प्राइम टाइम टॉक शोज आणि संदिग्ध ब्लॉग्जपासून ते फायनान्शिअल टाइम्सपर्यंतचा राहिलेला आहे आणि आता दुसऱ्या महायुद्धापासूनच्या सर्वांत मोठ्या पेचप्रसंगामध्ये त्या कल्पना जगाला बदलवून टाकतील. आपण इथे कसे पोहोचलो, हे समजून घेण्यासाठी आपल्याला इतिहासामध्ये एक पाऊल मागे जावे लागेल. आता याची कल्पना करावयास आपणाला कठीण जाईल. साधारणपणे ७० वर्षांपूर्वी असा एक काळ होता, ज्यावेळी मूलगामीवाद्यांनी मुक्त व्यापारी भांडवलाची बाजू घेतली. त्यांनी त्यांचं संरक्षण केले.

सन १९४७ मध्ये स्वित्झर्लंडमधील माँट पेलेरिन या खेडेगावात एक छोटा विचार गट स्थापन करण्यात आला होता. ही माँट पेलेरिन सोसायटी स्वयंघोषित 'नवउतारमतवादी' लोकांची मिळून बनली आहे. त्यामध्ये फ्रेडरिक हायेक यांच्यासारखे तत्त्वज्ञ आणि मिल्टन फ्राईडमन यांच्यासारख्या अर्थतज्ज्ञांचा समावेश होता. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या त्या दिवसांमध्ये अनेक राजकारण्यांनी आणि अर्थतज्ज्ञांनी ब्रिटिश अर्थतज्ज्ञ आणि भक्कम राज्याचा पुरस्कर्ता असलेल्या जॉन मेयर्ड केन्स यांच्या अधिक कर आणि मजबूत सामाजिक सुरक्षितता जाळे/यंत्रणेचा स्वीकार केला. नवउदारमतवादी लोकांना विरोधाभासाने अशी भीती वाटली, की उद्याला येणारी राज्ये एका नवीन प्रकारच्या जुलूमशाहीस प्रारंभ करतील, म्हणून मग त्यांनी बंड केले. आपणास खूप दीर्घ पल्ल्याचा प्रवास करावयाचा आहे, हे माँट पेलेरिन सोसायटीच्या सभासदांना ठाऊक होते. नवीन विचारांना रुजण्यासाठी 'साधारणपणे एक पिढी किंवा त्यापेक्षाही जास्त कलावधी' लागत असतो आणि त्यामुळेच... आपला वर्तमान विचार हा घटनांना प्रभावित करण्यासाठी खूपच दुबळा पडतो आहे असे दिसते, असे हायेकने नमूद केले.

फ्राईडमनलासुद्धा असेच वाटत होते. ते म्हणतात, ''आज देशाला चालविणारे लोक दोन दशकांपूर्वीच्या बुद्धिजीवी वातावरणास प्रतिबिंबित करतात... जेव्हा ते लोक महाविद्यालयात शिक्षण घेत होते.'' ते म्हणतात, की अनेक लोकांच्या मूलभूत कल्पना त्यांच्या किशोरावस्थेमध्येच विकसित होत असतात. हे विशद करते, की कशामुळे किंवा कोणत्या कारणामुळे जुने सिद्धांत आजच्या राजकीय जगामध्ये काय घडत आहे यावर अजूनही वर्चस्व गाजवताना दिसतात.

फ्राईडमन हा मुक्त व्यापार तत्त्वांचा पुरस्कार करणारा एक इव्हन्जेलिस्ट होता. त्याचा स्वहित संबंधाच्या प्राथमिकतेवर विश्वास होता. समस्या कोणतीही असली तरी त्यासाठी त्याचा उपाय साधा होता : सरकारला बाहेर काढा, व्यापार चिरायु होवो किंवा दुसऱ्या शब्दांत सांगायचे, तर सरकारने प्रत्येक विभागाला व्यापारी स्थानामध्ये रूपांतरित करावे. म्हणजे अगदी आरोग्य सुविधांपासून ते शिक्षणाच्या सगळ्या यंत्रणांचे व्यापारीकरण करावे. गरज पडल्यास सरकारने बळाचा वापर करावा. अगदी नैसर्गिक आपत्तीमध्येदेखील स्पर्धात्मक कंपन्यांनीच आधार सुविधांचे आयोजन करण्याचे नेतृत्व

करावे. फ्राईडमनला माहीत होते, की तो मुख्य धारेपासून फार दूर अंतरावर थांबला होता; परंतु त्यामुळे त्यास ऊर्जा मिळाली. सन १९६९ मध्ये टाइम मासिकाने या अमेरिकन अर्थतज्ज्ञाचा गौरव केला व त्यास असे वैशिष्ट्यीकृत केले, की ''हा पॅरिसचा डिझायनर आहे, ज्याचे महागडे फॅशनेबल कपडे काही ठराविक लोकच खरेदी करतात; परंतु असे असले तरीही हा डिझायनर जवळपास सगळ्याच लोकप्रिय फॅशन्सना प्रभावित करतो.''




फ्राईडमनच्या विचारांमध्ये प्रेचप्रसंगी मध्यवर्ती भूमिका पार पाडली. त्याच्या 'भांडवल आणि स्वातंत्र्य' (Capital And Freedom) १९८२) या पुस्तकाच्या प्रस्तावनेमध्ये त्याने अतिशय प्रसिद्ध असणारे पुढील शब्द लिहिले, ''केवळ प्रेचप्रसंगच – वास्तविक किंवा जाणवलेले – खरा बदल घडवतात. जेव्हा ते प्रेचप्रसंग उद्भवतात – तेव्हा ज्या कृती केल्या जातात त्या अवतीभोवतीच्या कल्पनांवर अवलंबून असतात.'' आपल्या अवतीभोवतीच्या कल्पना विखुरलेल्या असतात, फ्राईडमनच्या मते, पेचप्रसंगामध्ये जे काही घडते ते सगळे आपण जो पाया घातला आहे किंवा आपण जे ग्राउंडवर्क केले आहे, त्यावर अवलंबून असते. तेव्हा कल्पनांना एकदाचा अवास्तविक किंवा अशक्य म्हणून बाहेरचा रस्ता दाखविला, की मग त्या फक्त अटळ बनण्याची शक्यता असते आणि हुबेहूब असेच घडले. सन १९७० च्या दशकामधील पेचप्रसंगादरम्यान (आर्थिक संकोच, चलनवाढ आणि ओपेक खनिज तेल मनाईहुकूम) नवउदारमतवादी विचार तयार होते आणि ते पंख फुटण्याची वाट पाहत होते. इतिहासकार ॲन्गस बरगिन निष्कर्ष स्वरूपात म्हणतात, एकत्रितपणे त्यांनी वैश्विक योजना रूपांतरणाला घडविण्यास मदत केली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड रिगन आणि ग्रेट ब्रिटेनच्या पंतप्रधान मार्गारेट थॅचर यांच्यासारख्या परंपराप्रिय नेत्यांनी हायेक आणि फ्राईडमनच्या कधी काळी मूलगामीवादी असणाऱ्या कल्पनांचा अंगीकार केला आणि नंतरच्या कालावधीत बिल क्लिंटन आणि टोनी ब्लेअर अशा त्यांच्या राजकीय विरोधकांनी त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवले.

मग एकापाठोपाठ एक संपूर्ण जगभरामध्ये राज्याच्या मालकीच्या उद्योगधंद्यांच्या खासगीकरणाचा सपाटाच सुरू झाला. कामगार संघटनांवर बंधने घातली गेली. त्यांचे पंख छाटण्यात आले. सामाजिक फायदे बंद करण्यात आले. रिगनने त्यावेळी इंग्रजी भाषेतील सर्वांत भयानक असे नऊ शब्द उच्चारले होते. ते म्हणाले, 'मी सरकारकडून आलो आहे आणि मी इथे मदत करण्यासाठी आहे.' सन १९८९ मध्ये कम्युनिझमचा पाडाव झाल्यानंतर अगदी सामाजिक लोकशाहीवाद्यांचादेखील सरकारमधील विश्वास उडाल्याचे दिसून आले.

सन १९९६ मध्ये राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांनी संघराज्याला उद्देशून जे भाषण केले होते त्यात ते म्हणाले, की 'आता मोठ्या सरकारचे युग संपले आहे.'

नवउदारमत विचार गटांकडून ते पत्रकारांपर्यंत आणि पत्रकारांपासून ते राजकारण्यांपर्यंत पसरला. एखाद्या विषाणूप्रमाणे त्याने सगळ्या लोकांना संक्रमित केले. सन २००२ मध्ये एका रात्रीच्या भोजनप्रसंगी आपली सर्वांत श्रेष्ठ अशी उपलब्धी म्हणून आपण कशाकडे पाहता, असा प्रश्न मार्गारेट थॅचर यांना विचारण्यात आला. त्यांचे उत्तर काय असावे? 'टोनी ब्लेअर आणि नवीन श्रमिक. आम्ही आमच्या प्रतिस्पर्ध्यांना त्यांचे मन बदलवण्यासाठी भाग पाडले.'

**आणि मग त्यानंतर २००८ आले**

१५ सप्टेंबर २००८ रोजी अमेरिकेतील बँक लेहमन ब्रदर्सने आर्थिक मंदी (ग्रेट डिप्रेशन) नंतरच्या सर्वांत वाईट अशा आर्थिक पेचप्रसंगाला मोकाट सोडले. जेव्हा तथाकथित 'मुक्त' व्यापाराला वाचविण्यासाठी मोठ्या सरकारी आर्थिक मदतीची (बेल आउटची) गरज पडली तेव्हा त्याने नवउदारमतवाद कोसळत असल्याचा इशाराच दिला आणि तरीही, २००८ वर्षाने एक ऐतिहासिक वळण बिंदू म्हणून नोंद केली नाही. एका देशापाठोपाठ दुसऱ्या देशाने त्यांच्या डाव्या विचारांच्या राजकारण्यांना पराभूत केले. शिक्षण, आरोग्य सेवासुविधा आणि सामाजिक सुरक्षितता यांच्यावर मोठे खोलवर आघात झाले. अगदी समानतेमधील अंतर वाढले आणि वॉल स्ट्रीटवरील बोनसने विक्रमी उच्चांक गाठला.

फायनान्शिअल टाइम्सने आर्थिक संकटानंतर एका वर्षाने 'हाऊ टू स्पेण्ड इट' (खर्च कसा करावा) ही आरामदायी जीवनशैली मासिकाची ऑनलाइन आवृत्ती प्रकाशित केली होती.

१९७० च्या पेचप्रसंगीची तयारी करण्यासाठी नवउदारमतवाद्यांनी अनेक वर्षे खर्ची घातली होती. आता त्यांच्या समोरील आवाहनकर्ते रिकाम्या हाताने उभे होते. अनेकदा त्यांना केवळ एवढेच माहीत होते, की ते कोणाच्या विरुद्ध होते. ते सामाजिक हितसंबंध वा कल्याणकारी योजनांवर पैसे खर्च करण्याच्या विरुद्ध उभे होते. ते पायाभूत सोयी-सुविधांच्या विरुद्ध उभे होते; परंतु कार्यक्रम काय होता? हे पुरेसे स्पष्ट नव्हते, की ते कोणासाठी होते? आता १२ वर्षांनंतर पेचप्रसंगाने पुन्हा आघात केला आहे. हा आघात अधिक विध्वंसकारी, अधिक धक्कादायक आणि अधिक प्राणघातक आहे. ब्रिटिश केंद्रीय बँकेनुसार १७०९ च्या हिवाळ्यापासून युनायटेड किंगडम हे मोठ्या आर्थिक मंदीच्या पूर्वसंध्येवर उभे आहे. फक्त तीन आठवड्यांच्या अवकाशामध्ये युनायटेड स्टेटस्‌मधील १७ दशलक्ष लोकांनी आर्थिक आघात रकमेसाठी अर्ज केला होता. २००८

मधील आर्थिक पेचप्रसंगामध्ये देशाला या संख्येची अगदी अर्धी संख्या गाठण्यासाठी संपूर्ण दोन वर्षे लागली.

२००८ च्या पेचप्रसंगाच्या विरुद्ध पाहता कोरोना विषाणू पेचप्रसंगाचे कारण स्पष्ट आहे. आपल्यापैकी अनेकांना 'अप्रत्यक्ष ऋण दायित्व' (Collateralized Debt Obligations) किंवा 'क्रेडिट डिफॉल्ट स्वॅप्स' (असा एक आर्थिक करार ज्यानुसार रोख्यांच्या स्वरूपात कॉर्पोरेट किंवा सार्वभौम ऋण खरेदीदार संभाव्य तोटा दूर करण्याचा प्रयत्न करतो.) काय होते याचा काहीच सुगावा नव्हता; परंतु आपणा सर्वांना हा विषाणू काय आहे, याची माहिती आहे. २००८ नंतर दिशाहीन बँकर्सनी हा दोष कर्जधारकांवर स्थानांतरित करण्याचा प्रयत्न केला; परंतु ही युक्ती आज स्वीकारली जाणार नाही. लोक त्यास स्वीकारणार नाहीत; परंतु २००८ साली आज यामधील सर्वांत महत्त्वपूर्ण भेद काय आहे? तर तो भेद आहे, बौद्धिक पायाभूत काम. आपल्या अवतीभोवती कल्पना असतात. जर फ्राईडमनबरोबर असते आणि पेचप्रसंग असंभवनीयतेला अटळ बनवते, अशा वेळेला इतिहास एक खूपच भिन्न वळण घेऊ शकेल. त्याची जास्त शक्यता असते.

**२. तीन धोकादायक फ्रेंच अर्थतज्ज्ञ**

ऑक्टोबर २०१९ मध्ये अति उजव्या वेबसाइटने एक ठळक बातमी दिली. ती अशी होती, 'तरुण लोकांच्या अर्थव्यवस्था आणि भांडवलाबद्दलच्या दृष्टिकोनावर तीन अति डाव्या अर्थतज्ज्ञांचा प्रभाव.' हा अशाच कमी खर्चिक ब्लॉग्जपैकी एक होता, जे खोट्या बातम्या पसरविण्यामध्ये फारच मोठी प्रगती करतात; परंतु या तीन फ्रेंच अर्थतज्ज्ञांच्या प्रभावाबद्दल असलेल्या या शीर्षकाने अगदी बरोबर अशी गोष्ट सांगितली.

मला आठवते, की त्या तीन अर्थतज्ज्ञांपैकी एकाचे नाव पहिल्यांदा माझ्या वाचण्यात आले. त्यांचे नाव होते थॉमस पिकेटी. सन २०१३ च्या शरद व शिशिर ऋतूचा तो काळ होता आणि मी अर्थतज्ज्ञ ब्रॅन्को मिलानोविकचा ब्लॉग वाचत होतो. मी नेहमीच त्याचा ब्लॉग वाचत असतो. कारण त्याची त्याच्या सहकाऱ्यांवरील तीव्र शब्दांतील टीका फारच मनोरंजन करणारी होती; परंतु या विशिष्ट ब्लॉगमध्ये मिलानोवीकने अचानकपणे खूपच भिन्न असा सूर लावला होता. त्याने नुकतेच फ्रेंच भाषेतील ९७० पानांचे एक जाडजूड पुस्तक वाचून पूर्ण केले होते आणि तो त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव करत होता. तो त्याची प्रशंसा करताना म्हणाला, 'आर्थिक विचारामधील युग निर्माण करणारे.' हो... असेच वाक्य त्याने त्याच्या ब्लॉगमध्ये वापरले होते.

मिलानोविक हा खूप वर्षे अशा फार कमी अर्थतज्ज्ञांपैकी एक होता, ज्याने असमानतेमधील संशोधनात फारच थोडा रस घेतला होता. त्याचे अनेक सहकारी तर त्या विषयाला स्पर्शदेखील करत नसत. सन २००३ मध्ये नोबेल विजेते रॉबर्ट लुकास यांनी असा दावा केला होता, की वितरणाच्या प्रश्नांमधील संशोधन हे 'निरोगी अर्थशास्त्रासाठी फारच घातक आहे.' दरम्यानच्या कालावधीत पिकेटीने अगोदरच पायाभूत काम करण्यास सुरुवातदेखील केली होती. सन २००१ मध्ये त्याने समजण्यास अत्यंत कठीण, अस्पस्ट असे एक पुस्तक प्रकाशित केले. त्यामध्ये त्याने समाजातील अगदी उच्चस्तरीय अशा १ टक्का लोकांच्या उत्पन्नाचा हिस्सा दाखविणारा एक आलेख सादर केला. असा हा आलेख त्याने पहिल्यांदाच वापरला होता. फ्रेंच त्रयींमधले क्रमांक दोनचे सहकारी अर्थतज्ज्ञ इमॅन्युअल सावेझ यांच्यासोबत पिकेटी यांनी त्यानंतर असे दाखवून दिले, की आज अमेरिकेतील असमानता १९२० मधील असमानतेएवढी उंच गेलेली आहे. अमेरिकेत १९२० च्या दशकामध्ये असमानतेचा आलेख फार मोठ्या प्रमाणावर वाढला होता. पिकेटीच्या या अकादमिक कामाने 'वॉल स्ट्रीटचा कब्जा करा' या आंदोलनाला प्रेरणा दिली. लोकांचा आक्रोश रस्त्यावर आला. आंदोलनकर्त्यांनी घोषणा केली, 'आम्ही ९९ टक्के आहोत.'


सन २०१४ मध्ये पिकेटीने जगात वादळ उठविले. हा प्रोफेसर 'रॉक स्टार अर्थतज्ज्ञ' झाला. त्यामुळे अनेकांची निराशा झाली. फायनान्शिअल टाइम्स टीका करण्यात अग्रस्थानी होते. पिकेटीने स्वतःची रेसिपी पत्रकारांसोबत आणि राजकारण्यांसोबत शेअर करण्यासाठी जगाचा दौरा केला. त्याच्या रेसिपीमध्ये कोणते घटक होते? अनेक कर हा त्याच्या रेसिपीमधला घटक होता. यामुळे




आपणास फ्रेंच त्रयींमधला तिसऱ्या क्रमांकाचा तरुण अर्थतज्ज्ञ ग्रॅबिएल झुकमॅन याच्या वैशिष्ट्याची ओळख झाली. सन २००८ मध्ये ज्यादिवशी लेहमन ब्रदर्स कोसळली, त्यावेळी या २१ वर्षीय तरुण अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्याने फ्रेंच दलाल कंपनीत प्रशिक्षणार्थी म्हणून प्रारंभ केला. त्यानंतर काही महिने गेले. झुकमॅनने वैश्विक वित्तीय व्यवस्था कोसळताना पाहिली. अगदी त्यावेळीदेखील लक्झेंबर्ग आणि बर्मुडासारख्या छोट्या देशांमधून प्रवाहित होणाऱ्या खगोलीय गणितामुळे त्याला अनेक गोष्टी उमजल्या. लक्झेंबर्ग आणि बर्मुडा या देशांमध्ये जगातील अतिश्रीमंत लोक स्वतःची संपत्ती लपवत असतात. या देशात संपत्तीवर फार कमी प्रमाणात कर

आकारला जातो. त्यामुळे असे देश या अतिश्रीमंतांसाठी कर वाचवण्यासाठी आश्रयस्थानच आहेत.

काही वर्षांमध्येच झुकमॅन जगातील एक आघाडीचा कर विशेषज्ञ म्हणून उदयास आला. त्याच्या 'The Hidden Wealth of Nations' (२०१५) या पुस्तकात त्याने हे दाखवून दिले, की जगातील ७.६ ट्रिलियन डॉलर एवढी संपत्ती या अशा लक्झेंबर्ग व बर्मुडासारख्या अत्यंत अल्प कर आकारणाऱ्या देशात लपवली गेली आहे. इमॅन्युअल सायेझ याच्या सोबतीने त्याने लिहिलेल्या आणखी एका पुस्तकात त्याने हे निदर्शनास आणून दिले, की अमेरिकेतील हे सर्वाधिक ४०० श्रीमंत लोक इतर प्रत्येक एकल उत्पन्न गटापेक्षा फारच कमी कर भरतात. म्हणजेच प्लंबर्सपासून ते साफसफाई करणाऱ्या कामगारांपर्यंत आणि नर्सेसपासून ते निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांपेक्षाही हे ४०० अतिश्रीमंत अमेरिकन लोक कमी कर भरतात.




या तरुण अर्थशास्त्रज्ञाला आपला मुद्दा पटवून देण्यासाठी आणखी काही सांगण्याची आवश्यकता नाही. झुकमॅनचे सल्लागार (मेन्टॉर) पिकेटी यांनी सन २०२० मध्ये आणखी एक पुस्तक प्रकाशित केले. हे पुस्तक १०८८ पृष्ठांचे असून, ते लवकरच बाजारात वाचकांच्या भेटीसाठी येणार आहे; परंतु झुकमॅन आणि सायेझ यांचे पुस्तक एका दिवसात वाचता येऊ शकते. पुस्तकाचे संक्षिप्त उपशीर्षक असे आहे : ''How the Rich Dodge Taxes and How to Make Them Pay.'' नवीन अमेरिकन राष्ट्राध्यक्षाने काय करावे, याची यादीच या पुस्तकात दिली आहे.

आता सर्वांत महत्त्वपूर्ण पाऊल काय असणार आहे? सगळ्या लक्षाधीशांवर चढत्या क्रमाने जाणारा वार्षिक संपत्ती कर आकारला गेला पाहिजे. यातून काय सिद्ध झाले, तर अधिक किंवा जास्तीचा कर अर्थव्यवस्थेसाठी वाईट असण्याची गरज नाही. विरोधाभासाने असे म्हणता येईल, की जास्तीचा कर भांडवलवादाला चांगलाच असतो. ते भांडवलवादास अधिक चांगल्या प्रकारे चालवतात.

सन १९५२ मध्ये अमेरिकेत सर्वाधिक उत्पन्न कर गट ९२ टक्के होता आणि यामुळे अमेरिकेची अर्थव्यवस्था अगोदरपेक्षाही वेगाने धावू लागली होती. तिच्यात वाढ झाली.

पाच वर्षांपूर्वी या अशा प्रकारच्या कल्पनांची वाच्यता करणे किंवा त्याबद्दल लिहिणे हे फारच पुरोगामी समजले जात होते. माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामांच्या वित्तीय सल्लागारांनी त्यांना अशी हमी दिली होती, की अशा प्रकारचा संपत्ती कर कधीही फायदेशीर असणार नाही आणि श्रीमंत लोक (त्यांच्या लेखापाल व वकिलांच्या फौजेसह) त्यांचे पैसे लपवून ठेवण्याचे मार्ग नेहमीच शोधत राहतील.

फ्रेंच त्रयींनी अगदी बर्नी सँडर्सच्या गटालादेखील त्यांच्या २०१६ च्या अध्यक्षीय उमेदवारीसाठी संपत्ती कर आराखडा करून देण्याची तयारी दर्शवली होती; परंतु बर्नी सँडर्स गटाने त्यास नकार दिला होता; परंतु आज आपण जेथे उभे आहोत त्यापासून सन २०१६ हा एक वैचारिक अनंतकाळ फार दूर आहे. सन २०२० मध्ये सँडर्सचे 'नेमस्त/मवाळ' प्रतिस्पर्धी जो बिडेन हे हिलरी क्लिंटन यांनी चार वर्षांपूर्वी जी कर वृद्धी योजना तयार केली होती, त्याच्या दुप्पट कर वृद्धी करण्याचा प्रस्ताव तयार करत आहेत. या दिवसांमध्ये अमेरिकेतील बहुसंख्य मतदार (अगदी रिपब्लिकनांसह) हे अतिश्रीमंत लोकांकडून लक्षणीयरीत्या भरपूर कर वसूल करण्याच्या बाजूने उभे आहेत. दरम्यान, अगदी फायनान्शिअल टाइम्सने असा निष्कर्ष काढला, की संपत्ती कर ही काही वाईट गोष्ट नाहीये.

**शँपेन समाजवादाच्या पल्याड**

एकदा थॅचर उपरोधिकपणे म्हणाल्या, ''समाजवादाबरोबरची समस्या अशी आहे, की तुम्ही अखेरीस इतर लोकांचे पैसे संपवता.'' थॅचर यांनी दुसऱ्या ठिकाणी बोट ठेवले होते. डाव्या राजकारण्यांना कर आणि असमानता यावर बोलायला खूप आवडते; परंतु हे सगळे पैसे कोठून येणार?

राजकीय आसाच्या दोन्ही बाजूंवर हे चालू गृहीतक असते, की समाजाच्या वरील स्तरामध्ये सर्वाधिक संपत्ती ही जेफ बेझोस आणि एलन मस्क यांच्यासारख्या द्रष्ट्या उद्योगपतींनी 'कमावलेली' असते. ही गोष्ट त्यास नैतिक सदसद्विवेकबुद्धीच्या प्रश्नामध्ये रूपांतरित करते. पृथ्वीवरील या महाकाय धनाढ्य व्यक्तींनी त्यांच्या संपत्तीमधील काही संपत्ती इतरांसोबत शेअर करू नये का?


जर तुमची हीच समज असेल, तर मी तुम्हाला आपल्या काळातील सर्वाधिक पुरोगामी विचारांच्या अर्थतज्ज्ञांपैकी एक असलेल्या मरियाना मझ्झुर्कनो यांची ओळख करून देऊ इच्छितो. मझ्झुर्कनो या अशा अर्थतज्ज्ञांच्या, प्राधान्याने स्त्रिया, पिढीशी संबंधित आहेत. जे यावर विश्वास ठेवतात, की ''पुरोगामी लोक नेहमीच त्यांच्या युक्तिवादापासून दूर जाण्याचे कारण म्हणजे ते संपत्ती पुनर्वितरणावर अति लक्ष केंद्रित करतात आणि ते संपत्ती निर्मितीवर पुरेसं लक्ष देत नाहीत.'' अगदी अलीकडील आठवड्यांमध्ये, ज्याला आम्ही 'आवश्यक कामगार' म्हणण्यास सुरुवात केली आहे त्याची यादी संपूर्ण जगभर प्रकाशित केली गेली आहे आणि आश्चर्य म्हणजे 'हेज फंड व्यवस्थापक' आणि 'बहुराष्ट्रीय कर सल्लागार' यांसारखे व्यवसाय त्या यादीमध्ये कुठेही दिसले नाहीत. अगदी अचानकपणे हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट झाले आहे, की आरोग्य सेवा, शिक्षण,

सार्वजनिक वाहतूक आणि किराणा सामानाच्या दुकानात कोण खऱ्या अर्थाने महत्त्वपूर्ण काम करत आहे.

सन २०१८ मध्ये दोन डच अर्थतज्ज्ञांनी एक अभ्यास केला. त्यांनी त्यामधून असा निष्कर्ष काढला, की कामकरी लोकसंख्येपैकी एक चतुर्थांश लोकांना त्यांचा व्यवसाय निरर्थक असल्याचा संशय वाटतो. यापेक्षाही गमतीदार गोष्ट म्हणजे सार्वजनिक क्षेत्रातील व्यवसायापेक्षा व्यापारी जगात चार पट जास्त 'सामाजिकदृष्ट्या निरर्थक व्यवसाय' असल्याचा निष्कर्ष आला.

हे अशा प्रकारचे मोठ्या प्रमाणावरील स्वतः खोटा आव आणणारे 'निरर्थक व्यवसायवाले' लोक वित्त आणि व्यापाराच्या क्षेत्रांत कामास लागले आहेत. हे आपणास पुढील प्रश्नांकडे घेऊन जाते. वास्तविकपणे संपत्ती कुठे तयार केली जाते? फायनान्शिअल टाइम्ससारख्या मीडियाने (जसे, की त्यांचे नवउदारमतवादी निर्माते फ्राईडमन आणि हायेक) नेहमीच असा दावा केला आहे, की उद्योजक संपत्ती तयार करतात, राज्ये संपत्ती तयार करत नाहीत. सरकारे फार झाले, तर समंत्रक (Facilitator) आहेत. सरकारांनी चांगली पायाभूत सुविधा आणि आकर्षक कर सुविधा उपलब्ध करून द्यावी आणि त्यानंतर दूर व्हावे; परंतु सन २०११ मध्ये सरकारचे कर्मचारी 'उद्योगाचे शत्रू' आहेत, असे एक राजकारणी तिरस्कारपूर्वक वारंवार म्हणत असल्याचे कानावर आल्यानंतर मझ्झुकॅतोच्या डोक्यात काही तरी चमकले. तिने काही संशोधन करायचे ठरवले. दोन वर्षांनंतर तिने एक पुस्तक लिहिले. त्या पुस्तकाने योजना बनविणाऱ्या जगाला हादरे दिले. त्याचे शीर्षक आहे : 'The Entrepreneurial State' (उद्योजकीय राज्य). तिच्या पुस्तकात मझ्झुकॅतोने हे दाखवून दिले, की केवळ शिक्षण, आरोग्यसेवा, कचरा गोळा करणे आणि पत्र पोचवण्याची सुरुवात सरकारपासून झाली नाही, तर खऱ्या अर्थाने विश्वसनीय नवकल्पनांचा उदयसुद्धा सरकारपासूनच झाला आहे.

आयफोनला स्टुपिड फोनऐवजी स्मार्ट फोन बनविणारा तंत्रज्ञानाचा प्रत्येक काप (इंटरनेट/जीपीएस, टचस्क्रीन, बॅटरी, हार्ड ड्राइव्ह, व्हाइस रेकगनिशन) हा सरकारच्या वेतनपटावर असणाऱ्या संशोधकांनी विकसित केला होता आणि जे ॲपलला लागू होते तेच इतर तंत्रज्ञानातील महाकाय कंपन्यांनादेखील लागू होते. गुगल? गुगलला सर्च इंजिन विकसित करण्यासाठी सरकारकडून फार मोठे अनुदान मिळाले होते. टेस्ला? कुणीतरी गुंतवणूक करावी म्हणून टेस्ला ही कंपनी वणवण भटकत होती; परंतु तिला कुणीही गुंतवणूकदार मिळाला नाही. अखेरीस अमेरिकेच्या ऊर्जा विभागाने ४६५ दशलक्ष




डॉलरची मदत केली. (एलॉन मस्कने सुरुवातीपासूनच फार मोठे सरकारी अनुदान फस्त केले आहे. त्याच्या तीन मोठ्या कंपन्यांना – टेस्ला, स्पेस एक्स आणि सोलर सिटी – जवळपास एकूण पाच अब्ज डॉलर एवढी भरघोस रक्कम करदात्यांच्या पैशातून मिळाली होती.) मझ्झुकॅतोने तंत्रज्ञान मासिक 'Wire'd' ला सांगितले, की "जसं जसं मी जास्त पाहत गेले तसं तसं मला हे अधिकपणे जाणवलं, की राज्याची गुंतवणूक सगळीकडे आहे."

हे खरं आहे, की प्रकल्पांमधील सरकारी गुंतवणुकीचे फायदे लगेच दिसत नाहीत. हे धक्कादायक आहे ना? नाही. त्यालाच खरं तर गुंतवणूक म्हणतात. उद्योग ही नेहमीच जोखीम पत्करण्याची गोष्ट आहे. मझ्झुकॅतो दाखवून देतात, की अनेक खासगी 'उपक्रम' भांडवलवाद्यांसोबतची समस्या ही आहे, की ते एवढी जोखीम पत्करण्यास तयार नसतात.

सन २००३ मध्ये सार्स रोगाच्या फैलावानंतर खासगी गुंतवणूकदारांनी कोरोना विषाणू संशोधनावरील काम तात्काळ बंद केले. ते त्यांच्यासाठी फायदेशीर नव्हते. दरम्यानच्या काळात सार्वजनिक वित्तीय साहाय्याने संशोधन चालूच राहिले. त्यासाठी अमेरिकन सरकारने ७०० दशलक्ष डॉलर एवढ्या प्रचंड मोठ्या रकमेची तरतूद केली. (जेव्हा केव्हा त्यावरील लस येईल त्यावेळी तुम्हाला सरकारला धन्यवाद द्यावे लागतील.)

मझ्झुकॅतोची केस अधिक चांगल्या प्रकारे समजण्यासाठी आपल्याकडे औषधनिर्मिती उद्योगाचे उदाहरण आहे. औषधनिर्मितीमधील जवळपास प्रत्येक संशोधन व उपलब्धी ही सार्वजनिक वित्तसाहाय्य असलेल्या प्रयोगशाळांमधूनच झाली आहे. औषधोत्पादनातील रॉश (Roche) आणि फाईझर (Pfizer) सारख्या महाकाय कंपन्या मुख्यतः केवळ पेटंट खरेदी करतात आणि जुनी औषधे नवीन ब्रँडस्च्या नावाखाली विकतात आणि त्यानंतर या कंपन्या मिळालेला नफा लाभांश म्हणून देण्यासाठी व परत आणखी शेअर्स विकत घेण्यासाठी वापरतात. (शेअरच्या किमती वाढविण्यासाठी ही युक्ती चांगली आहे.) या सगळ्यांमुळे २७ महाकाय औषधोत्पादन कंपन्यांना वार्षिक शेअरधारकांना वेतन

देण्यास सक्षम केले व सन २००० पासून त्यांना चौपट होण्यास मदत केली आहे.

यासंदर्भात मझ्झुकॅतोला विचारलं तर त्या म्हणतात, की हे बदलणं गरजेचं आहे. जेव्हा सरकार प्रमुख नवकल्पनेस अनुदान देत असेल, तर त्या म्हणतात, की उद्योगाने त्याचे स्वागत केले पाहिजे. आणखी काय पाहिजे, हीच तर सगळी कल्पना आहे; परंतु नंतर सरकारला त्याची सुरुवातीची रक्कम परत मिळायला पाहिजे, तीही व्याजासह. हे अत्यंत चीड आणणारं आहे, की आता सध्या ज्या खासगी कंपन्यांना मोठमोठी आर्थिक मदत मिळते आहे, त्याच कंपन्या सरकारची सर्वांत मोठ्या प्रमाणात कर फसवणूक करतात. ॲपल, गुगल आणि फाईझरसारख्या खासगी कंपन्यांनी जगभरात त्यांचे अब्जावधी रुपये अत्यंत माफक वा कमीत कमी कर आकारणाऱ्या देशांमध्ये साठवले आहेत. या कंपन्यांनी त्यांच्या करातील माफक हिस्सा द्यायला पाहिजे, याबाबत कसलाच प्रश्न उपस्थित होत नाही; परंतु मझ्झुकॅतोच्या मतानुसार, यापेक्षाही आणखी काय महत्त्वपूर्ण आहे, तर सरतेशेवटी सरकार स्वतःच्या उपलब्धीच्या श्रेयावर दावा करते. तिचे सर्वांत आवडते उदाहरण म्हणजे १९६० च्या दशकातील अवकाश स्पर्धा. सन १९६२ च्या भाषणात माजी अमेरिकन राष्ट्राध्यक्ष केनेडी यांनी जाहीर केले, की ''या दशकात आम्ही चंद्रावर जाण्याचे आणि इतर गोष्टी करण्याचे ठरवले आहे; परंतु आम्ही या गोष्टी सोप्या आहेत म्हणून करणार नाही, तर त्या कठीण आहेत म्हणून.''

या दिवसांमध्ये आणि या काळात आपणसुद्धा उद्योजकीय राज्याच्या नवकल्पनांच्या अतुलनीय शक्तीला हाक देणाऱ्या प्रचंड मोठ्या आव्हानांचा सामना करत आहोत. मानवी प्रजातीला सर्वांत मोठी भेडसावणारी समस्या म्हणजे हवामान बदल. नवउद्योजकांसाठी ही फारच गंभीर समस्या आहे. आता आपणाला कधी नव्हे ते हवामान बदलाने अत्यावश्यक केलेले रूपांतरण प्राप्त करण्यासाठी केनेडीच्या भाषणातील गौरव केलेल्या मानसिकतेची गरज आहे. हा अपघात नाहीये. नंतर मझ्झुकॅतो, ब्रिटिश–व्हेनेझुवेलियन अर्थतज्ज्ञ कार्लोटा पेरेझ यांच्यासह ग्रीन न्यू डीलच्या बौद्धिक जननी बनल्या. ग्रीन न्यू डील ही जगाने हवामान बदलाची समस्या सोडविण्यासाठी बनविलेली सर्वात मोठी अशी महत्त्वाकांक्षी योजना होती.

मझ्झुकॅतोच्या दुसऱ्या एक मित्र आहेत– अमेरिकन अर्थतज्ज्ञ स्टेफनी केल्टन. त्या म्हणतात, जर गरज पडली तर सरकार त्याच्या महत्त्वाकांक्षांना वित्तीयसाहाय्य करण्यासाठी अधिक प्रमाणात नोटा छापू शकते आणि त्याने राष्ट्रीय कर्ज व तूट यांची काळजी करू नये. (मझ्झुकॅतो आणि केल्टनसारखे अर्थतज्ज्ञांकडे सरकारला घरगुती सामान वा कुटुंबातील सदस्यांसारखे मानणाऱ्या जुन्या विचारसरणीच्या राजकारण्यांसाठी, अर्थतज्ज्ञांसाठी व पत्रकारांसाठी जास्तीचा धीर नाहीये. शेवटी काय, कुटुंबातील सदस्य वा घरातील सामान कर गोळा करू शकत नाहीत किंवा ते स्वतःच्या चलनामध्ये एखाद्याला पैसे देऊ शकत नाहीत.)

आपण इथे काय बोलतोय, तर आर्थिक विचारप्रकियांमध्ये क्रांती आवश्यक आहे. सन २००८ च्या प्रेचप्रसंगानंतर अत्यंत कडक वित्तीय शिस्त राबवली गेली. आता आपण अशा काळात जगात आहोत जेव्हा केल्टनसारख्या (The Deficit Myth असे बोलके शीर्षक




असलेल्या पुस्तकाच्या लेखिका) व्यक्तीला चक्क फायनान्शिअल टाइम्सने आधुनिक दिवसाचा मिल्टन फ्राईडमन म्हणून गौरविले.

या वृत्तपत्राने एप्रिलच्या प्रारंभी असे लिहिले, की सरकारने 'सार्वजनिक सेवांकडे दायित्व म्हणून न पाहता गुंतवणूक म्हणून पाहावे.' केल्टन आणि मझ्झुकॅतो अनेक वर्षे ज्या गोष्टीसाठी झगडल्या त्याचेच प्रतिध्वनी या वृत्तपत्रामध्ये ऐकू येत होते. या स्त्री अर्थतज्ज्ञांबद्दलची सर्वांत गमतीशीर बाब म्हणजे, की त्या केवळ भाषणबाजी करून समाधान मानणाऱ्या नव्हत्या. त्यांना परिणाम हवे होते. उदाहरणार्थ, केल्टन या एक अत्यंत प्रभावी राजकीय सल्लागार आहेत. पेरेझ यांनी अगणित कंपन्यांचे व संस्थांचे सल्लागार म्हणून काम केले आहे. मझ्झुकॅतोसुद्धा एक जन्मजात नेटवर्कर आहेत. जगातील संस्थांकडे जाण्याचे मार्ग त्यांना माहीत आहेत. दावोसमधल्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या त्या केवळ एक नियमित सदस्यच नाहीत (दावोस इथे दरवर्षी जगातील श्रीमंत व ताकदवान परिषद आयोजित केली जाते), तर या इटलीच्या अर्थतज्ज्ञाने अमेरिकन सिनेटर एलिझाबेथ वॉरेन आणि कॉंग्रेस स्त्री सदस्या अलेक्झांड्रिया ओर्केसिओ–कॉर्टेस आणि स्कॉटलंडच्या पहिल्या मंत्री निकोला स्टुरजिऑन यांनादेखील सल्ला दिलेला आहे. युरोपियन पार्लमेंटने मागच्या वर्षी महत्त्वाकांक्षी नवकल्पना कार्यक्रमास मंजुरी दिली, त्या कार्यक्रमाची संहितादेखील मझ्झुकॅतो यांनीच तयार केली होती.

एका प्रसंगी मझ्झुकॅतो गमतीने म्हणाल्या, ''मला कामाचा परिणाम हवाय. अन्यथा हा शँपेन समाजवाद आहे : तुम्ही आता जाता, अधूनमधून बोलता आणि काहीच घडत नाही.''

**कल्पना कशा प्रकारे जगाला जिंकतात ?**

तुम्ही जग कसे बदलविता. पुरोगामीवादी गटाला हा प्रश्न विचारा आणि तुम्हाला लगेच कुणी तरी जोसेफ ओव्हरटनचे नाव सांगेल. ओव्हरटन मिल्टन फ्रिडमनच्या मतांचा समर्थक होता. त्याने नवउदारमतवादी विचार गटासाठी काम केले आणि अनेक वर्षे फार कमी आकारणी व छोट्या सरकारसाठी त्याने मोहीम राबवली. अकल्पनीय गोष्टी शेवटी कशा अटळ बनतात, या प्रश्नामध्ये त्यांना रस होता. ओव्हरटन म्हणाला, एक खिडकीची कल्पना करा. या खिडकीच्या आतमध्ये ज्या कल्पना पडतात त्यांना 'स्वीकारार्ह' असे माना आणि त्या 'स्वीकारार्ह' असतातच किंवा कोणत्याही दिलेल्या वेळी त्या 'लोकप्रिय' असतात. जर तुम्ही राजकारणी असाल आणि तुम्हाला पुन्हा निवडून येण्याची इच्छा असेल, तर तुम्ही या खिडकीच्या आतमध्येच थांबा; परंतु जर तुम्हाला हे जग बदलायचे असेल, तर तुम्हाला ही खिडकी बदलावी लागेल. म्हणजेच तुम्हाला

त्या खिडकीपासून दूर जावे लागेल. कसे? स्वतःला काठावर ढकलत. स्वतः अनार्किक, स्थितप्रज्ञ आणि अवास्तववादी होऊन.

अलीकडील वर्षांमध्ये ओव्हरटन विंडो निःसंशयपणे बदलली आहे. जी एकेकाळी परिघावरती होती ती आता मुख्य धारेत आली आहे. एका फ्रेंच अर्थतज्ज्ञाचा संदिग्ध आलेख 'वॉल स्ट्रीटचा ताबा घ्या' हे घोषवाक्य बनले (आम्ही ९९ टक्के लोक आहोत.) वॉल स्ट्रीटचा ताबा घ्या घोषणेने क्रांतिकारी अध्यक्षीय उमेदवारास मार्ग करून दिला आणि बर्नी सँडर्सने बिडेनसारख्या इतर राजकारण्यांना स्वतःच्या दिशेने ओढले.

या दिवसांमध्ये अधिकाधिक अमेरिकन युवा भांडवलवादापेक्षा समाजवादाच्या बाजूने उभे राहत आहेत, असे दिसते. ३० वर्षांपूर्वी हे सगळे अकल्पनीय राहिले असते; पण ते आज घडतेय. ते सगळे तरुण आज समाजवादाचे समर्थन करताना दिसतात (१९८० च्या प्रारंभीच्या दशकामध्ये युवा मतदार नवउदारमतवादी रिगनचे सर्वांत मोठे आधारभूत पाया होते.); परंतु सँडर्सने प्राथमिक फेऱ्या गमावल्या नाहीत का? आणि मागच्या वर्षी युनायटेड किंगडममध्ये समाजवादी जेरेमी कॉर्बिन यांना नाट्यमय निवडणूक पराभव पाहावा लागला नाही का? निश्चितपणे हे झाले; परंतु निवडणुकीचा निकाल हे काही काळाचे एकमेव चिन्ह नाहीये. कॉर्बिनने सन २०१७ आणि २०१९ मधील निवडणुकांमध्ये पराभव पत्करला असेलही; परंतु कन्झर्व्हेटिव्ह योजना स्वतःच्या जाहीरनाम्यापेक्षा मजूर पक्षाच्या वित्तीय योजनांच्या बरीच जवळ गेली होती. त्याचप्रमाणे सन २०२० मध्ये जरी सँडर्स हे बिडेन यांच्यापेक्षा अधिक पुरोगामी हवामान योजनेबद्दल बोलले असले, तरी सँडर्सच्या सन २०१६ मधील हवामान योजनेपेक्षा बिडेन यांची हवामान योजना अधिक पुरोगामी आहे.

'न्यू लेबर ॲण्ड टोनी ब्लेअर' म्हणजे माझी सर्वांत मोठी उपलब्धी, असं थॅचर जेव्हा म्हणाल्या तेव्हा त्या गमतीशीरपणे म्हणत नव्हत्या. तसा त्यांना विनोदही करायचा नव्हता. जेव्हा त्यांचा पक्ष सन १९९७ मध्ये पराभूत झाला, तेव्हा तो पराभव त्यांच्या प्रतिस्पर्ध्याने थॅचर यांच्या कल्पनांसह केला होता. थॅचर यांच्या कल्पना प्रतिस्पर्ध्याच्या पथ्यावर पडल्या.

जगाला बदलविणे हा तसा लष्कराच्या भाकऱ्या भाजण्याचा प्रकार आहे. कुणीही तुमचे आभार मानणार नाही. जेव्हा तुमचे प्रतिस्पर्धी नम्रपणे कबूल करतात, की तुम्ही बरोबर होतात असा विजयश्रीचा क्षण येत नाही. राजकारणामध्ये तुम्ही सर्वोत्तम सर्वोत्तम गोष्टीची आशा करू शकता आणि ती गोष्ट म्हणजे, उचलेगिरी किंवा दुसऱ्याच्या कल्पना चोरून वापरणे. सन १९७० मध्ये फ्रिडमन यांनी हे अगोदरच समजून घेतले होते. 'माझ्या कल्पना या जगास कशा प्रकारे जिंकतील' याचे वर्णन फ्रिडमन यांनी एका पत्रकाराला केले होते. ते वर्णन पुढील चार अंकात सादर करता येईल –

"**अंक एक :** माझ्यासारख्या चक्रम माणसाचे दृष्टिकोन दुर्लक्षित केले जातात.


**अंक दुसरा :** पारंपरिक विश्वासाचे संरक्षक अस्वस्थ होतात, कारण कल्पनांमध्ये सत्यांश असल्याचे दिसते.

**अंक तिसरा :** लोक म्हणतात, 'आम्हाला माहीत आहे हा अव्यवहार्य आणि सैद्धांतिकदृष्ट्या टोकाचा दृष्टिकोन आहे; परंतु अर्थात, आम्हाला या दिशेने जाण्यासाठी अधिक नेमस्त मार्गांकडे पाहणे अनावश्यक आहे.'

**अंक चार :** प्रतिस्पर्धी माझ्या कल्पना असमर्थनीय व्यंगचित्रामध्ये रूपांतरित करतात, जेणेकरून ते पुढे जातात आणि मी अगोदर जिथे उभा होतो ती जागा ताब्यात घेतात."

तरीही मोठ्या कल्पना चक्रम व्यक्तीकडून आल्या, तर त्याचा अर्थ असा होत नाही, की प्रत्येक चक्रम व्यक्तीकडे मोठ्या कल्पना असतात आणि जरी पुरोगामी कल्पना मधूनमधून लोकप्रिय होत असल्या तरी एखादे वेळी निवडणूक जिंकणे चांगलेच असेल ना. वारंवारपणे ओव्हरटन विंडो ही डाव्यांच्या अपयशासाठी एक सारवासारव म्हणून वापरली जाते. जसे, की 'कमीत कमी आम्ही कल्पनांचे युद्ध जिंकले.' अनेक स्वयंघोषित 'पुरोगामी' लोकांकडे सत्ता मिळवण्यासाठी केवळ अर्ध्यामुर्ध्या योजना असतात. म्हणजे जर खरोखरंच त्यांच्याकडे काही योजना असल्या, तर त्या या अशाच अर्धवट स्वरूपात असतात; परंतु तुम्ही त्यावर टीकाटिपणी केल्यावर






तुमच्यावर देशद्रोही म्हणून शिक्का मारला जातो. वास्तविकवणे, डाव्यांचा असा इतिहास आहे, की ते बदनामीचा रोख दुसऱ्याकडे वळवितात. वृत्तपत्रे, पायाभूत सुविधा व त्यांच्याच पक्षातील उच्च स्थान भूषविणाऱ्या नेत्यांकडे डावे बदनामीचा रोख वळवितात; परंतु ते क्वचितच जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घेतात.

अलीकडे लॉकडाऊनच्या काळात मी 'Difficult Women' हे पुस्तक वाचले आणि त्या पुस्तकाने मला पुन्हा एकदा याची जाणीव करून दिली, की हे जग बदलविणे खरंच खूप अवघड आहे. हे पुस्तक ब्रिटिश पत्रकार हेलन लेविस यांनी लिहिले आहे. ग्रेट ब्रिटेनमधील स्त्रीवादाच्या इतिहासाचा आढावा यामध्ये घेतलेला आहे. एका अधिक चांगल्या जगाची निर्मिती करू इच्छिणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने हे पुस्तक आवर्जून वाचावे, असे मला वाटते. लेविस यांच्या मतानुसार, Difficult म्हणजे तीन गोष्टी –

१. हे जग बदलविणे कठीण आहे. तुम्हाला त्यासाठी त्याग करावाच लागतो.
२. अनेक क्रांतिकारक कठीण असतात. दुराग्रही, घृणास्पद आणि हेतुपुरस्सर हंगामा करणाऱ्या लोकांपासून प्रगती सुरू होते, असे दिसते.
३. चांगले काम करणे म्हणजे तुम्ही परिपूर्ण आहात, असे नव्हे.

इतिहासाचे नायक हे क्वचितच संपूर्ण स्वच्छ असतात; परंतु नंतर त्यांना स्वच्छ केले जाते.

लेविसची टीका अशी आहे, की अनेक कार्यकर्ते या गुंतागुंतीस दुर्लक्षित करतात असे दिसते आणि ते उघडपणे कमी परिणामकारक करतात. ट्विटरकडे पाहा. ट्विटर अशा लोकांनी गच्च भरलेले आहे. ज्यांना इतर ट्विटर्सच्या मतांचा न्यायनिवाडा करण्यामध्ये अधिक रस असल्याचे दिसून येते. एखादा पहिलाच गैरसोयीचा शेरा मारल्यामुळे किंवा वादग्रस्त विधानाचा डाग पडल्यामुळे कालचा नायक दुसऱ्याच दिवशी तोंडावर पडलेला असतो. लेविस असे दाखवितात, की कोणत्याही चळवळीमध्ये पुष्कळ अशा भूमिकांचे सादरीकरण होते आणि त्यातून वारंवार अशाश्वत, त्रासदायक युती आणि तडजोडी निकडीच्या बनतात. ब्रिटिश मताधिकारासारख्या चळवळीने मच्छीमारांच्या बायकांपासून ते श्रीमंत-प्रतिष्ठित स्त्रिया आणि गिरणी कामगार मुलींपासून ते भारतीय राजकन्यांना एकत्र आणले गेले. सन १९१८ मध्ये ३० वर्षांपुढील मालमत्ताधारक स्त्रियांना मताधिकार प्राप्त करण्याच्या विजयी क्षणापर्यंत ही गुंतागुंतीची युती टिकली (हे बरोबर आहे, की सुरुवातीला केवळ विशेषाधिकार असलेल्या स्त्रियांनाच मताधिकार मिळाला. ती एक समंजस तडजोड होती, असे सिद्ध झाले. कारण त्या पहिल्या पावलाने पुढच्या अपरिहार्यतेस जोडले : सन १९२८ मध्ये वैश्विक स्त्री मताधिकार मंजूर झाला.) आणि नाही, अगदी त्यांचे हे यश या सगळ्या स्त्रीवाद्यांना मित्रांमध्ये रूपांतरित करू शकले नाही. असो. लेविसच्या मतानुसार, ''अगदी मताधिकार मिळावा म्हणून झगडणाऱ्या स्त्रियांच्या या गटातील सदस्यांमध्ये व्यक्तिमत्त्व संघर्ष झाले आणि त्यांना मिळालेल्या भव्य विजयावर विरजण पडले. विजयाच्या आठवणी आंबट झाल्या.''



प्रगती गुंतागुंतीची आहे, असे दिसते. आपण ज्या मार्गाने सक्रियता समजून घेतो तोही वास्तविकता विसरून जातो, की आपणास या सगळ्या वेगवेगळ्या भूमिकांची गरज आहे. आमची भावना- टीव्हीवरील चर्चांमध्ये आणि संध्याकाळच्या भोजनप्रसंगी- अशी आहे, की आपण आपल्या आवडीची सक्रियता निवडावी. आम्ही ग्रेटा थुनबर्गला सलाम करतो, तिचे कौतुक करतो व तिला पाठिंबा देतो; परंतु विलोप बंडखोरवाल्यांच्या (Extinction Rebellion) रस्त्यावरील धरणे आंदोलनाबद्दल संपात व्यक्त करतो किंवा आपण वॉल स्ट्रीटचा ताबा घ्या म्हणणाऱ्या आंदोलनकर्त्यांचे कौतुक करतो; परंतु दावोसकडे निघालेल्या दबाव गट सदस्यांचा तिरस्कार करतो.

बदल अशा प्रकारे घडत नाही. या सगळ्या लोकांनी त्यांच्या भूमिका वठविल्या पाहिजेत. त्या भूमिका सादर केल्या पाहिजेत. प्राध्यापक आणि अराजकतावादी अशा दोघांनी त्यांच्या त्यांच्या भूमिका वठविल्या पाहिजेत. मनुष्यांना एकत्र आणणाऱ्या नेटवर्कर आणि आंदोलनकर्त्यांने भूमिका बजावल्या पाहिजेत. चिथावणीखोर आणि शांतता स्थापित करणाऱ्यांनी, अकादमिक परिभाषेत लिहिणाऱ्यांनी आणि विस्तृत वाचक श्रोत्यांसाठी ते भाषांतर करणाऱ्यांनी भूमिका पार पाडल्या पाहिजेत. दृश्याच्या पाठीमागे उभे राहून दबाव गटाची भूमिका पार पाडणाऱ्यांनी आणि ज्यांना दंगल पोलीस फरपटत ओढत नेतात त्यांनी भूमिका वठविल्या पाहिजेत. असा एक बिंदू येतो जेव्हा ओव्हरटन विंडोच्या काठांवर प्रवास करणे पुरेसे होत नाहीये. असा एक बिंदू येतो जेव्हा आपणास संस्थांमधून आंदोलन करत जाण्याची आणि एके काळी अत्यंत पुरोगामी असलेल्या कल्पनांना सत्ता केंद्राच्या ठिकाणी आणण्याची वेळ येते. मला वाटते, ती वेळ आताची आहे.

मागील ४० वर्षे वर्चस्व गाजवणारी विचारधारा अस्तंगत होत आहे. तिची जागा कोण घेईल? कोणालाही हे निश्चितपणे सांगता येत नाही. याची कल्पना करणे कठीण नाहीये, की हा पेचप्रसंग आपणाला यापेक्षाही अधिक गडद अंधाऱ्या मार्गावर घेऊन जाईल. राज्यकर्ते अधिक सत्ता हस्तगत करण्यासाठी त्याचा वापर करतील. ते त्यांच्या जनतेच्या स्वातंत्र्यावर मर्यादा घालतील आणि वंशवाद व द्वेषाच्या ज्वालांना भडकवतील; परंतु परिस्थिती भिन्न असू शकते. गोष्टी बदलू शकतात. आपण इतर मार्गानेसुद्धा कल्पना करू शकतो. यासाठी आपण सर्वांनी अगणित कार्यकर्त्यांच्या आणि अकादमिक व्यक्तींच्या, नेटवर्कर्स आणि आंदोलनकर्त्यांच्या कठीण परिश्रमांना धन्यवाद दिले पाहिजेत. ही महामारी आपणास नवीन मूल्यांच्या मार्गावर घेऊन जाईल.

जवळजवळ सगळे लोक स्वार्थी असतात, अशी एका मतप्रणालीने व्याख्या केली होती आणि मानवी स्वभावाच्या त्या उपेक्षावादी दृष्टिकोनापासून हे सगळे नंतरच घडले- म्हणजे खासगीकरण, वाढणारी असमानता आणि सार्वजनिक क्षेत्राची झीज.

आता एका भिन्न, अधिक वास्तववादी दृष्टिकोन असलेल्या मानवी स्वभावासाठी एक अवकाश उघडला आहे : मानवजात सहकार्य करण्यासाठी उत्क्रांत झाली आहे. या धारणेपासून बाकी सगळे घडू शकेल - म्हणजे विश्वासावर आधारलेले सरकार, ऐक्यभावात रुजलेली करव्यवस्था आणि आपले भविष्य सुरक्षित करण्यासाठी आवश्यक असलेली शाश्वत गुंतवणूक आणि हे सगळे या शतकाच्या सर्वांत मोठ्या चाचणीसाठी वेळेच्या आत तयार करावे लागणार आहे. आपली महामारी स्लो मोशनमध्ये आहे अन् तिचे नाव आहे, हवामान बदल.

हे पेचप्रसंग आपणास कुठे घेऊन जातील, हे कोणासही माहीत नाही; परंतु मागच्या काळाशी तुलना करता किमान आपण अधिक तयारीत आहोत. 'Neoliberalism Is Ending : What Comes Next?' अशा शीर्षकाचा हा लेख एलिझाबेथ मॅन्टन यांनी डच भाषेमधून इंग्रजी भाषेत भाषांतरित केला आहे. ●●●

**(हा लेख राजक्रांती वलसे यांनी इंग्रजीमधून मराठीत भाषांतरित केला आहे. भाषांतरकार बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात सहयोगी प्राध्यापक म्हणून काम करत आहेत.)**

# ‘हिंदुत्ववादी राजकारणाच्या पाऊलखुणा’ विषयी थोडे...

**जातीय उतरंड नव्याने पुनरुज्जीवित केली जात आहे. मुस्लीम आणि अन्य धार्मिक अल्पसंख्याकांवर ‘दुय्यम नागरिकत्व’ लादले जात आहे. या सर्व धोरणांची पाळेमुळे हिंदुत्ववादी विचारप्रवाहाच्या ऐतिहासिक वाटचालीत स्पष्टपणे सापडतात. स्वातंत्र्यापासून देशाने स्वीकारलेल्या संवैधानिक मूल्ये आणि धोरणांशी अत्यंत विपरीत अशी ही वाटचाल आहे.**



**प्रमोद मुजुमदार**



साधारण दोन वर्षांपूर्वी एका स्नेह्यांनी अक्षय मुकुल यांचा ‘गीता प्रेस ॲण्ड द मेकिंग ऑफ हिंदू इंडिया’ या हार्पर कॉलिन्स पब्लिशर्स इंडिया यांनी प्रसिद्ध केलेला इंग्रजी ग्रंथ दिला. हिंदुत्वादी विचारप्रवाहाचा आलेख मांडणारा हा एक अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ आहे. भारताच्या सामाजिक-राजकीय इतिहासाचा विचार केला, तर १८५७ च्या ब्रिटिशविरोधी उठावापासून स्वातंत्र्य चळवळीचा आरंभ झाला, असे म्हणता येते. जागतिक पातळीवर बदलत्या आधुनिक राजकीय-सामाजिक विचारांचा प्रभाव याच काळात भारतात दिसू लागला. स्वातंत्र्य, समता आणि लोकशाही मूल्यांचा पुरस्कार करणाऱ्या समाजरचना या जागतिक पातळीवर मान्यताप्राप्त झाल्या होत्या. याच उदारमतवादी लोकशाहीचा पुरस्कार करणाऱ्या काँग्रेसची १८८५ साली भारतात स्थापना झाली. विसाव्या शतकाच्या पहिल्या, दुसऱ्या दशकात गांधीवाद, समाजवाद आणि मार्क्सवाद, अशा आधुनिक राजकीय विचारसरणी देशात प्रभावी होत गेल्या. त्याच काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जाती-वर्णाच्या अमानुष जोखडाखाली भरडल्या जाणाऱ्या दलितांचा एल्गार पुकारला. या आधुनिक, समतावादी आणि सर्वसमावेशक विचारप्रणाली भारतात रुजत असतानाच देशातील हिंदुत्ववादी विचारप्रवाह राजकीयदृष्ट्या संघटित होत गेला.

**हिंदुत्ववादी विचारप्रवाहाची वाटचाल समजून घ्यायला हवी**

हिंदुत्ववादी विचारप्रवाहाच्या बांधणीसाठी गीता प्रेसने सुमारे शंभर वर्षे सातत्याने चिकाटीने केलेले काम नक्कीच नोंद घेण्यासारखे आहे. स्वातंत्र्य चळवळीच्या कालखंडात आणि स्वातंत्र्यानंतर पहिली तीस-पस्तीस वर्षे राजकीय परिस्थिती अनुकूल नसताना गीता प्रेसने भारतातील सर्व हिंदुत्ववादी विचारप्रवाह एकत्रित बांधून ठेवण्याचे कार्य केले. तुम्ही त्या विचारप्रवाहाचे समर्थक असा वा विरोधक त्यांच्या या चिकाटीची दखल घ्यायलाच हवी. गीता प्रेसचे संस्थापक हनुमानप्रसाद पोद्दार आणि जयदयाल गोयंका यांनी मिशनरी वृत्तीने केलेल्या प्रयत्नांची आणि दूरदृष्टीची दखल घेणे अपरिहार्य ठरते! देशातील बहुसंख्य तरुण, तरुणींना आणि मध्यमवर्गाला (मुख्यतः उच्च आणि मध्यम जातींमधील समाजसमूह) आज या हिंदुत्ववादी विचारप्रवाहाने दिलेली ‘आम्ही हिंदू’ ही अस्मिता आपली वाटत आहे. ‘आम्ही’ (म्हणजे हिंदू) आणि विरुद्ध ‘ते’ (म्हणजे मुस्लीम) हा युक्तिवाद म्हणजे प्रभावी ‘राजकीय तत्त्वज्ञान’ वाटत आहे. ते तत्त्वज्ञान आपले वाटत आहे! या हिंदुत्ववादी अस्मितेबाबत सहानुभूती असणाऱ्या लोकांशी कोणताही अर्थपूर्ण राजकीय संवाद करण्यासाठी हिंदुत्ववादी विचारप्रवाहाची गेल्या शंभर-सव्वाशे वर्षांतील ही वाटचाल समजून घ्यायला हवी.


गेली अनेक वर्षे डाव्या चळवळीत काम करताना आणि विशेषतः हिंदू-मुस्लीम सलोख्याच्या प्रश्नावर काम करताना गीता प्रेसविषयी थोडेफार ऐकले होते; परंतु कल्याण मासिक किंवा गीता प्रेसची अन्य प्रकाशने कधीच पाहण्यात आली नव्हती. त्यांच्या ऐतिहासिक कामाची माहिती तर दूरची गोष्ट. अगदी रा.स्व. संघाशी संबंधित मित्र परिवारातही गीता प्रेसच्या कामाबद्दल फारशी चर्चा होत नसे. डाव्या आणि पुरोगामी चळवळीतील माझ्या अनेक

सहकाऱ्यांनाही गीता प्रेसबद्दल अशीच जुजबी माहिती होती. डाव्या, पुरोगामी चळवळीतील विचारप्रवाहाने हिंदुत्ववादी विचारप्रणालीला पुरेसे महत्त्वच दिले नाही. या विचारप्रवाहाची जडणघडण कशी होत गेली, त्याचा पाया कसा आणि का विस्तारत गेला, संघटनात्मक बांधणी कशी झाली याचे वस्तुनिष्ठ आकलन डाव्या, पुरोगामी चळवळीतील कार्यकर्ते आणि पाठीराख्यांना पुरेसे नाही. याचा अर्थ त्यांना हिंदुत्ववादी विचार प्रवाहाच्या तात्त्विक भूमिकेचे आकलन नाही, असे अजिबात नाही. सनातन वर्णाधिष्ठित, जातिबद्ध हिंदुत्ववादी तत्त्वज्ञान कसे विषमता जोपासणारे, अमानुष तत्त्वज्ञान आहे, याचे अचूक तात्त्विक विश्लेषण महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून डाव्या-पुरोगामी चळवळीतील अनेक विचारवंतांनी केले आहे. हिंदुत्ववादी विचारप्रवाहाने घेतलेल्या राजकीय भूमिकांच्या डाव्या-पुरोगामी विचारप्रवाहाने वेळोवेळी अतिशय प्रभावी प्रतिवाद केलेला आहे. सर्वसाधारणपणे डाव्या-पुरोगामी चळवळीतील प्रत्येकालाच त्याचे उत्तम राजकीय भान असते. मात्र, व्यावहारिक पातळीवर हिंदुत्ववादी विचारप्रवाहाची वाटचाल कशी होत गेली, त्याचे अंतर्गत चलनवलन, सत्ताधारी वर्गाशी असलेले संधिसाधू लवचिक नाते याचे फारसे आकलन नसते. या पार्श्वभूमीवर अक्षय मुकुल यांचा ग्रंथ खूपच नवीन दृष्टी देतो.

हे पुस्तक आशय-विषयाचा गाभा कायम ठेवून संक्षिप्त स्वरूपात यावे असा अनेकांनी आग्रह केला. त्यासाठी पूर्वतयारी करत असताना चळवळीतील सहकारी प्रा. अंजली मायदेव-आंबेडकर यांनी 'प्रबुद्ध भारत' या पाक्षिकात या पुस्तकावर आधारित लेखमाला सुरू करावी, असा आग्रह धरला. त्यानुसार एप्रिल २०२० पासून 'प्रबुद्ध भारत' या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेल्या पाक्षिकात एक वर्षभर 'मेकिंग ऑफ हिंदू राष्ट्र' या शीर्षकाने लेख मालिका लिहिली. या लेखमालेला चांगला प्रतिसाद मिळाला. वाचकांना ही माहिती पूर्णपणे नवीन होती. या प्रतिसादामुळे या पुस्तकाच्या कामाला गती मिळाली.

वास्तविक हा संपूर्ण ग्रंथ मराठीत आणणे आवश्यक आहे. मूळ ग्रंथाचे लेखक अक्षय मुकुल यांनीही तशी इच्छा व्यक्त केली आहे. अक्षय मुकुल यांनी परिश्रमपूर्वक केलेल्या या संशोधनाला नक्कीच ऐतिहासिक मोल आहे; परंतु ५३९ पानांचा हा मूळ ग्रंथ मराठीत आणणे हा मोठा प्रकल्प असेल. म्हणूनच अक्षय मुकुल यांच्या ग्रंथाचा मध्यवर्ती आधार घेत ही संक्षिप्त मांडणी केली आहे.

'गीता प्रेस ॲण्ड द मेकिंग ऑफ हिंदू इंडिया' हा अक्षय मुकुल यांचा संशोधित ग्रंथ आहे. त्यांच्याच शब्दांत सांगायचे, तर 'गीता प्रेसने देशातील हिंदुत्वाला एकसंध मूर्तरूप देण्यात सर्वांत कळीची भूमिका बजावली आहे.' हिंदुत्वाची एकात्मिक अस्मिता उभारताना हिंदुत्ववादी विचारप्रवाहाच्या गाभ्यातील 'सनातन हिंदू धर्माच्या' संकल्पनांना गीता प्रेस परिवाराने अजिबात धक्का लागू दिलेला नाही. वर्ण आणि जातीय उतरंडीचे समर्थन, मनुस्मृतीचे समर्थन, कुटुंबातील मुलांचे आदर्श 'हिंदू पुरुष' म्हणून संगोपन, आदर्श पतिव्रता स्त्री अशा सर्व कल्पनांचा ठाम पुरस्कार गीता प्रेस परिवाराने केला. 'मुस्लीम पुरुष' म्हणजे 'ते', 'अन्य'! मुस्लीम म्हणजे 'हिंस्र', 'लिंगपिसाट' आणि 'विलासी' अशी प्रतिमा सतत रंगवणे, 'मुस्लीम पुरुषांपासून हिंदू स्त्रियांचे संरक्षण करणे सर्व हिंदू पुरुषांचे आद्यकर्तव्य आहे, असे स्पर्धात्मक आणि वर्चस्ववादी धार्मिक जातीयवाद जोपासणारे प्रमेय हा हिंदुत्ववादी विचारपटाचा एकात्मिक भाग आहे.' गीता प्रेसच्या वाटचालीचे संशोधन करताना अक्षय मुकुल यांनी एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या दोन दशकांपासून आजपर्यंत बदलत्या राजकीय, सामाजिक घडामोडींचा हिंदुत्ववादी विचारधारेशी असलेला संबंध नेमकेपणाने उलगडून दाखवला आहे. गीता प्रेसच्या स्थापनेपासून (एप्रिल १९२३) या विचारप्रवाहाचा झालेला राजकीय, सामाजिक प्रवास या संशोधनातून उभा राहतो, तसेच गीता प्रेस परिवाराचा आणि पर्यायाने हिंदुत्ववादी विचारप्रवाहाचा सामाजिक (वर्गीय आणि जातीय) पाया प्रथमच इतक्या स्पष्टपणे पुढे येतो.




**हिंदू धर्मातील एक अत्यंत महत्त्वाचे स्थित्यंतर**

गीता प्रेस आणि कल्याण मासिकाचा आरंभ म्हणजे हिंदू धर्मातील एक अत्यंत महत्त्वाचे स्थित्यंतर होते. देशातील मारवाडी समाज १८८०-९० पासून व्यापार आणि उद्योगात अग्रणी होता. आधुनिक काळात तयार होणाऱ्या अर्थव्यवस्थेत या समाजाला कळीचे स्थान होते. तशाच प्रकारचे स्थान आपल्या समाजाला देशाच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रांत मिळवण्यासाठी तो प्रयत्नशील होता. या पार्श्वभूमीवर मारवाडी समाजाच्या पुढकाराने आदर्श सनातन हिंदू धर्माचे पुनरुज्जीवन करण्याच्या हेतूने गीता प्रेस आणि कल्याण मासिक सुरू करण्यात आले. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या



दोन दशकांपर्यंत भारतातील हिंदू धर्माचे प्रतिनिधित्व (आणि पर्यायाने नियंत्रण) देशातील हिंदू राजे-रजवाडे, हिंदू जमीनदार मंडळी आणि ब्राह्मण समाजाकडे होते. याचा अर्थ 'हिंदू धर्माचे प्रतिनिधित्व आणि नियंत्रण 'ब्राह्मण-क्षत्रिय' अशा संयुक्त वर्ण-आघाडीकडे होते. गीता प्रेस सुरू होण्यापूर्वी 'मारवाडी गॅझेट', 'मारवाडी सुधार' अशी मासिके एका बाजूला समाजसुधारणा आणि त्याच वेळी सनातन हिंदू मूल्यांचा पुरस्कार करत होती. मारवाडी ज्ञाती संघटनेच्या पुढाकाराने सुरू झालेली गीता प्रेस, कल्याण, कल्याण कल्पतरू ही मासिके आणि वर नमूद केलेली अन्य मासिके यांच्या पंचवीस-तीस वर्षांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे हिंदू धर्माची प्रतिमा बदलली. सनातन हिंदू धर्म मूल्यांचा नव्याने आग्रही पुरस्कार करत राहिल्यामुळे (आणि अर्थातच व्यापार उद्योगातील कळीचे स्थान यामुळे) हिंदू धर्माचे प्रतिनिधित्व 'ब्राह्मण-वैश्य' या संयुक्त वर्णआघाडीकडे आपोआप आले. हे स्थित्यंतर हळूहळू देशभर पसरत गेले. सनातन हिंदुत्वाची सूत्रे ब्राह्मण-वैश्य समाजांच्या नियंत्रणात आली. याचे मुख्य श्रेय गीता प्रेसकडे जाते (संदर्भ : 'द 'माऊथ' ऑफ सनातन धर्म : द रोल ऑफ गीता प्रेस इन स्प्रेडिंग द वर्ड,' या शीर्षकाचा पॉल ॲर्नी यांचा प्रबंध. अमेरिकन अकॅडमी ऑफ रिलिजन ॲन्युअल मीटिंग, वॉशिंग्टन, नोव्हेंबर २०-२३, १९९३ मध्ये सादर झाला). या स्थित्यंतराचा प्रवास अक्षय मुकुल यांच्या ग्रंथातून आपल्या समोर येतो.

देशातील अनेक औद्योगिक घराण्यांचा हिंदुत्ववादी विचारसरणीला थेट पाठिंबा होता (आणि आहे). गांधी-नेहरू काळापासून काँग्रेससहित देशातील अनेक राजकीय पक्षातील हिंदुत्ववादी विचारांचे सहानुभूतीदार असलेल्या नेत्यांचा गीता प्रेस परिवाराशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष, उघड आणि छुपा पाठिंबा होता. हे संबंध अक्षय मुकुल यांच्या संशोधनातून स्पष्टपणे दिसून येतात. स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या काँग्रेस पक्षात असे परस्परविरोधी राजकीय भूमिका असणारे अनेक विचारप्रवाह सतत कार्यरत होते (स्वातंत्र्यानंतरही असे विचारप्रवाह काँग्रेसमध्ये टिकून राहिले होते). याचे नेमके प्रतिबिंब अक्षय मुकुल यांच्या संशोधनात पाहायला मिळते. गीता प्रेस परिवाराने स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही प्रस्थापित हिंदुत्ववादी विचारप्रवाहाचे वाहक म्हणून किती आणि कशी महत्त्वाची भूमिका बजावली आहे, हे नीटपणे समजून घ्यायचे असेल, तर अक्षय मुकुल यांचा हा ग्रंथ मुळातूनच वाचायला हवा.

'दि न्यू इंडिया फाऊंडेशन' या संस्थेच्या अभ्यासवृत्तीचा भाग म्हणून अक्षय मुकुल यांनी गीता प्रेसच्या ऐतिहासिक वाटचालीचे संशोधन केले. आदर्श संशोधनाचे सर्व संकेत, नियम पाळून सुमारे चार वर्षे अक्षय मुकुल यांनी हे संशोधन केले आहे. आपल्या संशोधनातील प्रत्येक तपशील साधार असेल याची खात्री त्यांनी करून घेतली आहे. या संशोधनासाठी मुकुल यांनी गोरखपूर, बनारस, लखनौ या गीता प्रेस परिवाराच्या कार्यक्षेत्रात दीर्घकाळ वास्तव्य केले. गोरखपूर येथील गीता प्रेस कार्यालयात राहून संस्थेचे ग्रंथालय आणि त्यांच्या ऐतिहासिक दप्तरातील दस्तऐवजांचा अभ्यास केला. गीता प्रेसचे संस्थापक हनुमानप्रसाद पोद्दार यांच्या 'पोद्दार पेपर्स' या नावाने प्रसिद्ध असलेल्या पत्रव्यवहाराचा अभ्यास केला. पोद्दार यांचे नातू रसिंदू फोगला यांच्याबरोबर आणि गीता प्रेसच्या आजच्या प्रबंधक, संचालकांबरोबर संवाद साधला. अशा व्यापक प्रयत्नांतून आपले संशोधन आणि निष्कर्ष अधिकाधिक अचूक केले. गीता प्रेसच्या अधिकृत माहितीबरोबरच अक्षय मुकुल यांनी गोरखपूर आयुक्तालयाचा अभिलेख कक्ष, जिल्हा गुप्तचर विभागाचा अभिलेख कक्ष, उ.प्र. सरकारचे पुराभिलेख यातील कागदपत्रांच्या आधारे आपल्या संशोधित माहितीची खातरजमा केली. या संशोधनासाठी अक्षय मुकुल यांनी चेन्नई येथील थिऑसॉफिकल सोसायटी ऑफ इंडिया, 'हिंदू पेपर्स'चे पुराभिलेख, दिल्लीतील नेहरू मेमोरिअल म्युझियम आणि लायब्ररी इ. संस्थांतील कागदपत्रांचा अभ्यास केला आहे. मूळ ग्रंथाच्या परिशिष्टात अशा सर्व संदर्भ सूची आणि संदर्भ स्रोत सविस्तरपणे नोंदलेले आहेत. त्यामुळेच परिश्रमपूर्वक केलेल्या या संशोधनाची विश्वासार्हता आणि दर्जा वादातीत ठरतो.

अत्यंत विस्तृत असा हा ग्रंथ मूळ गाभा हरवू न देता संक्षिप्त रूपात मराठीत तयार करणे अत्यंत आव्हानात्मक काम होते. अक्षय मुकुल यांचा हा ग्रंथ दीर्घ संशोधनावर आधारित आहे. त्यामुळे त्याचा बाज संशोधनात्मक अभ्यासाचा आहे. मराठीत त्याचे संक्षिप्त रूपांतर करताना सर्वसाधारण वाचकांना रुची वाटेल

अशा पद्धतीने लिहिण्याची आवश्यकता होती, तसा प्रयत्न केला आहे. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे महाराष्ट्रातील राजकीयदृष्ट्या सजग नागरिकांचा (मग ते कोणत्याही विचारप्रवाहाचे असोत) असा समज असतो, की 'देशातील हिंदुत्ववादी विचारप्रवाहाचे आद्य प्रवर्तक म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ'! परंतु हिंदू महासभा (स्थापना १९०५), गीता प्रेस परिवार यांच्या माध्यमातून हिंदुत्ववादी विचारप्रवाह रा.स्व. संघाच्याही आधीपासून सक्रिय होता. एवढेच नाही, तर देशातील हिंदुत्ववादी विचारप्रवाहाचे जनकत्व आणि राजकीय सूत्रे उत्तर भारतातील याच गटांकडे जातात. ही वस्तुस्थिती अक्षय मुकुल यांच्या ग्रंथातील अनेक महत्त्वाच्या तपशिलातून पुढे येते. या तपशिलाचे सामाजिक, धार्मिक धागेदोरे मराठी वाचकांना परिचित नाहीत. म्हणूनच अशा तपशिलाचे संदर्भ स्पष्ट करण्यासाठी काही पूरक माहिती देणे आवश्यक होते. त्यानुसार अनेक ठिकाणी आवश्यक पूरक माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. उदाहरणार्थ, एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकापासून पुढे विसाव्या शतकाच्या पहिल्या पंचवीस-तीस वर्षांपर्यंत उत्तर भारतातील मुस्लीम समाजावरील उलेमांचा मोठा प्रभाव होता. यासंबंधी अत्यंत मोलाची माहिती आमचे मित्र आणि मुस्लीम समाजाच्या सामाजिक इतिहासाचे सजग अभ्यासक सरफराज अहमद यांनी दिली. अशा पूरक माहितीचे संदर्भ त्या त्या ठिकाणी नोंदले आहेत.

या संपूर्ण लिखाणाचा उद्देश हिंदुत्ववादी विचारप्रवाहाची ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि वाटचाल एकसंधपणे पुढे यावी, हा आहे. अक्षय मुकुल यांच्या 'गीता प्रेस ॲण्ड द मेकिंग ऑफ हिंदू राष्ट्र' या ग्रंथातून हे उद्दिष्ट पूर्णांशाने साध्य होते. हा ग्रंथ हेच मध्यवर्ती सूत्र ठेवून या पुस्तकाचे लिखाण केले आहे. मूळ ग्रंथातील तपशील वापरताना त्यात कोणताही बदल होणार नाही, याची खबरदारी घेतली आहे. मात्र, त्या तपशिलाचा आजच्या संदर्भात अर्थ लावला आहे. म्हणूनच हे पुस्तक म्हणजे मूळ पुस्तकाचा अनुवाद नाही किंवा केवळ त्या पुस्तकाचे संक्षिप्तीकरण नाही, तर मूळ ग्रंथाचा आधार घेऊन केलेली स्वतंत्र मांडणी आहे, याची वाचकांनी नोंद घ्यावी. सनातनी हिंदुत्ववादी विचारप्रवाहावर टीका करताना अनेकदा 'फॅसिस्ट' किंवा 'प्रतिगामी' विचारसरणी अशी हेटाळणीदर्शक शेरेबाजी केली जाते. अशी तुच्छतादर्शक टीका निकोप राजकीय विचार-संवादाला नक्कीच पोषक नाही. उलट हिंदू धर्मात जन्माला आलेल्या व्यक्तीला या यांत्रिक टीकाटिपणीमुळे ती समग्र हिंदूंवरील टीका वाटते. त्यामुळेच आता हिंदू माणसांच्या मनात अशा टीकेची स्वीकारार्हता कमी होते. आम हिंदू नागरिक अशा यांत्रिक टीकेमुळे उलट फारसा विचार न करता हिंदुत्ववादी विचारप्रवाहाकडे ओढला जातो.

**या सर्व इतिहासाकडे वस्तुनिष्ठपणे पाहावे लागेल**

हिंदुत्ववादी विचारप्रवाहाच्या वाटचालीबद्दलच्या या लिखाणात आणि अक्षय मुकुल यांच्या ग्रंथात ठिकठिकाणी देशातील विविध राजकीय पक्ष, अनेक राजकीय विचारप्रवाहांतील नेते, विचारवंत यांच्यासंबंधी अत्यंत वेगळा तपशील पुढे येतो. काही वाचकांना तो वादग्रस्त वाटू शकतो, न रुचणारा असू शकतो किंवा राजकीयदृष्ट्या गैरसोयीचा असू शकतो. अक्षय मुकुल यांच्या मूळ ग्रंथात हिंदुत्ववादी विचारप्रवाहाची वाटचाल आणि गीता प्रेस हेच केंद्र केले आहे. या ग्रंथाच्या मांडणीतून अक्षय मुकुल यांनी गेल्या शंभरांहून अधिक वर्षांच्या राजकीय वाटचालीचा जणू आरसा वाचकांसमोर धरला गेला आहे. ते प्रतिबिंब आज आपल्याला कदाचित पसंत पडणार नाही. ते स्वाभाविक आहे. मात्र, असे असले तरी त्याची सत्यता लक्षात घेऊन



त्याचा मोकळेपणाने विचार करायला हवा. भारताला एक आधुनिक समतावादी, धर्मनिरपेक्ष, मानवी समाज म्हणून वाटचाल करण्यासाठी या सर्व इतिहासाकडे वस्तुनिष्ठपणे पाहावे लागेल.

भाजप आणि हिंदुत्ववादी विचारप्रवाह भारत हे एक 'हिंदू राष्ट्र' आहे, असे गृहीत धरून आपली सर्व राजकीय धोरणे आखत आहे, राबवत आहे. जातीय उतरंड नव्याने पुनरुज्जीवित केली जात आहे. मुस्लीम आणि अन्य धार्मिक अल्पसंख्याकांवर 'दुय्यम नागरिकत्व' लादले जात आहे. या सर्व धोरणांची पाळेमुळे हिंदुत्ववादी विचारप्रवाहाच्या ऐतिहासिक वाटचालीत स्पष्टपणे सापडतात. स्वातंत्र्यापासून देशाने स्वीकारलेल्या संवैधानिक मूल्ये आणि धोरणांशी अत्यंत विपरीत अशी ही वाटचाल आहे. या पार्श्वभूमीवर अक्षय मुकुल यांचे संशोधन अधिकच महत्त्वाचे ठरते. •••

**('हिंदुत्ववादी राजकारणाच्या पाऊलखुणा' या ग्रंथातील लेखकाचे मनोगत त्यांच्या व लोकवाङ्मयाच्या सौजन्याने.)**



# भटके विमुक्त जमाती : आरक्षण आणि जगण्याचे प्रश्न

**भटके विमुक्त समूहांसाठी आरक्षणाची मागणी लावून धरतानाच समाजात शिक्षणाचा प्रसार, नवे रोजगार मिळविण्यासाठीचा कौशल्यविकास, स्वतंत्र विकास निधी आणि अत्याचारांपासून संरक्षणासाठीचा कायदा, अशा अनेक आघाड्यांवर शांततामय मार्गाने, संविधानाच्या मार्गाने लढा उभा करण्यासाठी भटके विमुक्त जमातीतील विविध समूहांना एकीची वज्रमूठ उभारावी लागेल, तरच राज्यघटनेने दिलेला सन्मानाने जगण्याचा अधिकार समाजातील भारतीय नागरिक मिळवू शकतील.**



सुभाष वारे

भारतीय समाजातील विविध जातीसमूह राजकीयदृष्ट्या जागृत होऊन आरक्षणाच्या मागणीसाठी संघटित होत आहेत. आंदोलनांचे विविध नवे व कल्पक मार्ग वापरून शासन दरबारी आपली मागणी रेटत आहेत. काही जातसमूहांना नव्याने आरक्षणाच्या यादीत स्थान हवे आहे, तर काही जातसमूहांना आधी मिळालेला आरक्षणाचा प्रवर्ग बदलून हवा आहे, तसेच काही जातसमूहांना आधीच मिळालेल्या प्रवर्गात वर्गीकरणासह स्वतंत्र आरक्षण हवे आहे. भारतातील लोकशाहीला डोकी मोजून निर्णय करावयाच्या तांत्रिक व्यवस्थेचे स्वरूप आलेले आहे. आंदोलनांच्या मागणीची न्यायोचितता तपासून निर्णय होण्याऐवजी सरकारची राजकीय कोंडी करण्याच्या आंदोलकांच्या क्षमतेवर निर्णय होण्याचे प्रघात पडत आहेत. आरक्षणाच्या विविध मागण्यांमध्ये दबून राहिलेला एक क्षीण आवाज आहे भटके विमुक्त समूहांच्या आरक्षण मागणीचा. भटके विमुक्त जमाती हे नाव सतत कानावर पडत असले तरी या समूहामधे नेमक्या कुठल्या जमाती येतात, त्या कुठे राहतात, भारतीय जातीव्यवस्थेत यांचे स्थान नेमके काय? त्या पूर्वी कुठले व्यवसाय करायच्या, आता त्या कशा जगत आहेत? कुठे राहत आहेत या मुद्यांबद्दल सत्तास्थानाभोवती वावरणाऱ्या अभिजनवर्गाला फारशी माहिती नसते.

**घटनात्मक संरक्षण नसल्याने समाजाला फार फायदा होत नाही**

स्वातंत्र्यलढा पुढे सरकत असताना भारतीय नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे आणि त्याचबरोबर विकासाचे मुद्दे पुढे सरकत होते. शोषित जातीसमूहांना संरक्षण, त्यांच्यासाठी विशेष प्रतिनिधित्व, विकास निधी याची चर्चा व त्याबाबत काही निर्णय होत होते. असे निर्णय करण्यासाठी १९३५ च्या ब्रिटिश इंडिया ॲक्टनुसार (SC) म्हणजे अनुसूचित जाती आणि बॅकवर्ड ट्राईब्ज (त्यावेळी बॅकवर्ड ट्राईब्स म्हणजे प्रिमिटीव ट्राईब्ज, हिल व फारेस्ट ट्राईब्ज व कुठे कुठे क्रिमिनल वंडरिंग ट्राईब्ज यामधे येत). पुढे मग संविधानाची निर्मिती होताना सध्या प्रचलित असलेली अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST) व अन्य मागास जाती (OBC) असे वर्गीकरण स्वीकारले गेले. सर्वसाधारणपणे अनुसूचित जातींमधे वर्गीकरणासाठी अस्पृश्यतेचा जाच, अनुसूचित जमातींसाठी भौगोलिक व सांस्कृतिक

वेगळेपण व वैशिष्ट्ये आणि इतर मागासवर्गातील वर्गीकरणासाठी शैक्षणिक व सामाजिक मागासलेपण हे निकष स्वीकारण्यात आलेले दिसतात. स्वातंत्र्यपूर्वकाळातील ब्रिटिश इंडिया ॲक्टच्या वर्गीकरणानुसार ज्याला आपण आज भटके विमुक्त जमाती म्हणतो त्यातल्या अनेक जमाती या त्या वेळच्या आरक्षणाच्या कक्षेत येत होत्या. संविधाननिर्मितीच्या काळात मात्र स्वीकारलेल्या वरील वर्गीकरणानुसार भटके विमुक्त जमाती या अनुसूचित जाती वा अनुसूचित जमातींमधे वर्गीकृत करण्याच्या कामात काटेकोरपणा राहिला नाही. त्यावेळी गुन्हेगार जमाती कायदा लागू होता. समाज तारेच्या कुंपणातील जबरदस्ती अधिवासात (सेटलमेंट) जीवन कंठत होता. समाजात शिकून पुढे आलेले व समाजाची बाजू प्रभावीपणे मांडू शकेल, असे नेतृत्व फारसे नव्हते. देश फाळणीच्या आणि हिंसाचाराच्या वेदनेतून जात होता. या वातावरणात काही भटके विमुक्त जमाती काही राज्यांत अनुसूचित जमातींमधे नोंदल्या गेल्या. थोड्या काही जमाती कुठे-कुठे अनुसूचित जातींमधे नोंदल्या गेल्या. बऱ्याचशा जमातींबाबत मात्र काहीच निर्णय झाला नाही. एक विशिष्ट जमात एका राज्यात (SC) मध्ये, तर दुसऱ्या राज्यात (OBC) मध्ये असाही फरक पडला. त्या काळात राज्ये अस्तित्वात नव्हती, तर प्रांतवार विभागणी होती (प्रोव्हिन्सेस). पुढे राज्ये अस्तित्वात आल्यावर नवे गोंधळ समोर आले. एका राज्यात वेगवेगळ्या प्रांतांचे (प्रोव्हिन्सेसचे) भाग समाविष्ट झाल्याने एक विशिष्ट जमात राज्याच्या एका भागात (SC) मध्ये, त्याच राज्याच्या दुसऱ्या भागात (ST) मध्ये तर तिसऱ्या भागात (OBC) मध्ये अशा विसंगती तयार झाल्या. विशेषतः महाराष्ट्र या जमातींना आरक्षणाच्या कक्षेत आणण्याच्या बाबतीत खूपच मागे राहिला. (SC) आणि (ST) समूहांच्या निमित्ताने सत्तेत वाटेकरी आलेच आहेत. आता भटके विमुक्तांच्या निमित्ताने सत्तेत आणखी वाटेकरी नकोत, अशीच भावना परंपरेने सत्तेत असलेल्या वर्गांची राहिली. महाराष्ट्रात शेवटी भटके विमुक्तांचे स्वतंत्र वर्गीकरण करून त्यांना चार टक्के आरक्षण विभागून मिळाले. ते आरक्षण अपुरे तर आहेच; पण त्यासोबत घटनात्मक संरक्षण नसल्याने समाजाला फार फायदा होत नाही.

भटके विमुक्त मानल्या गेलेल्या समूहात १८७१ च्या कायद्याने गुन्हेगार मानल्या गेलेल्या जमाती ज्यांना आज विमुक्त जमाती मानले जाते हा एक गट आहे. पशुपालक भटक्या जमातींचा दुसरा गट आहे आणि निमभटक्या किंवा फिरस्त्या जमातींचा तिसरा गट आहे. या सर्वांचे प्रश्न वेगवेगळे आहेत.

**पंचांकडून होणारे आर्थिक शोषण हाही गंभीर प्रश्न**

जमीन किंवा घरदार नसणे, कुठलाच ठिकाणा नसल्याने हक्काचे गाव नसणे, अशा परिस्थितीमुळे मतदार यादीत नाव नाही, रेशन कार्ड नाही, भटक्या व अस्थिर जीवनामुळे जातीच्या प्रमाणपत्रासाठीचे निकष पुरे करता येत नसल्याने शासनाच्या अनेक योजनांचा लाभ घेता येत नाही. समाजात शिक्षणाचा प्रसार अत्यल्प आहे. अंधश्रद्धा आणि व्यसनाधीनतेच्या आहारी गेल्याने अनेक जणांनी आयुष्य उद्ध्वस्त करून घेतलेले आहे. एकेकाळी, स्थानिक शहाणपणाच्या आधारे समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी उभ्या राहिलेल्या जातपंचायती आता नव्या युगात महिलांवरील अन्यायाला पाठबळ देणारी भूमिका



## ...या जमातींच्या कपाळावर जन्मजात गुन्हेगार असल्याचा शिक्का

भारतातील ब्रिटिश राजवटीला आव्हान देणारे लढे अगदी सुरुवातीपासून जंगलातील आदिवासी समूहांनी आणि भटके जीवन जगणाऱ्या काही लढाऊ जमातींनी उभारले. निवेदने-आंदोलने-सत्याग्रह या मार्गाने पुढे सरकलेल्या व ज्याचा सविस्तर इतिहास लिहिला गेला आहे, अशा सनदशीर स्वातंत्र्यलढ्यापेक्षा वर नमूद असलेल्या समूहांनी केलेल्या विरोधाची ब्रिटिशांनी अधिक दहशत व दखल घेतल्याचे दिसते. मात्र, आदिवासी आणि भटक्या जमातींनी केलेल्या ब्रिटिशविरोधी लढ्यांना भारतीय इतिहासलेखनाने अद्याप पुरेसा न्याय दिलेला नाही. या विरोधाचा बंदोबस्त करण्यासाठी ब्रिटिश सरकारने १८७१ मधे गुन्हेगार जमाती कायदा आणून या जमातींच्या कपाळावर जन्मजात गुन्हेगार असल्याचा शिक्का मारला. निर्बंध घालणारे विविध कायदे आणि जबरदस्तीने तारेच्या कुंपणातील अधिवास (सेटलमेंट) व्यवस्था बनवून त्यांच्या हालचालींवर बंधने घातली गेली. खरे म्हणजे एखाद्या जमातीत जन्माला येणाऱ्या कुणावरही असा जन्मतः गुन्हेगार असल्याचा शिक्का मारणे हे नैसर्गिक न्यायाच्या, माणुसकीच्या विरोधी कृत्य आहे; पण भारतात आपले साम्राज्य स्थिर करण्यात याच जमातींचा मोठा अडथळा आहे, हे ब्रिटिशांनी ओळखल्याने त्यांनी असे अमानवीय पाऊल उचलले.

आज या समाजाची अवस्था फार बिकट आहे. पूर्वी निसर्गाच्या सान्निध्याने आपलं पोट भरत फिरणाऱ्या पारधी, कोल्हाटी, फासेपारधी, डोंबारी, रामोशी, बेलदार, नंदीबैलवाले, माकडवाले, मसणजोगी, चित्रकथी, वडार, कैकाडी, बेरड, कंजारभाट, डवरी गोसावी, अशा कितीतरी जमातीतील लोक या तथाकथित विकसित जगात उपरे ठरत आहेत. घरदार नाही, जमीनजुमला नाही, गाव नाही, खरं म्हणजे नागरिकत्वाचीच ओळख नाही, अशी यातील बहुतेकांची स्थिती आहे. महाराष्ट्रात होणाऱ्या जातीय अत्याचारांच्या घटनांपैकी किमान निम्म्या अत्याचाराच्या घटनांत या जमातींचे लोक (विशेषतः महिला) बळी पडलेले आहेत; पण जातीय अत्याचार प्रतिबंधक कायद्याचे घटनात्मक संरक्षण या समूहांना नाही.

घेण्यापुरत्या राहिलेल्या आहेत. वाळीत टाकले जाण्याच्या भीतीने पंचांकडून होणारे आर्थिक शोषण हाही गंभीर प्रश्न. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे औद्योगिकीकरण आणि नंतरच्या जागतिकीकरणामुळे या समूहांचे परंपरागत व्यवसाय पूर्णपणे नष्ट झालेले आहेत. पर्यावरण व वन्यजीवविषयक कायद्यांमुळे माकडवाले, नंदीबैलवाले, दरवेशी, अशा काहींचे व्यवसाय नष्ट झालेत. दारूबंदी धोरणानुसार परवाना असलेली दारू बनविण्याचे व्यवसाय पुढारलेल्या समाजाच्या हातात आलेत; पण परंपरेने दारू गाळणाऱ्या कंजारभाट समाजाचा व्यवसाय मात्र नव्या कायद्यांनी बेकायदेशीर ठरला आहे. नव्या जमान्यातील नवे रोजगार मिळविण्यासाठी आवश्यक कौशल्ये नाहीत व तशी मानसिकताही समाजाजवळ नाही. अशा अतिशय हलाखीच्या अवस्थेत जगणारे हे समूह अद्याप आपली ओळख शोधत आहेत. त्यांच्या जवळील निर्मितीक्षम कौशल्यांना आधुनिक जगात स्थान नाही. देशात नकली राष्ट्रवादाचा बोलबाला सुरू आहे; पण या मातीतले भटके विमुक्त समुदाय मात्र या देशातले असूनही अजून आपल्या स्वतःच्या ओळखीच्या शोधात आहेत.

**जातवार जनगणनेच्या मागणीला केंद्र सरकारचा ठाम नकार**

यातील बहुतेक जमाती या (ST) मध्ये वर्गीकृत होण्याचे निकष पूर्ण करतात. भौगोलिक वेगळेपण, स्वतःची संस्कृती व परंपरा आणि नागरी समाजात सामील होतानाचे बुजरेपण हे ते निकष. त्यामुळे आम्हाला अनुसूचित जमातीत सामील करा, अशी या समूहांची मागणी आहे. भटके पण गावाजवळ अधिवास करताना ज्यांना अस्पृश्यतेचे चटके सहन करावे लागले, अशा काही जमातींना अनुसूचित जातींमधे सामील करावे, अशीही मागणी आहे. हे करायचे तर आधीपासून (SC) व (ST) मध्ये वर्गीकृत असलेल्या जाती-जमातींना विश्वासात घेऊन व त्यांच्या हक्कावर अतिक्रमण होणार नाही, अशा पद्धतीने हे काम करावे लागेल; पण भटके विमुक्त समाजातील जाणत्यांमधे याबाबत एकवाक्यता नाही. समाजातील काही कार्यकर्त्यांना वाटते, की यासाठी घटनादुरुस्ती करावी लागेल व ते अवघड काम आहे. त्यांचे म्हणणे आहे, की आम्ही ओबीसी पण नाही आहोत; त्यामुळे आमचे स्वतंत्र श्येड्यूल बनवून आम्हाला स्वतंत्र व लोकसंख्येच्या प्रमाणात पुरेसे आरक्षण मिळावे. अलीकडे मराठा आरक्षण व वाढीव ओबीसी आरक्षणाच्या निमित्ताने सर्वोच्च न्यायालयाने सक्रिय होऊन जे निर्णय दिलेत ते पाहता हे कामही अवघडच दिसतेय. दुसरीकडे, खाजगीकरणाच्या प्रक्रियेने वेग घेतला आहे. खाजगीकरणाच्या प्रचंड रेट्यात सरकार अनेक क्षेत्रांतील आपल्या जबाबदाऱ्या झटकून टाकत असताना आरक्षणाच्या कक्षेतील जागाच कमी होत आहेत, याकडे तर कुणाचेच लक्ष नाही. अशा परिस्थितीत अंदाजे पंधरा कोटी लोकसंख्या असलेल्या भटके विमुक्त समूहांपर्यंत भारतीय राज्यघटनेने दिलेला सन्मानाने जगण्याचा हक्क पोहोचेल यासाठी समाजात फार मोठी जागरूकता व एकजुटीने आंदोलनाची गरज आहे. मुळात या समूहांसाठी विकास योजना राबवायच्या, तर त्यांची नेमकी संख्या किती आणि त्यांची आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक स्थिती काय आहे हे समजण्यासाठी जातवार जनगणनेची गरज आहे. तशी तर मराठा आरक्षण व ओबीसी आरक्षणाच्या संदर्भातील सर्वोच्च न्यायालयाच्या अलीकडील निर्णयांमुळे ओबीसी आरक्षण टिकवायचे असेल, तसेच मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावायचा असेल, तर



त्यासाठीसुद्धा जातवार जनगणनेची गरज आहे; पण केंद्र सरकारने मात्र या मागणीला ठाम नकार दिलाय.

भटके विमुक्त समूहांसाठी आरक्षणाची मागणी लावून धरतानाच समाजात शिक्षणाचा प्रसार, नवे रोजगार मिळविण्यासाठीचा कौशल्यविकास, स्वतंत्र विकास निधी आणि अत्याचारांपासून संरक्षणासाठीचा कायदा, अशा अनेक आघाड्यांवर शांततामय मार्गाने, संविधानाच्या मार्गाने लढा उभा करण्यासाठी भटके विमुक्त जमातीतील विविध समूहांना एकीची वज्रमूठ उभारावी लागेल, तरच राज्यघटनेने दिलेला सन्मानाने जगण्याचा अधिकार समाजातील भारतीय नागरिक मिळवू शकतील. •••

**(लेखक ज्येष्ठ समाजवादी कार्यकर्ते आहेत.)**

# मौनाला धर्म असतो का?

**भारतीय मुसलमान भाजपच्या राज्यात प्रचंड द्वेषही अनुभवतो आहे. त्याला सर्व क्षेत्रांतून वगळायचेही कार्यक्रम आरंभले आहेत. त्याचे अस्तित्वच मानायचे नाही म्हटल्यावर प्रतिनिधित्वाचा मुद्दा येईलच कसा? सावरकर, गोळवलकर यांनी मुसलमानांना देऊ केलेला दुय्यम दर्जा मोदी सरकार प्रत्यक्षात आणत आहे. राजकारणातून त्यांना शून्यवत केले, की अर्थकारण, समाजकारण यांतूनही बेदखल करायचा बेत यशस्वी होत चालला आहे.**



जयदेव डोळे

तुम्ही हिंदी न्यूज चॅनलच्या चर्चा नीट ऐकल्या, तर तुम्हाला आतून भांडण चालल्याचा भास होऊ लागेल. थोड्या वेळाने सगळे एकाच वेळी बोलू लागले, की काहीच ऐकू येईनासे होईल. मग कुठे सूत्रधार बाई अथवा बाबा मध्ये पडल्यासारखे करीत भांडणाऱ्यांना थांबवतो. सगळेच बाप्ये लोक असल्यामुळे ते गप्प बसतात. ती शांतता पुन्हा काही क्षणांनी येणाऱ्या वादळाची खूण असते. परत कुणी तरी चिडवते, टोमणे मारते आणि खिजवते. सुरू होतो चर्चा, वाद, खंडणमंडण यांचा एकत्र मारा. शांततेत एखादा प्रश्न समजावून घेण्याची अन् सांगायची रीतच आता भारत विसरला आहे, असे जाणवू लागले आहे. साताठ वर्षे झाली. सौम्य, शांत सुरात भारतीय माणूस बोलेनासा झाला आहे. त्याला मुद्दाम चेतवले जात आहे, भडकावले जात आहे. हे भडकावणे, उत्तेजित करणे अकारण होत नाही. चर्चांचे ८५ टक्के विषय हिंदू-मुस्लीम असेच असतात. उघड आहे, हिंदूंना मुसलमानांविरुद्ध चिथावण्यासाठी असे विषय हाताळले जातात. दोन भिन्न धर्मीय परस्परांना भिडवले की होणार काय? धुमसणारे वातावरण तयार होणार आणि ठिणगीची वाट बघत बसणार. बऱ्याच दिवसांनी म्हणजे शेतकऱ्यांच्या आंदोलनानंतर धर्माचा समावेश नसणारे अग्निपथाचे आंदोलन सुरू झाले. ते खरे तर, नागरिक विरुद्ध सरकार असे आरंभले; पण लष्कराने ते आपल्याकडे ओढले आणि चक्क आंदोलकांना ते दटावू लागले. लोकशाहीत सैन्यदलांचा शिरकाव असा आंदोलनांनिमित्त भारतात दिसू लागला आहे. भाजप सोडता सारे राजकीय पक्ष या हस्तक्षेपाला आक्षेप घेत आहेत. पुन्हा एकदा ते विरुद्ध आम्ही, असे वातावरण भाजपने व मोदी सरकारने रुजवले. देशाचीही दुभंगावस्था झाली. आजकाल देशात सर्व प्रश्नांच्या फक्त दोनच बाजू असतात. हो-नाही, चूक-बरोबर, आमच्याबरोबर-आमच्याविरुद्ध, हिंदू-मुस्लीम, स्त्री-पुरुष, सवर्ण-दलित...

या गोंगाटात खूप जण गप्प आहेत. त्यांना हे वातावरण सहन होत नाही. चारचौघांसारखेच ते भारताचे नागरिक आहेत. तरीही मौन




का राहावे लागते आहे त्यांना? त्यांनी बिनातक्रार राहावे. सोशीक असावे. गुलाम जगत राहावे, असे त्यांना बजावले जात आहे. कोण आहेत ते? त्यांना चूप का व कोण करते आहे? ते उलगडून घ्यायचे असेल, तर 'चिडीचूप्प' हा काव्यसंग्रह वाचावा लागेल. रफीक सूरज त्याचे कवी आहेत. कविता आत्माविष्काराचा एक प्रकार; पण आता भारतीयांवर विविध कारणांनी या आविष्कारावर बंधने येत आहेत. रफीक यांना त्यांचा धर्म राज्यकर्त्यांना शत्रूसम वाटतो म्हणून कवी असूनही कविता लिहिता येत नाहीत, असा अनुभव येत आहे. त्यांची 'चिडीचूप्प' कशी झाली, याचे वर्णन करणारी ही कविता पाहा-

**वेगाने पसरत चाललेल्या**
**मौनाच्या घनदाट अरण्यात**
**पायात असलेच नाही त्राण**
**नीट कण्हता येत नाही की धड शब्दोच्चार**
**पापण्यांची साधी उघडझापही ठरतेय खूप त्रासिक**
**मरण जवळ आलेय असे वाटतेय खरे**
**अशा अगम्य गूढ चमत्कारिक अवस्थेत**
**एकाच जागी खिळून वाटावाटांच्या जंजाळात...**

**मौनाच्या घनदाट अरण्यात**
**कसली निबिड शांतता**
**वाहतेय चोहो दिशांनी?**
**या थंडगार शांततेत**
**गारठून निरुत्तर झालीय सर्वांगाची त्वचा**
**घनदाट अरण्यही**
**निपचित पडून राहिलंय मलूलपणे**
**हतबल कवितेसारखं...**
**ह्या कसल्या हालचाली जाणवताहेत?**
**मुंग्या गोळा व्हाव्यात**
**तसा केवढा मोठा समूह अचानक कुठून आला?**
**भराभर चालत, पताका नाचवत तो सरसावतो आहे**
**समूहातले अनेक जण मोठमोठ्याने ढोल पिटताहेत**
**पण आवाज गोठून गेला आहे**
**अनेक जण कानठळ्या बसणाऱ्या घोषणा देत असावेत;**
**पण फक्त त्यांच्या ओठांच्या हालचालीच दिसत आहेत**
**ध्येय साध्य झाल्याच्या मदमस्त**
**विजयी उन्मादात ही मिरवणूक निश्चित दिशेने**
**आक्रमकपणे पुढे पुढे जात आहे**
**वाटावाटांच्या जंजाळातून...**

झुंडशाहीची दहशत हा या कवितेचा विषय. गेल्या साताठ वर्षांत झुंडींनी किमान ८० मुस्लीम ठार मारले. कारण काय? ते कधीच उघड झाले नाही. संशय वाटला, मारून टाकले. शंका आली, केली हत्या. अशा जमावाकडून काय केले जाते आणि होते काय, याचे वर्णन ही कविता करते. या कवितेतली असहायता, दुर्बलता फार प्रखरपणे व्यक्त होते. या हतबलतेमधून मौनाचे घनदाट अरण्य उगवले आहे. मृत्यूपूर्वी मौन येऊन आधी उभे राहते. तसा या कवितेतला असहाय जीव मृत्यूची चाहूल त्याच्या आसपास फैलावलेल्या मौनामधून घेतो आहे.

पण हे मौन नपुंसक नसते, याची जाणीव कवीला आहे. मौन म्हणजे एखाद्या स्फोटाआधीची प्रतीक्षा. पेटत जाणाऱ्या वातीचा रोखलेला श्वास. नेम धरलेल्या बंदुकीने दाबून ठेवलेला दम. हल्लेखोराचा प्रतिकार करण्याआधी घेतलेला पवित्रा. मारेकऱ्याच्या हातून सांडून गेलेला एक पुरावा. रफीक सूरज 'ओल' या कवितेत म्हणतात –

**तुम्ही इतके कसे**
**रक्षकठोरनिबरपत्थरदिल?**
**तरारून आलेली कोवळी लुसलुशीत हिरवळ**
**बेदरकारपणे लष्करी टाचांनी रौंदाळणारे...**
**तुमची धारधार शस्त्रेही क्रूरपणे**
**चिरत असतात कोवळ्या लुसलुशीत पात्यांची**
**जगण्याची नैसर्गिक जीव्हाग्रे!**
**तेव्हा तडफडत्या मरणपोळ्यातून टपकतात**
**थंडगार मौनाचे काही थेंब तुमच्या नकळतपणे**
**आणि करतात जतन अस्तित्वाची ओल**
**हिरवळीच्या मुळाशी चिवटपणे...**

हिंसा करणारे बेफाम होतात आणि परिणामांची पर्वा करीत नाहीत. म्हणूनच खुनाला वाचा फुटते. अविचारी कृत्य खरे तर, अमानुष असते. माणूस आणि विचार यांचा सांधा निखळला, की सुरू होते हिंसा. प्राण्यांना विचार नसतात. ते त्यांना करता येत नसतात. भक्ष्य गाठताना त्यांच्या हालचाली विचारी माणसासारख्या वाटतात; पण तसे नसते. पोटाने सुचवलेल्या कारवायांना भुकेपुरतेच मर्यादित ठेवले पाहिजे. म्हणून कवी म्हणतो, की मारेकऱ्याच्या बेसावधपणामुळे नव्या जिवाची तरतूद आपोआप होत असते. फक्त ती शांततेत, मूकपणे होऊन जाते.

भारतीय मुसलमान भाजपच्या राज्यात प्रचंड द्वेषही अनुभवतो आहे. त्याला सर्व क्षेत्रांतून वगळायचेही कार्यक्रम आरंभले आहेत. त्याचे अस्तित्वच मानायचे नाही म्हटल्यावर प्रतिनिधित्वाचा मुद्दा येईलच कसा? सावरकर, गोळवलकर यांनी मुसलमानांना देऊ केलेला दुय्यम दर्जा मोदी सरकार प्रत्यक्षात आणत आहे. राजकारणातून त्यांना शून्यवत केले, की अर्थकारण, समाजकारण यांतूनही बेदखल करायचा बेत यशस्वी होत चालला आहे. 'संभ्रम' या कवितेत कवी या पार्श्वभूमीवर म्हणतो–

**अलीकडे भीतिदायक**
**परिस्थिती उद्‌भवली आहे काय?**
**याविषयी स्पष्टपणे बोलले जात नाही**
**रकानेच्या रकाने भरलेल्या**
**अमानुष विध्वंसाच्या बातम्या**
**आपल्या अजस्र अदृश्य हातांनी**
**इतक्या सहजतेने कोण पुसून टाकतो आहे?**
**त्यासंदर्भात जाणीवपूर्वक मौन**
**धारण केले जात आहे...**
**नेमकी परिस्थिती काय आहे?**
**याविषयी संभ्रम वाढतोय...**
**घरात विषारी वायुगळीच्या दर्पाने जीव**
**गुदमरला म्हणून बाहेर पडावे तर**
**दारातच खोदून ठेवलेली निखाऱ्यांची खाई**
**म्हणजे यापुढे नैसर्गिकपणे काही घडेल**
**याची शाश्वती देता येणार नाही...**

देशातल्या प्रत्येक मुसलमानाला असेच वाटत असणार. तो बोलत काहीच नाही. कारण त्याचा त्याच्या घरातही जीव गुदमरतो आहे. रफीक सूरज एक पुरोगामी, परिवर्तनवादी नागरिक आहेत. त्यांना धर्म, परंपरा, प्रथा, कर्मकांडे यांचा जाच होतो. त्यावरचा त्यांचा रोष ते कठोर प्रतिमेत व्यक्त करतात. बाहेरची निखाऱ्यांची खाई कोणी खोदून ठेवली, याची कल्पना त्यांना आहे. केवळ धर्म वेगळा म्हणून जगू द्यायचे नाही, असा जप करणाऱ्यांबद्दल कवी म्हणतो, की यापुढे बहुधा निसर्गक्रमाने मरण येईल, याची खात्री नाही. त्यातच संभ्रम वाढतो आहे. स्पष्टपणे ना कोणी सांगते, ना दाखवते. मौन मुद्दाम पांघरून या बरबादीकडे कोणीतरी बघते आहे. त्यांची एक छोटी कविता फार मर्मभेदक आहे–

**तीव्र घुसमट**
**मन हे उदास**

**छळतो दिवस**
**रात्रभर**
**बोलता न यावी**
**अंतरीची गाज**
**कठोर रिवाज**
**पाळो लागे**

बहुसंख्याकांची बेगुमान सत्ता एक डाव टाकत असते. आपल्याला जे नकोसे असतात त्यांची आधी यथेच्छ बदनामी करायची, त्यांच्याबाबत कंड्या पिकवायच्या. गैरसमज, अफवा, अपप्रचार यांचा भडिमार करायचा. मग भाबड्यांचा आपोआपच होकार मिळतो. नकोशांचा काटा काढयचा. माध्यमे, व्यासपीठे, विद्वान, कलाकार असे कोणी बाजू स्पष्ट करायला पुढे येत नाहीत. खरे काय ते कोणी जाणू इच्छित नाही. त्यानिमित्ताने 'संवाद' या कवितेत रफीक सूरजवाला काय गाऱ्हाणे मांडतात ते पाहा –



**कधीपासून मी तुम्हाला**
**आवाज देतो आहे**
**तुमचे माझ्याकडे लक्ष वेधले जावे**
**म्हणून मी मघापासून वेगवेगळ्या**
**खटपटी–क्लृप्त्या करीत धडपडतो आहे**
**पण तुम्ही तर ढुंकूणही बघत नाही आहात!**
**मी संवादाला फारसा उत्सुक नसतो**
**अशीच तर तक्रार होती नं**
**तुमची कालपर्यंत माझ्याबद्दल?**
**पण इथे तर आता स्पष्ट दिसतोच आहे की**
**तुमचा रिझर्व्ह ॲटिट्यूड**
**मग कसं मिटणार**
**अशा प्रकारच्या संवादाचं वन वे ट्रॅफिक?**
**हॅलो. आहो, ऐकून तर घ्या –**
**मी काय म्हणतोय ते!**
**असे काय रागाच्या भरात**
**पाठ फिरवून चालायला लागलात!**
**तुम्ही निघून गेल्यावर मी कुणाला ऐकवू**
**माझ्या घशात गुठंगळून राहिलेले शब्द?**
**तुम्ही मला व्यक्त व्हायला संधी तर द्यायला हवी!**

साद घालूनही जर प्रतिसाद मिळत नसेल, तर ऐकणाऱ्याच्या मनात खोट आहे, हे स्पष्ट आहे. वेगळ्या वस्त्या, शाळा, रस्ते, दवाखाने, असा सारा स्वतंत्रतेचा स्वीकार करीत जाणाऱ्या बहुसंख्याकांना काय गरज पडावी अल्पसंख्याकांशी संवादाची? तरीही कवी सांगतो आहे, की चला, माझ्याशी बोला; पण नाही. अहंकारी, अडेलतट्टू आणि हिंसक बहुसंख्येला तसे संबंधच ठेवायचे नाहीत.

प्रा. रफीक यांनी अन्य विषयांवरही कविता लिहिलेल्या आहेत. मात्र, आजच्या मुलसमान भारतीयांची जी स्थिती संघ परिवार आणि हिंदुत्ववादी बनलेल्या (आणि त्यामुळे मुस्लीमद्वेष्ट्या झालेल्या) भारतीयांनी करून टाकली, त्यावर मराठीत प्रथमच इतकी स्पष्ट नोंद केली आहे. माध्यमांमधून अथवा चर्चा, अधिवेशने इत्यादी कार्यक्रमांमधून मुस्लिमांची गाऱ्हाणी ऐकू येतात. मात्र, त्यांची खोली आणि व्याप्ती सांगायला एखादा कवीच लागतो. तो कविधर्म रफीक यांनी उत्तम पाळला आहे. दहशतीच्या वातावरणात मुसलमान जगतो आहे. तो भ्यायलेला आहे का? त्याने सर्व आशा सोडल्या आहेत का? त्याला आता सर्व राजकीय पक्षांनी एकटे पाडले आहे का? धार्मिक मुद्यांपुरतेच मुसलमानांना बोलायला भाग पाडले जात आहे का? या प्रश्नांची उत्तरे आता तमाम भारतीयांनी दिली पाहिजेत. मुसलमान फक्त त्यांचे प्रश्न सोडवतील अन् हिंदू धर्मीय, त्यांची अशी विभागणी आता उपयोगाची नाही. प्रत्येकाने प्रत्येकाची बोच व त्रास कमी कसा होईल यात वाटा उचलला पाहिजे. रफीकसारख्यांना जर काही रिवाज काचत असतील, तर त्यांना समविचारी नागरिकांनी साथ देऊन त्यात घट कशी होईल, ते पाहिले पाहिजे. धर्म ही बाब खाजगी असते. विद्यमान राज्यकर्ते मुद्दाम धर्माला राज्यकर्त्या पोषाखात पुढे आणत आहेत. त्यामुळे भाबडा मुसलमान धर्म व राजकारण यात भेद असतो, हे विसरू लागला आहे. तोही धार्मिक राजकारण करणाऱ्या ओवेसींसारख्यांच्या नादी लागू शकतो. सबब, ते तसे म्हणून आम्ही असे, अशा प्रकारच्या प्रतिबिंबांना आपल्या राज्यघटनेने कधीही स्थान दिलेले नाही, हे प्रत्येकाने लक्षात ठेवावे. •••

**(लेखक ज्येष्ठ माध्यमतज्ज्ञ आहेत.)**

**चिडीचूप्प**

**लेखक : रफीक सूरज**

**प्रकाशन : शब्द प्रकाशन**

**किंमत : १२० रुपये**

**पृष्ठे : ६७**



# भाजप का जिंकतो, त्याला हरवणार कसे ?

**विरोधकांनी निवड केलेल्या उमेदवाराला काँग्रेसचा पाठिंबा राहील, अशी भूमिका घेण्यात आली. काँग्रेससारख्या राष्ट्रीय पक्षाला स्वतःचा उमेदवारही देता आलेला नाही. विरोधकांसाठी भाजपविरोधातील लढाई काँग्रेसमुळे अधिक अवघड झाली असली तरी, काँग्रेसला वगळून ही लढाई लढताही येत नाही. या कोंडीतून विरोधकांना काँग्रेसलाच बाहेर काढावे लागेल. त्यामुळे पुढील दोन वर्षांच्या काळात काँग्रेस स्वतः हून मजबूत होण्यासाठी किती आणि कोणते प्रयत्न करतो, त्यावर भाजपविरोधातील विरोधकांच्या लढाईची तीव्रता ठरेल. भाजपला हरवण्यासाठी सक्षम काँग्रेस हाच पर्याय असू शकतो.**

**विचक्षण बोधे**

केंद्रातील मोदी सरकारला नुकतीच आठ वर्षे पूर्ण झाली आहेत. आता भाजपची आगामी लोकसभा निवडणुकीची तयारी सुरू झाली आहे. उत्तर प्रदेशमधील विधानसभा निवडणुकीत भाजपने प्रचंड यश मिळवले आहे. राष्ट्रपतीपदाच्या उमेदवाराचाही विजय सोपा झाला आहे. भाजप सातत्याने विजयी का होतो, विरोधकांना भाजपवर मात का करता येत नाही?

काँग्रेस आणि भाजप या दोन राष्ट्रीय पक्षांतील फरक असा की, काँग्रेसमधून बाहेर पडून नेत्यांनी प्रादेशिक पक्ष काढले, ते वाढवले आणि आपापल्या राज्यांमध्ये सत्ता मिळवली. त्यातून काँग्रेस कमकुवत होत गेली. भाजपचा प्रवास उलट्या दिशेने झाला आहे. भाजपने शिवसेनेसारख्या प्रादेशिक पक्षांशी युती केली, त्यांचे बोट धरून राज्या-राज्यांत बस्तान बसवले, स्वतःचा पाया बळकट केला. पक्षविस्तार केला आणि सत्ता मिळवली. प्रादेशिक पक्ष कमकुवत झाले. आताच्या बंडामुळे महाराष्ट्रात शिवसेनेची दोन शकले झाली



आहेत, त्यामागील 'महाशक्ती' नेमकी कोण आहे, हे उघड गुपित होते. अन्य राज्यांतील प्रादेशिक पक्षांनी भाजपचा धोका ओळखलेला असल्याने हे पक्ष भाजपला कडाडून विरोध करताना दिसतात; पण, भाजपला राष्ट्रीय स्तरावर हरवणार कसे, हा प्रश्न आहे.

**विकासाचा देखावा**

गेल्या महिन्यात केंद्रातील मोदी सरकारने सत्तेतील आठ वर्षे पूर्ण केली, त्याचा भाजपने गाजावाजाही केला. कोरोनामुळे दोन वर्षे केंद्राच्या त्या-त्या वर्षाचा वर्षपूर्तीचा सोहळा करता आला नव्हता. यावेळी कोरोना तुलनेत नियंत्रणात असल्याने भाजपने केंद्रीय मंत्री, नेते, पदाधिकारी या सर्वांनाच लोकसंवाद साधण्यासाठी वेगवेगळ्या लोकसभा मतदारसंघांत पाठवले होते. २०२४ मधील लोकसभा निवडणुकीच्या पूर्वतयारीचा हा भाग होता, असे म्हणता येईल. मोदी सरकार विकासाचे काम करत असल्याचा एकमेव संदेश भाजपला लोकांपर्यंत पोहोचवायचा होता. 'सब का विकास' हे २०१९ च्या लोकसभा निवडणुकीतील सूत्र २०२४ मध्येही कायम राहणार आहे. २०१९ मधील विजयामध्ये मोदी सरकारच्या लोकप्रिय योजनांचादेखील वाटा होता. उत्तर प्रदेशमध्ये समाजवादी पक्ष आणि बहुजन समाज पक्ष यांनी युती करून भाजपला आव्हान दिले होते. मुस्लीम, यादव आणि दलित, असे जातींचे एकत्रित गणित मांडले गेले होते. सप-बसपचे जातींचे गणित पूर्ण फसले. 'तिहेरी तलाक'च्या निर्णयाने मुस्लीम महिलांनीही भाजपला मतदान केले होते. घराघरांत गॅस सिलिंडर पोहोचवणारी उज्ज्वला योजना सिलिंडरच्या वाढत्या किमतींमुळे धोक्यात आली आहे, या योजनेतील त्रुटी समोर आल्या आहेत; पण मोदी सरकारने सुरू केलेल्या योजना आपल्यापर्यंत पोहोचतील या आशेने भाजपला मतदान झाले होते. मतदारांच्या मनात निर्माण केलेली आशा मोदी सरकारला २०१९ मध्ये अभूतपूर्व यश देऊन गेली होती. मोदी सरकारने गेल्या आठ वर्षांमध्ये असंख्य योजना सुरू केल्या आणि त्यांचा प्रचार भाजपने संघटनेच्या ताकदीवर केला. त्याचीच पुनरावृत्ती मोदी सरकारच्या आठव्या वर्षपूर्तीनिमित्ताने केली गेली. यावेळी कोरोना काळात सुरू केलेल्या गरीब कल्याण मोफत धान्यपुरवठा योजनेचा आधार घेण्यात आला होता. मोदी सरकारच्या 'कल्याणकारी योजना' हे पुढील दोन वर्षे मतदारांना आकर्षित करण्यासाठी वापरलेले उत्प्रेरक असेल. केंद्राच्या लोकप्रिय योजना म्हणजे विकास नव्हे; पण 'सरकारी मदत' हाच विकास आणि विकासाचा चेहरा म्हणजे नरेंद्र मोदी, असा समज करून देण्यात भाजप यशस्वी ठरला आहे. कथित विकासाच्या आधारे मोदींनीही स्वतःची कार्यक्षम प्रशासनाची प्रतिमा उंचावत नेली आहे. या प्रतिमेला बाधा आणणाऱ्या घटना मोदींना पसंत नसतात, त्यावर तातडीने कारवाई केली जाते. नुपुर शर्मांच्या विरोधात कारवाई का झाली, याचे उत्तर मोदींच्या प्रतिमेत दडलेले आहे.

**विश्वासार्हतेचा प्रश्न**

भाजपने पूर्वीच्या जातीय समीकरणांची मोडतोड केली. भाजपच्या 'बिगर यादव, बिगर जाटव' जातींना एकत्र आणण्याच्या व्यूहरचनेचा सुगावा विरोधकांना २०१९ मधील लोकसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यावर लागला. भाजपची ही जातींची समीकरणे यावर्षी मार्चमध्ये झालेल्या उत्तर प्रदेशच्या विधानसभा निवडणुकीत समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी मोडून काढण्याचा प्रयत्न केला; पण त्यात त्यांना फारसे यश आले नाही. उदाहरण द्यायचे तर, गोरखपूर जिल्ह्यातील एका विधानसभा मतदारसंघात समाजवादी पक्षाने पासी या अनुसूचित जातीतील उमेदवार उभा केला होता. या उमेदवाराचे मूळ गाव पासीबहुल आहे; पण इथल्या पासी समाजातील मतदारांनी स्वजातीतील 'सप'च्या उमेदवाराला गावातही येऊ दिले नाही. यादवांच्या गराड्यात अडकलेला पासी उमेदवार आम्हाला नको, अशी भूमिका त्यांनी घेतली. समाजवादी पक्षाने स्वतःची प्रतिमा कितीही बदलण्याचा प्रयत्न केला तरी, मध्यम जातींनी तसेच, दलित जातींनी समाजवादी पक्षाला आपले मानले नाही. 'यादव-मुस्लिमां'ची गुंडगिरी नको, त्यापेक्षा उच्चवर्णीयांचा भाजप बरा, असा विचार करून बिगरयादव ओबीसी आणि बिगरजाटव दलित

मतदारांनी भाजपला मते दिली आणि योगी आदित्यनाथ यांना पुन्हा मुख्यमंत्री केले. वेगवेगळ्या राज्यांमध्ये भाजपने जातींची समीकरणे पक्की केली आहेत. महाराष्ट्रातही ओबीसी, दलित समाज भाजपने टिकवून धरलेला आहे. काही दिवसांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देहूला भेट देऊन, वारकऱ्यांच्या संगतीत त्यांच्यासारखा पेहराव करून संत परंपरेचा गौरव केला होता. मोदींची देहूभेट ही महाराष्ट्रातील बहुजन समाजाला आपलेसे करण्याचा मार्ग होता, त्याचा भाजपला लोकसभेच्या निवडणुकीत राजकीय लाभ मिळवायचा आहे. दक्षिणेत भाजपचे फारसे अस्तित्व नाही, हिंदुत्वाच्या मुद्यावर भाजपला पक्षाचा विस्तार करता आलेला नाही; पण तेलंगणामध्ये भाजपने लक्ष केंद्रित केले आहे. मोदींनी तेलंगणाचाही दौरा केला होता. तिथे त्यांनी संत रामानुजाचार्य यांच्या पुतळ्याचे अनावरण केले, तेव्हाही मोदींनी वैष्णव पंथीय वेशभूषा केली होती. त्यात हिंदू अस्मिता केंद्रस्थानी होती. मोदींची राजकीय गणिते पश्चिम बंगालमध्ये चुकली. पश्चिम बंगालसारख्या राज्यामध्ये हिंदू संस्कृतीतील फरक (राम आणि दुर्गा) आणि मुस्लीमबहुल मतदारसंघ या दोन कारणांमुळे भाजपला विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसवर मात करता आली नाही; पण अन्य राज्यांमध्ये जातींची गणिते यशस्वी झाली. भाजपचा पराभव करण्यासाठी विरोधी पक्षांना ही जातींची गणिते मोडून काढावी लागणार आहेत; पण उत्तर प्रदेशमधील 'सप'च्या उदाहरणावरून विश्वासार्हतेचा मुद्दा आड येतो, हे स्पष्ट दिसते.

**प्रश्न सोडवणार कसा?**

आता आदिवासी समाजातील द्रौपदी मुर्मू यांना भाजपने राष्ट्रपतीपदाची उमेदवारी दिली आहे. भाजपने सातत्याने व्यापक जनाधार असलेला पक्ष असल्याची प्रतिमा निर्माण केली आहे. वैयक्तिक तसेच, पक्षाच्या स्तरावर प्रतिमानिर्मितीवर मोदींचा कटाक्ष राहिलेला आहे. लोकसभेचीच नव्हे तर, राज्यांमधील विधानसभा निवडणूकदेखील मोदींचे नेतृत्व समोर ठेवून भाजपने लढवलेली आहे. उत्तर प्रदेशमधील विधानसभा निवडणूकही योगी आदित्यनाथांच्या नव्हे तर, मोदींच्या नावावर लढवली गेली. कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत हजारो लोकांना प्राण गमवावा लागला, पहिल्या लाटेत लाखो मजुरांची वणवण झाली, त्यांनी हालअपेष्टा सहन केल्या. उत्तर प्रदेशमध्ये गंगेच्या किनाऱ्यावर शेकडो मृतदेह पुरले गेले; पण विधानसभेच्या निवडणुकीत कोरोना काळातील केंद्र व राज्य सरकारचे गैरव्यवस्थापक हा मुद्दा प्रचारात नव्हता. शेतकरी आंदोलनामुळे मोदींना तीनही वादग्रस्त कृषी कायदे मागे घ्यावे लागले; पण या आंदोलनाचा कोणताही राजकीय फटका निवडणुकीत बसला नाही. विविध स्तरांवर केंद्र सरकारविरोधात नाराजी, असंतोष दिसत असला तरीदेखील मोदींच्या लोकप्रियतेवर त्याचा फारसा परिणाम झालेला नाही. मोदी म्हणजेच भाजप हे गणित कायम आहे. मोदींच्या बरोबरीने भाजपचे हिंदुत्वही कायम राहणार आहे. अशा मजबूत भाजपला हरवणार कसे, हा प्रश्न विरोधी पक्षांना पुढील दोन वर्षांच्या कालावधीत सोडवावा लागेल. प्रादेशिक पक्षांनी भाजपला रोखण्याचा प्रयत्न केलेला आहे. पश्चिम बंगाल, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, तेलंगणा, महाराष्ट्र, झारखंड, ओदिशा, दिल्ली, पंजाब या राज्यांमध्ये प्रादेशिक पक्षांची सरकारे आहेत. महाराष्ट्रातील भाजपच्या सत्तेच्या खेळात शिवसेनेत फूट पाडून सत्ता ताब्यात घेण्यासाठी डावपेच आखणे सुरू आहे. लोकसभा निवडणुकीत या राज्यांमध्ये भाजपच्या घोडदौडीला खीळ बसू शकेल; पण वायएसआर काँग्रेस, तेलंगणा राष्ट्र समिती, बिजू जनता दल हे काही प्रादेशिक पक्ष भाजपला मुद्यांच्या आधारावर पाठिंबा देत असतात, त्यामुळे विरोधकांची लढाई कमकुवत होत जाते. राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीतही या तीनही पक्षांनी 'एनडीए'च्या उमेदवार मुर्मू यांना पाठिंबा जाहीर केलेला आहे. विरोधकांमधील अंतर्गत विसंगती नेहमीच भाजपच्या पथ्यावर पडलेली आहे. उत्तरेतील पट्टा हा भाजपचा बालेकिल्ला असल्याने तिथे या राष्ट्रीय पक्षावर मात करणे हे मोठे आव्हान असेल. उत्तरेमध्ये लोकसभेच्या किमान दोनशे जागांवर काँग्रेसला भाजपशी थेट लढाई लढावी लागेल; पण उत्तर प्रदेशमध्ये विधानसभा निवडणुकीत काँग्रेसची दाणादाण कशी उडाली, हे स्पष्ट



दिसले. प्रादेशिक पक्ष कदाचित स्वतःची लढाई लढतीलही; पण काँग्रेस कशी लढणार, हा प्रश्न प्रादेशिक पक्षही काँग्रेसला विचारत आहेत. राष्ट्रपतीपदाचा उमेदवार निश्चित करताना काँग्रेसने पुढाकार घेतला होता; पण नंतर एक पाऊल मागे घेत तृणमूल काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन पक्षांना उमेदवार निवडण्याची जबाबदारी घ्यावी लागली. विरोधकांनी निवड केलेल्या उमेदवाराला काँग्रेसचा पाठिंबा राहील, अशी भूमिका घेण्यात आली. काँग्रेससारख्या राष्ट्रीय पक्षाला स्वतःचा उमेदवारही देता आलेला नाही. विरोधकांसाठी भाजपविरोधातील लढाई काँग्रेसमुळे अधिक अवघड झाली असली तरी, काँग्रेसला वगळून ही लढाई लढताही येत नाही. या कोंडीतून विरोधकांना काँग्रेसलाच बाहेर काढावे लागेल. त्यामुळे पुढील दोन वर्षांच्या काळात काँग्रेस स्वतःहून मजबूत होण्यासाठी किती आणि कोणते प्रयत्न करतो, त्यावर भाजपविरोधातील विरोधकांच्या लढाईची तीव्रता ठरेल. भाजपला हरवण्यासाठी सक्षम काँग्रेस हाच पर्याय असू शकतो. ●●●

**(लेखक राजकीय अभ्यासक आहेत.)**

# अराजकाच्या गर्तेत श्रीलंका

**सद्य:स्थितीत श्रीलंकेतील राजकीय आणि प्रशासकीय यंत्रणा ठप्प आहे. गोताबया राजपक्षेंच्या पलायनाने गोंधळात भर पडली होती. याचे कारण सरकार आणि जनता यांच्यातील विश्वासाचा धागाच तुटलेला आहे. तो जेवढ्या लवकर जोडला जाईल, तितक्या लवकर तिथे स्थिरता यायला मदत होईल, तरच समस्यांचा डोंगर पार होईल. त्यासाठी देशात एकमताचे सरकार हवे आहे. त्या सरकारने पहिल्या चुका दुरुस्त करत लोकशाहीची प्रस्थापना करणे गरजेचे आहे.**

## भास्कर नाशिककर

श्रीलंकेत राजकीय, सामाजिक अराजकाची स्थिती आहे. सरकारचे अस्तित्व नाममात्र आहे. लोकशाही टिकवत तेथील राज्यकर्त्यांना देशाची आर्थिक घडी पहिल्यांदा सावरावी लागेल. त्यासाठी कठोर उपाययोजना राबवून तशी मानसिकता जनतेत निर्माण करावी लागेल. त्यासाठी एकदिलाने प्रयत्न करण्याकरता वांशिक, धार्मिक भेदाला तिलांजली द्यावी लागेल. प्रशासनात फेरबदल करावे लागतील. यासाठी प्रसंगी राज्यघटनेचे पुनर्लेखन करावे लागेल. यासाठी दीर्घ कालावधी लागेल. त्याकरता साम्यवादी चीनचा भांडवलदारी उपक्रम दूर ठेवून भारतासारख्या हितचिंतकाला सोबत घेऊन वाटचाल करणे अधिक श्रेयस्कर ठरणार आहे.

आर्थिक, सामाजिक, राजकीय अराजक आपल्या शेजारील श्रीलंकेत माजले आहे. गेली चार महिने 'गोता गो होम' अशी हकाटी पिटत आंदोलन करणाऱ्या श्रीलंकेतील सर्वसामान्यांपासून ते शिक्षित, विद्वान आणि विद्यार्थ्यांनी अखेर अध्यक्ष गोताबया राजपक्षे यांच्या अध्यक्षीय प्रासादात ठाण मांडून त्यांना पलायन करायला भाग पाडले. त्यांनी आता राजीनामा दिल्याने नव्या अध्यक्षांच्या निवडीचा मार्ग मोकळा झाला आहे. पंतप्रधान रानील विक्रमसिंघे यांचे निवासस्थान, टेम्पल ट्रीमध्येही नागरिकांनी घुसखोरी केली. त्यांचे खाजगी निवासस्थान पेटवून दिले. गेली सुमारे आठ-नऊ महिने धुमसत असलेला श्रीलंकेच्या समाजजीवनातील असंतोषाने टोकाचे उग्र रूप धारण करून निवडून दिलेल्या सत्ताधाऱ्यांना एकीच्या बळावर सत्ताभ्रष्ट केले आहे. भ्रष्ट आणि मनमानी कारभार, परिणामांचा विचार न करता लहरीनुसार निर्णय घेणे, धोरण ठरवताना दूरदर्शीपणाचा अभाव तेथील सत्ताधाऱ्यांना भोवला आहे. भपकेबाजपणाकडे लक्ष देत असताना त्या सत्ताधाऱ्यांना जनतेच्या मूलभूत गरजा आणि आशा-आकांक्षांचा विसर पडला होता. सरकारी ध्येयधोरण ठरवत असताना त्यांनी वास्तवाशी फारकत घेतलेली होती. जनतेत अस्थिरता कायम राखणे, जनतेचे फाजील लाड करत आर्थिक बेशिस्तीला आमंत्रण देण्याचे काम त्यांनी केले होते. भारताशी असलेल्या परंपरागत मैत्रीला सोडचिठ्ठी देत राजपक्षे बंधूंनी श्रीलंकेमध्ये पायाभूत सुविधांचा, बंदरांचा विकास करण्याच्या नादात चिनी कर्जाचा अतिरेकी डोंगर उभा केला. अशी कितीतरी कारणे श्रीलंकेतील या अराजकामागे आहेत. ती एका दिवसांत किंवा काही महिन्यांत निर्माण झालेली नाहीत. काही कारणांची बीजे तर त्याच्या निर्मितीपासून पेरली गेली, विशेषतः वांशिक भेदाची जसे



की, सिंहली आणि तामीळ. त्याची यादी आणखी खूप मोठी होऊ शकते. मात्र, अध्यक्ष गोताबया, त्यांचे बंधू आणि पंतप्रधानपदावरून पायउतार झालेले महिंदा राजपक्षे आणि अपयशी ठरलेले अर्थमंत्री बासील या राजपक्षे बंधूंच्या आणि सत्तेत राहिलेल्या चाळीसवर नातेवाइकांच्या मनमानी, मतलबी कारभाराने श्रीलंकेतील जनतेच्या

वाट्याला दैन्य आणले, त्यांचे जगणे नरकयातनामय केले, हेच खरे.

सद्यःस्थितीत श्रीलंकेतील राजकीय आणि प्रशासकीय यंत्रणा ठप्प आहे. गोताबया राजपक्षेंच्या पलायनाने गोंधळात भर पडली होती. याचे कारण सरकार आणि जनता यांच्यातील विश्वासाचा धागाच तुटलेला आहे. तो जेवढ्या लवकर जोडला जाईल, तितक्या लवकर तिथे स्थिरता यायला मदत होईल, तरच समस्यांचा डोंगर पार होईल. त्यासाठी देशात एकमताचे सरकार हवे आहे. त्या सरकारने पहिल्या चुका दुरुस्त करत लोकशाहीची प्रस्थापना करणे गरजेचे आहे. एक मात्र खरे की, राजपक्षेंनी श्रीलंकेवर उभ्या केलेल्या कर्जाच्या डोंगराने आगामी काही पिढ्यांना त्याची किंमत मोजावी लागेल, हे मात्र निश्चित.

**का उद्‌भवली बिकट स्थिती**

श्रीलंकेतील असंतोषाची धुमस गेली काही महिने कायम आहे. त्याची प्रमुख कारणे आपण पाहूया. गोताबया राजपक्षे हे श्रीलंकेचे लष्करप्रमुख होते. त्यांनीच वांशिक मुद्द्यावरून लिबरेशन ऑफ तामीळ टायगर्स (एलटीटीई) या सशस्त्र लढा देणाऱ्या तामिळींच्या संघटनेचा पुरता नायनाट केला. या नागरी युद्धात लाखो नागरिकांचे प्राण गेले. तीन दशकांचा संघर्ष संपवला. त्यांचे ज्येष्ठ बंधू महिंदा राजपक्षे अध्यक्ष होते. दोघा बंधूंची देशावर २००८ पासून किरकोळ अपवाद वगळता एककल्ली सत्ता होती. त्यांना चीनबद्दल अतीव प्रेम. चीनला भारताला शह देण्यासाठी हिंद महासागरात नाविक तळ हवा होता. बेल्ट अँड रोड या चिनी उपक्रमाने गेल्या सव्वादशकात जगभर पाय पसरले आहेत. त्याअंतर्गत चीनने श्रीलंकेतील हम्बनतोटा बंदराचा विकास, आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्टेडियम, विमानतळ आणि पायाभूत सुविधा उभारल्या, की ज्या श्रीलंकेच्या अर्थव्यवस्थेला पेलवता येणे अशक्य होते. त्या प्रकल्पांसाठी चीनने अर्थसाहाय्य केले, त्यात श्रीलंकेच्या वाट्याचे पैसे देण्यासाठीही चीननेच कर्ज देऊ केले. त्याची श्रीलंकेला सुमारे सात अब्ज डॉलरची परतफेड करायची आहे, एकूण कर्जात चिनी वाटा दहा टक्के आहे. श्रीलंकेला सुमारे ५५ अब्ज डॉलरची परकी देणी आहेत. यात बाजारातून घेतलेले ४७ टक्के, जागतिक आणि आशियाई विकास बँकांचे अनुक्रमे ९ आणि १३ टक्के, जपानचे १० टक्के, इतर ९ टक्के आणि भारताचे दोन टक्के देणे आहे. श्रीलंकेतील असंतोषाला तोंड फुटल्यापासून भारताने आतापर्यंत प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या तीन अब्ज डॉलरची मदत श्रीलंकेला केली आहे. यामध्ये केलेला इंधनपुरवठा, जीवनावश्यक वस्तू जसे की, अन्नधान्य, औषधे, खते यांसह इतर वस्तूंचा समावेश आहे. त्याउलट हम्बनतोटा बंदर ९९ वर्षांच्या कराराने ताब्यात घेऊन भारताला शह देणाऱ्या चीनने सध्याच्या अवघड स्थितीत मात करण्यासाठी श्रीलंकेला मदतीचा हात देत असताना मानभावीपणा चालवला आहे. मदत दिली तीदेखील तुटपुंजी अशीच. त्यामुळेच समस्या अधिक गुंतागुंतीची बनली आहे.

**व्यापारी तूट – वाढता वाढे**

श्रीलंकेचे अर्थकारण आतापर्यंत निर्यातीपेक्षा आयातीच्या ओझ्याखाली दबले गेले होते. व्यापारातील तूट २००९-२०१८ या कालावधीत पाचवरून १२ अब्ज डॉलरवर गेली. दरवर्षी निर्यातीपेक्षा आयात तीन अब्ज डॉलरने अधिक होती. याचे कारण नागरी युद्धाच्या समाप्तीनंतर आयातीला प्रोत्साहन देणारे धोरण राजपक्षे बंधूंनी राबवले. नागरिकांना परकी मालावर अवलंबून राहण्याची सवय लावली. त्यातच अध्यक्षीय निवडणुकीत गोताबया राजपक्षेंनी करसवलतीची खैरात केली. त्यामुळे सरकारच्या तिजोरीत येणारा महसूल वर्षाला दीड अब्ज डॉलरने प्रतिवर्षी घटला. त्यातच कोरोनाच्या महामारीने ज्या पर्यटन व्यवसायावर श्रीलंकेचे अर्थकारण तोलले गेले होते, तेच गोत्यात आले, नव्हे आता तर रसातळाला पोहोचले आहे. २०१८ मध्ये याच उद्योगाने श्रीलंकेला चार अब्ज डॉलर मिळवून दिले होते, २०२१ मध्ये हीच कमाई केवळ १५ कोटी डॉलर होती, आता तर ती नाही म्हणायला हरकत नाही, अशी स्थिती आहे. अर्थकारणाचा शकट हाकणारा उद्योगच डबघाईला आला. त्यात भर टाकली ती तुघलकी निर्णय सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्याने. रासायनिक खतांचा



वापर थांबवला, बंदरातील जहाजे परत पाठवली आणि अंधपणे सेंद्रिय शेतीचा स्वीकार केला गेला. परिणामी शेती उत्पादनात घट आली. चहा, रबर यांचे उत्पादन घटले. त्यातून मिळणारे परकीय चलन बंद झाले. काही वेळा चहाच्या बदल्यात तेथील सरकारने आणीबाणीच्या प्रसंगी इंधन उपलब्ध केले होते; पण सेंद्रिय शेतीच्या एककल्ली निर्णयाने शेतकऱ्यांचे आणि शेती अर्थकारणाचे कंबरडे मोडले.

**भोवला असंगाशी संग**

बेशिस्त, कोणताही दूरदर्शीपणा नसलेला कारभार राजपक्षे बंधूंना भोवला आहे. त्यांच्यामुळे श्रीलंकेतील सोशीक जनतेच्या वाट्याला नरकयातना आल्या आहेत. राजपक्षे कुटुंबीयांना तामिळींचा निःपात केल्याने श्रीलंकेच्या राजकारणात मोठा मान होता. गोताबया आणि महिंदा राजपक्षे यांची सरकार आणि प्रशासनावर, तसेच लष्करावर पक्की पकड होती. मात्र, त्यांनी असंगाशी संग केला. साम्यवादी असलेला चीन भांडवलदार होऊन जगातील विशेषतः गरीब देशांना पैशाच्या पेट्या रिकाम्या करून बेल्ट अँड रोड उपक्रमातून

सावकारीचा धंदा करत आहे. त्याच्या ते पुरते आहारी गेले. जगातील अनेक देश चीनच्या या सावकारीच्या नादाला लागून आगामी काळात श्रीलंकेसारखे दिवाळखोरीत निघतील किंवा देशोधडीला लागतील, असे चित्र आताच दिसू लागले आहे. खासकरून आफ्रिकेतील देश तसेच दक्षिण आशियातील काही देशांचा यात क्रमांक लागू शकतो. चीनचे प्रत्यक्षातील कर्ज १० टक्के असले तरी सगळ्या बाबींचा विचार करता ते त्याहीपेक्षा कैक पट आहे.

**आर्थिक स्थैर्याला सुरूंग**

एकुणच श्रीलंकेतील आर्थिक स्थैर्याला सुरूंग लागला गेला. गेल्या सात-आठ महिन्यांत तिथे वेगाने महागाई वाढत आहे. तज्ज्ञांच्या अंदाजानुसार तेथे ४० ते ७० टक्क्यांपर्यंत महागाई पोहोचली आहे. तिच्यात आणखी वाढ होऊ शकते. जीवनावश्यक वस्तूंची कमतरता, नव्हे पैसे देऊनही त्या बाजारात मिळत नाहीत, ही स्थिती गेली अनेक महिने आहे. हाताला काम नाही, अशी स्थिती अनेक लंकावासीयांची झाली आहे. कारण इंधनपुरवठा आता जवळजवळ थांबलाच आहे. सुरुवातीला रांगांचे असलेले चित्र इंधन नसलेल्या पंपांपर्यंत गेले. अनेक लोकांना केवळ एक वेळ जेऊन दिवस काढावे लागत आहेत. दिवसातील बारा तास वीज नाही. फक्त सरकारी वाहनांना इंधन पुरवले जात होते. नंतर तर अत्यावश्यक सेवेतील यंत्रणेलाच ते मिळत होते. परिणामी, लोकांना घरी बसा आणि काम करा, असे सांगावे लागले. शाळा तर महिन्यापेक्षा अधिक काळ बंद आहेत. कारण अत्यावश्यक आणि जीवनावश्यक सुविधांची टंचाई.

**रशियाच्या युद्धाने स्थिती बिकट**

श्रीलंकेच्या या कोंडीत भर पडली ती रशिया-युक्रेन युद्धाने निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे. त्यामुळे निर्माण झालेली स्थिती ही उंटाच्या पाठीवरील शेवटची काडी ठरली. तिथूनच श्रीलंकेतील अशांततेला सुरुंग लागला गेला. जीवनावश्यक वस्तूंच्या दुष्काळाने त्रासलेल्या जनतेने रस्त्यावर उतरून सरकारवरील असंतोष प्रकट करणे सुरू केले. त्याला हिंसक वळण लागले. परिणामी, एके दिवशी त्याचा उद्रेक होऊन पंतप्रधान महिंदा राजपक्षेंना पलायन करावे लागले. त्यादिवशीचा उद्रेक एवढा भयानक होता की, अनेक संसद सदस्यांच्या, मंत्र्यांच्या निवासस्थानाला लक्ष्य केले गेले. प्रक्षुब्ध जमावाने वेढल्याने एका खासदाराने त्यांच्या समक्ष आत्महत्या केली. एवढे सगळे अनर्थ राजपक्षेंच्या मनमानी कारभाराने घडले आहेत. कारण या कुटुंबातील आणि त्यांच्या नात्यातील सुमारे चाळीसहून अधिक व्यक्ती राजसत्तेच्या मोक्याच्या पदावर होत्या. अर्थमंत्री राहिलेले बासील राजपक्षे यांना मिस्टर पर्सेंटेज असेच संबोधले जात होते. एकूण ही कारकीर्दच भ्रष्ट आणि लहरी, मनमानी कारभार करणारी होती, तिनेच श्रीलंकेतील जनतेच्या वाट्याला दुःख आणि दैन्य आणले.

**कर्जाचा बोजा ५० अब्ज डॉलरवर**

या सगळ्याचा परिणाम म्हणून श्रीलंकेची आंतरराष्ट्रीय पत वेगाने खालावली. पतमानांकन संस्थांनी श्रीलंकेला धोकादायक आर्थिक स्थिती असलेल्यांच्या यादीत टाकले. महिंदा राजपक्षेंना जनतेने पंतप्रधान पदावरून पायउतार व्हायला लावल्यानंतरही राष्ट्राध्यक्षपदी राहिलेल्या गोताबया राजपक्षेंनी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (आयएमएफ), जागतिक बँक, आशियाई बँक यांच्याकडे मदतीसाठी झोळी फिरवली. याचना केल्या. मात्र, वारेमाप उधळपट्टी, आर्थिक बेशिस्तीने परकीय चलनाची गंगाजळीही संपवून बसलेल्या कटोरीवाल्याला श्रीलंकेला मदतीचा हात द्यायला कोणीच तयार झाले नाही, कारण तोपर्यंत श्रीलंकेवरील देण्यांचा बोजा ५० अब्ज डॉलरवर पोहोचला होता. काही महिन्यांपूर्वी ही स्थिती होती, आज ती आणखी गंभीर झाली आहे, भविष्यात आणखी गंभीर होईल.

**भारताचा शेजारधर्म**

अशा स्थितीत चीनने चर्चेचे गुऱ्हाळ चालवले. मात्र, भारताने आपला शेजारधर्म निभावला आहे. चीनचे अंकित होऊन भारताला आव्हान देण्याचा प्रयत्न श्रीलंकेने केला तरीदेखील इंधन, औषधे, जीवनावश्यक वस्तू, तांदूळ आणि साधनसामग्रीचा पुरवठा आपण श्रीलंकेला केला आहे. आर्थिक पेचावर मात करण्यासाठी खास तरतूद केली, सुमारे तीन अब्ज डॉलर विविध रूपाने देऊ केले आहेत. जागतिक वित्तपुरवठादारांकडून साहाय्य मिळवण्यासाठी आवश्यक





बाबींच्या पूर्ततेसाठी मदत दिली आहे. श्रीलंकेतील सद्यःस्थिती आपल्यावर परिणाम करू शकते, हेही त्यामागील वास्तव आहे. विशेषतः तेथून तामिळी निर्वासितांचा लोंढा दक्षिणेतील केरळ आणि तामिळनाडू या राज्यात येऊ शकतो. त्याने समस्या वाढू शकते. श्रीलंकेत निर्मिती उद्योग अत्यंत मर्यादित असून, त्यात देशी उद्योगांची संख्या त्याहून कमी आहे. आपल्याकडील अनेक बड्या कंपन्यांची श्रीलंकेतील उद्योगात गुंतवणूक आहे. हॉस्पिटॅलिटी उद्योगात ताज, आयटीसी या कंपन्यांची हॉटेल्स आहेत. अशोक लेलँड, टीव्हीएस, टाटा समूहाचे कारखाने आहेत. तेथील इंधन उद्योगात आपल्या ऑइल कंपन्यांचा मोठा वाटा आणि गुंतवणूक आहे. टाटा कम्युनिकेशन, एअरटेल, एशियन पेंटस्, स्टेट बँक ऑफ इंडिया तिथे मोठा व्यवसाय करतात. अर्थात, गेल्या काही वर्षांत आपल्या आयातदार देशात श्रीलंकेचा टक्का उत्तरोत्तर घसरत गेला आहे. त्याचे कारण पुन्हा चीन हेच आहे.

श्रीलंका हा देश आज जरी संकटात असला तरी ही स्थिती कायम राहील, असे नाही. कोणीही एकाच अवस्थेत कायमचे राहू शकत नाही. ही आपत्ती दूर होईल. मात्र, भारताचे व्यापक हित डोळ्यासमोर ठेऊन आपल्याला त्यांना मदत करावी लागणार आहे. श्रीलंकेतील तामिळींचे भारतात स्थलांतर टाळायचे असेल आणि त्यांच्या हिताचे

रक्षण करायचे असेल, तर आपल्याला सक्रियता दाखवण्याशिवाय पर्याय नाही. हे लक्षात घेऊन आपण मदतीचा हात पुढे केला आहे. त्याचबरोबर चीनचे श्रीलंकेच्या भूमीवरून मिळणारे आव्हान मोडीत काढण्यासाठीदेखील ही संधी मानली गेली पाहिजे. विशेषतः आर्थिक शिस्तीच्या चार गोष्टी पटवून सांगणे, तज्ज्ञ बँकर, अर्थतज्ज्ञांची मदत याकडे लक्ष दिले पाहिजे. लोकशाहीच्या हितरक्षणासाठी प्रशासकीय पातळीवर मदत आणि सहकार्य पुरवण्यावर भर द्यावा लागेल. सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे भारतीय कंपन्यांची मोठी गुंतवणूक श्रीलंकेत आहे. तिला बाधा पोहोचणे आपल्या देशहिताचे नाही. त्यांच्या हितरक्षणासाठी काही ठोस पावले उचलावी लागतील, तेही ओघाने आलेच.

**आपत्तीतून बाहेर पडण्यासाठी...**

श्रीलंकेतील अराजकाची स्थिती आणखी किती काळ राहू शकते, कधी तोडगा निघेल, याबाबत आताच ठोस असे भाष्य करता येणार नाही. तथापि, एक मात्र खरे की, गोताबया राजपक्षे यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्याने नव्या निवडीचा मार्ग मोकळा झाला आहे. मात्र, त्यात अनेक घटनात्मक पेचाचे, अडचणीचे प्रसंग येऊ शकतात. गोताबया यांची निवड जनतेतून झाली होती. सर्वपक्षीय सरकार सत्तेवर येत असताना अध्यक्ष निवड प्रक्रियेतील वैधानिक अडचणींवर मात करावी लागेल. विक्रमसिंघे यांनी फॅसिस्ट शक्तींच्या चिथावणीने जनता अध्यक्ष प्रासादात घुसली, हिंसाचाराची ठिणगी पडली, असा आरोप केला आहे. त्यामुळे तिथल्या सरकारला आव्हानांवर मात करण्यासाठी ठोस कृती कार्यक्रम ठरवावा लागेल. सगळ्यात महत्त्वाचे आर्थिक गाडा सुस्थितीत आणण्यासाठी मदतकारक देश, वित्तीय संस्था यांच्याशी संवादाचा पूल बांधावा लागेल. आर्थिक मदतीचा ओघ उपलब्ध करून घेऊन जीवनावश्यक वस्तू, औषधे, इंधन यांचा विस्कळीत झालेला पुरवठा पूर्वपदावर आणावा लागेल. जनतेचा घोर कमी करून हाताला काम द्यावे लागेल. उत्पादकतेला चालना दिल्याशिवाय, उद्योगांची चाके फिरल्याशिवाय आर्थिक गाडा रुळावर येणार नाही. जनतेला विश्वास देणे हे मोठे आव्हान आहे. राजकीय यंत्रणा, प्रशासनाच्या बेमुर्वतखोर, भ्रष्ट, अविचारी, दूरदर्शीपणाचा लवलेशही नसलेल्या कारभाराने जगण्याचे चांदणे श्रीलंकावासीयांचे झाले आहे. केवळ राजपक्षे कुटुंबीयांनीच नव्हे, तर एकूण राजकीय यंत्रणा, पक्ष आणि प्रशासनावरच जनतेचा विश्वास राहिलेला नाही. जनतेने राष्ट्राध्यक्षांच्या प्रासादात ठोकलेला तळ तेच सांगत आहे. त्यामुळे राजकीय पक्षांनी झालेल्या चुका मान्य कराव्या लागतील, जे जनतेच्या नजरेतून उतरले आहेत, त्यांना सार्वजनिक जीवनातून निवृत्त व्हावे लागेल. विशेषतः दुभंगलेली मने यानिमित्ताने कशी एक येतील, हे पाहावे लागेल. बहुसंख्याक सिंहलींचा असलेला वरचष्मा, तामिळींबाबतची त्यांची सापत्नतेची भूमिका सोडावी लागेल. शिवाय, मुस्लीम, ख्रिश्चन अशा अल्पसंख्याकांनाही मुख्य प्रवाहात ठेवून पुढे जावे लागेल. हेच विश्वासाचे वातावरण परिस्थितीतून बाहेर पडायला मदत करेल. त्याकरता लोकशाहीचे बळकटीकरण करावे लागेल. त्याकरता प्रसंग पडला तर घटनेत दुरुस्त्या किंवा ती नव्याने लिहावी लागेल. कोरोनाचे सावट अद्याप कायम आहे. तरीही पर्यटन उद्योगाला नव्याने उभारी द्यावी लागेल. आपत्तीतून बाहेर पडण्यासाठी धोरणात्मक आणि आर्थिक पाठबळ उभे करावे लागेल. पर्यटक आकर्षित होण्यासाठी स्थैर्य आणि शांतता, सौहार्द आणि समन्वय गरजेचे आहे. त्याचप्रमाणे सेंद्रिय शेतीचा नाद सोडला असला तरी रासायनिक आणि सेंद्रिय खते यांचा समतोल राखत शेतीची विस्कटलेली घडी पूर्वपदावर आणावी लागेल. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे लोकानुनयाचा मार्ग अवलंबताना तिजोरीचा सल्ला महत्त्वाचा असतो. करसवलतीची खैरात करताना भान सुटल्याची फळे श्रीलंकावासीय भोगत आहेत. त्यामुळे करप्रणालीत आमूलाग्र बदल करावे लागतील. आपल्याकडे मतांचा जोगवा मागताना, तसेच सत्तेत पुन्हा येण्यासाठी वीज, पाणी, आरोग्यसेवा, शिक्षण मोफत किंवा सवलतीत देण्याची, कर्जमाफीची आश्वासने देऊन कार्यवाहीत आणली जातात. त्याने राज्यांवरील कर्जाचा भार असह्य होऊ शकतो. त्यामुळे श्रीलंकेतील या प्रसंगातून आपण धडा घेऊन वेळीच सावधही व्हायला पाहिजे. मात्र, त्याचा बाऊ करून भारताची तुलना श्रीलंकेशी करणे हे सर्वार्थाने गैरलागू आहे, हेही लक्षात घेतले पाहिजे. आपली अर्थव्यवस्था भक्कम आहे, कचकड्यासारखी तकलादू नाही. ●●●

**(लेखक समकालीन विषयाचे अभ्यासक आहेत.)**



# मार्क्स - आंबेडकर संवाद चालू आहे

**विकासाच्या विविध टप्प्यांमध्ये अठरापगड जाती आणि वर्ग यांच्या वास्तवाची कशा पद्धतीने सांगड घातली गेली आहे, हे तपासणे आणि त्याचबरोबर ऐतिहासिक आणि वर्तमानातील राजकीय घडामोडींमध्ये जातवर्गाची समीकरणे कशी बदलत गेली आणि त्याचे समाजावर काय दूरगामी परिणाम झाले, याची चिकित्सा करणे आणि सोबतच सध्याच्या राजकीय पटलावर जातवर्गाच्या ऐतिहासिक अस्तित्वामुळे अस्मितेचे राजकारण कसे उभे राहिले यांसारख्या विविध पैलूंचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यासाठी या पुस्तकाचे प्रयोजन करण्यात आले आहे.**



**डी. राजा, एन. मुथूमोहन**

गेल्या अनेक वर्षांपासून भारतात सातत्याने होत असलेल्या विकासाची अभिव्यक्ती अपरिहार्यपणे जाती आणि वर्गाच्या समीकरणातून तयार झालेली असल्याने यातून जगभरातील विविध विचारधारांसमोर अनेक आव्हाने उभी राहिली आहेत. असे नसते तर कदाचित या प्रागतिक विचारांतून जगाचा नकाशा बदलला असता आणि त्यातील देश सभ्य समाज म्हणून प्रस्थापित होऊ शकले असते. आज भारताची राष्ट्र म्हणून जी ओळख आहे, ती घडवण्यामध्ये कार्ल मार्क्स व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेही मोठे योगदान आहे. ज्यांचे विचार व तत्त्वज्ञान जगभरासाठी सदासर्वकाळ प्रेरणादायी राहिले. त्यांची जन्मभूमी वेगळी असली तरी त्या दोघांचे ध्येय मात्र सामाईक होते. एक असा समाज जो समान पायावर आधारलेला आहे, कोणत्याही तऱ्हेच्या शोषणापासून मुक्त आहे, जिथे प्रत्येक व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा सन्मान होतो आणि जिथे विकासाची फळे सर्वांना समान रीतीने उपभोगता येऊ शकतात. त्यांच्या या विचारप्रणाली आज खूप जास्त सुसंगत ठरत आहेत.



पण जसा भारताने एकविसाव्या शतकात प्रवेश केला तसा हा देश अधिक विभागलेला, शोषणकारी आणि विषमतेने भरलेला बनत आहे. आजच्या काळाचे संदर्भ लक्षात घेऊन कार्ल मार्क्स आणि आंबेडकरांच्या विचारांचे पुन्हा विश्लेषण करायला हवे. जसजसा काळ पुढे जातोय, तसतसे या दोन्ही महान विचारवंतांचे विचार व कल्पना यांच्या वाढत्या महत्त्वाविषयी कोणालाही खात्री पटत जातेय.

भारतीय समाजातील शोषित आणि पीडित वर्गाला समान नागरिकत्वाचा दर्जा मिळण्यासाठी त्यांना घटनेचे संरक्षण देण्यात आणि त्यासाठी योग्य त्या सर्व कायदेशीर उपाययोजना करण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अतिशय महत्त्वाची भूमिका निभावली. या भूमिकेची दखल भारतातील कम्युनिस्ट आंदोलनानेही घेतली आहे. मार्क्सवादी आणि आंबेडकरवादी विचारधारेतील समानता आणि समर्पकता लक्षात घेऊन प्रस्तुत पुस्तकात त्या दोघांतील समान धागे

आणि काळाशी सुसंगत अशा मार्क्सवादी आणि आंबेडकरवादी विचारधारा कोणत्यासंदर्भात तयार झाल्या, तसेच त्यांना समाजातून कशा प्रकारे मान्यता मिळाली, याविषयी नेमकी चिकित्सा व्हायला हवी. विकासाच्या विविध टप्प्यांमध्ये अठरापगड जाती आणि वर्ग यांच्या वास्तवाची कशा पद्धतीने सांगड घातली गेली आहे, हे तपासणे आणि त्याचबरोबर ऐतिहासिक आणि वर्तमानातील राजकीय घडामोडींमध्ये जातवर्गाची समीकरणे कशी बदलत गेली आणि त्याचे समाजावर काय दूरगामी परिणाम झाले याची चिकित्सा करणे आणि सोबतच सध्याच्या राजकीय पटलावर जातवर्गाच्या ऐतिहासिक अस्तित्वामुळे अस्मितेचे राजकारण कसे उभे राहिले, यांसारख्या विविध पैलूंचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यासाठी या पुस्तकाचे प्रयोजन करण्यात आले आहे.

पहिल्या प्रकरणामध्ये कार्ल मार्क्स यांचा वैचारिक संदर्भ देत असतानाच या क्रांतिकारी आणि अलौकिक बुद्धीच्या तत्त्ववेत्त्याच्या मांडणीतील ऐतिहासिक मर्यादा मांडण्यास लेखकांनी संकोच बाळगलेला नाही. ऐतिहासिकदृष्ट्या मार्क्स यांच्या विचारांची जडणघडण प्रामुख्याने भांडवलशाहीच्या उदयाची संकल्पना आणि युरोपियन इतिहासाविषयीचे त्यांचे ज्ञान व अनुभव यांवर आधारलेली आहे. मार्क्सच्या विचारांमध्ये हेगेल यांचा द्वंद्ववाद आणि त्याविषयीची संकल्पनात्मक साधने कायम जिवंत राहिली. यासाठी लेनिनचे एक वाक्य आठवूया. ते म्हणाले होते, की 'हेगेलचा द्वंद्ववाद म्हणजेच तर्काचे शास्त्र जर कोणाला कोळून पिता आले नाही, तर मार्क्सचा 'भांडवल' हा महान ग्रंथ काय आहे, हे कधीही समजू शकणार नाही.' पण मार्क्सचे हेगेल यांच्या अगदी उलट अशा विरोध-विकास आणि भौतिकवादावर आपला दृष्टिकोन विकसित केला, हे आपल्याला माहीत आहेच. भौतिकवादाचा सिद्धांत मजबूत करणारे अनेक ऐतिहासिक दस्तावेज मार्क्सना रशिया, भारत आणि चीन यांसारख्या देशांतून मिळाले. मार्क्स नवीन विचार समजून घ्यायला नेहमीच तयार असत. आपल्या आधीच्या भूमिका न घेता नव्याने आवडलेले विचार व्यापक स्तरावर सामावून घेण्यासही त्यांनी कधी विरोध दर्शवला नाही.

**लेनिनच्या विचारांमध्ये रशियन क्रांतीचे मोठे योगदान**

तिसऱ्या जगातील मार्क्सवादाच्या विकासात लेनिनचे योगदान मैलाचा दगड बनते. आशियाई परिस्थितीत क्रांती आणि क्रांतिकारी शक्तींच्या वाढीविषयीच्या लेनिनच्या विचारांमध्ये रशियन क्रांतीचे मोठे योगदान आहे. समाजवादी क्रांतीशी लोकशाही क्रांतीला जोडताना लेनिनसमोर एक मोठा प्रश्न होता. लेनिनच्या क्रांतिकारी प्रेरणा इतक्या महान होत्या, की ते अवघड काम अगदी लीलया हाताळायचेच. शिवाय त्यांना सैद्धांतिक पायाही द्यायचे. आंबेडकर आणि मार्क्स यांना सोबत आणण्याचा हा प्रश्न भारतातील लोकशाही क्रांती आणि समाजवादी क्रांती यांना जोडण्याचा प्रश्न आहे. भारतात भांडवली मार्ग हा तिसरा एक मार्ग आहे, यात काही शंका नाही. सर्वांत मोठा प्रश्न हा आहे, की भारत लोकशाही आणि समाजवादी तत्त्वांना जोडण्याच्या तर्काच्या मार्गाने जाईल, की स्वयंस्फूर्त आणि विध्वंसक भांडवली मार्गाने जाईल? मात्र, हे लक्षात घ्यायला हवे, की या दोन्हींमध्ये कोणताही मध्यम मार्ग दिसत नाही.

## आंबेडकरांच्या वैचारिक सिद्धांताची चर्चा करणे आवश्यक

या प्रकरणातून प्रामुख्याने आंबेडकरांचे ऐतिहासिक व सैद्धांतिक संदर्भ समजून घेण्यासाठी त्यांच्याविषयीचे हे प्रकरण काळजीपूर्वक वाचायला हवे, हे लक्षात येते. पुस्तकाच्या या भागामुळे वाचकांना हे उमजेल, की एखाद्या भौतिकवादी चिकित्सकाला भारतीय मार्क्सवाद समजून घेताना आधी आंबेडकरांच्या वैचारिक सिद्धांताची चर्चा करणे आवश्यक ठरते. कारण अन्य भौतिकवादी विचारवंतांप्रमाणे आंबेडकरांनीही भारतीय समाजातील तळाच्या विभागांमधील जातींचे व्यवस्थांतर्गत अनेक दमनकारी पैलू कोणते आणि कसे आहेत, हे सर्वप्रथम स्पष्ट केले आहे. आंबेडकरांनी हे तेव्हा केले, जेव्हा त्या वेळचे संपूर्ण राजकीय परिप्रेक्ष्य त्यांना वसाहतवाद आणि वसाहतवादविरोधी भूमिका किंवा वसाहतवाद आणि भारतीय राष्ट्रवाद यांपैकी कोणतीतरी एक अशी निश्चित भूमिका घेण्यास सांगत होते. या सगळ्याच्या पलीकडे जाऊन आंबेडकरांनी दाखवून दिले, की जातव्यवस्था ही केवळ एक सामाजिक समस्या नसून तो आधुनिक भारताच्या संस्थात्मक संरचनेतील मूलभूत विषय आहे. या मांडणीतच आंबेडकरांचे वेगळेपण आहे.

हे प्रकरण नवमार्क्सवादाने उभे केलेले काही प्रश्न आणि विशेषकरून विसाव्या शतकातील पाश्चिमात्य विचारधारेतील संघर्ष यातून निर्माण झालेल्या जागतिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आंबेडकरांची मांडणी पुढे आणते.

दुसरे प्रकरण मार्क्स, एंगल्स आणि लेनिन यांनी केलेल्या ऐतिहासिक भौतिकवादाच्या मांडणीतील प्रश्नांची विस्तृतपणे मांडणी करत त्यांना भारतीय वास्तविकतेच्या निकट आणते. आंबेडकरांनी स्वतः वर्गसंघर्ष, क्रांती आणि प्रतिक्रांती यांसारख्या संकल्पनांची भारतीय वास्तविकतेशी असलेली जवळीक दाखवली होती. आंबेडकरांनी उत्सुकतेने भारतीय वास्तवाला मार्क्सवादी संकल्पनांशी जोडले. असे असले तरी या दोन्हींत काही मूलभूत फरक आहेत, ज्यावर या प्रकरणात चर्चा करण्यात आली आहे. या प्रकरणात मार्क्सच्या शोषणाविषयीच्या आर्थिक संकल्पना आणि आर्थिक नसलेली शोषण व पिळवणुकीची साधने विशद करण्यात आली आहेत, ज्याच्या आधारे भारतातील परिस्थितीलाही मार्क्सवाद लागू होतो. त्या सैद्धांतिकदृष्ट्या योग्य ठरवण्यासाठी सापेक्षतावाद आणि वस्तुनिष्ठता, पाया आणि डोलारा यांसारख्या विविध संकल्पनांवर पुन्हा चर्चा करण्यात आली. ऐतिहासिक भौतिकवादाच्या प्रश्नांना लागू होणाऱ्या द्वंद्वात्मकता किंवा विरोध-विकासवादाच्या नियमानुसार जाण्यासाठी लेखकांनी पुरेशी काळजी घेतली आहे.

आशियाई कम्युनच्या मार्क्सवादी संकल्पनेच्या आधारे लोकशाही व समाजवादाला जोडण्याची गरज आणि भारतातील

लोकशाही क्रांतीतील सर्वोच्च महत्त्वाचा असा जातीचा प्रश्न स्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आलाय. आशियाई कम्युनची कल्पना भारतातील जातिव्यवस्थेचा भौतिक आधार स्पष्ट करते आणि हे सिद्ध करते, की भारतातील कोणत्याही क्रांतीसाठी जातिव्यवस्थेचे उच्चाटन करणे, हे अत्यंत पायाभूत असे कार्य आहे. या प्रकरणात आपण पाहू, की आंबेडकरांनी आशियाई उत्पादन पद्धतीवर अतिशय सर्जनशील पद्धतीने ऊहापोह केला आहे.



प्रकरणाच्या अंतिम टप्प्यात विसाव्या शतकातील मार्क्सवादी घडामोडी आणि आंबेडकरांनी या घडामोडींविषयी केलेल्या समांतर चर्चा याविषयी जाणून घेऊ. त्यामागील युक्तिवाद असा आहे, की विसाव्या शतकातील मार्क्सवाद हा मार्क्स-आंबेडकर संवादाला उपकारक आहे. मार्क्सवादी विचारवंत जॉर्ज ल्युकास, अंतोनियो ग्राम्स्की, फ्रंट फर्ट, ल्युईस अल्थुस्सर इत्यादींच्या लिखाणाचा इथे काही अंशी उपयोग केला असून, त्याविषयी चर्चाही केली आहे. संपूर्ण वर्चस्ववाद, सांस्कृतिक राजकारण, अतिरिक्त निर्धारवाद यांसारख्या संकल्पना येथे वाचकांना भारतीय वास्तवतेचे दर्शन होण्यासाठी वापरल्या आहेत.

तिसरे प्रकरण आंबेडकरांच्या धर्मविषयक धारणेवर आधारलेले आहे. ज्यात त्यांना असे वाटते, की धर्म ही एक सामाजिक शक्ती असून, तिला विरोध करणे भारतासारख्या पारंपरिक समाजात अपरिहार्य बनते. विल्यम जेम्स हे अमेरिकेतील उपयुक्तावादी आणि इमाईल ड्युरेखेम हे धर्मविषयक समाजशास्त्रज्ञ. या दोन्ही विचारवंतांची मांडणी तुलनात्मक विवेचनासाठी इथे वापरण्यात आली आहे. आंबेडकरांची धर्मविषयक मांडणी या दोघांच्या अगदी जवळ जाते. ज्यात ते मानतात, की लोकशाही आणि क्रांतिकारी परिवर्तन घडवून आणण्यासाठी धर्माच्या व्यावहारिक आणि सामूहिक शक्ती समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. आंबेडकर हे दाखवून देतात, की भारतातील हिंदू धर्म हा धर्मांच्या सामान्य व्याख्यांपेक्षा वेगळा आहे आणि तो विशेषत्वाने असमानता आणि असामाजिकता या तत्त्वांवर आधारलेला आहे. हिंदू धर्मात समज म्हणून निर्माण होण्याच्या आधीपासूनच श्रेणीबद्ध असमानतेचे मूल्य व्यवहारात आणले गेले आहे. परिणामी, आंबेडकर भारतीय समाजाच्या प्राचीन इतिहासापासून अस्तित्वात असलेले बौद्ध धम्म आणि हिंदू धर्मातील अनुक्रमे समानता आणि असमानता यांमधील पारंपरिक वैर समोर आणतात.

हे प्रकरण भारतीय धर्मांचा त्यांच्या जटिल उगमापासून असलेल्या इतिहासाचे परीक्षण करते आणि प्राचीन ऐतिहासिक काळात पाखंडी वैदिक परंपरेने प्राचीन सनातनी अशा श्रमणाच्या परंपरेचे ज्या रीतीने विकृतीकरण केले त्याविषयीची विस्तृत माहिती देते. मार्क्सवादी विचारांच्या वर्गविहीन समाजाच्या ऐतिहासिक योजनेला जातिसमाजाने बदलले आहे आणि या दोन्हींतील हे साधर्म्य लक्षात घेऊन त्यांची तुलना करण्याचा प्रयत्न यात करण्यात आला आहे. ऐतिहासिक योजनांमागे तत्त्वज्ञानविषयक आणि धार्मिक सैद्धांतिक आराखडे कशा प्रकारे कार्यरत असतात याचेही वर्णन इथे करण्यात आले आहे. भारतातील मध्ययुगातील भक्ती परंपरेच्या माध्यमातून जातीय आणि सरंजामदारी संरचना कशी एकवटली गेली, याविषयी प्रकरणाच्या शेवटच्या भागात विवेचन केले आहे.

**बौद्ध धम्माची संकल्पना, त्याचे आदर्श आधुनिक काळाशी सुसंगत**

चौथ्या प्रकरणात आंबेडकरांनी आधुनिक काळात बौद्ध धम्माची पुनर्रचना कशा रीतीने केली आहे, याविषयी मांडणी करण्यात आली आहे. इतिहासाची सूक्ष्म जाण असलेले आंबेडकर इतिहासातील बौद्ध धम्म आणि हिंदू धर्मातील वैर आधुनिक काळातही पुनरुज्जीवित करतात. एकदा पराभूत झालेल्या बौद्ध धम्माने आधुनिक काळातील राजकीय आणि समाजशास्त्रीय विचारांना पाठिंबा देणारे सहकारी शोधून मागच्या पराभवाची परतफेड केली पाहिजे, या हेतूने आंबेडकर बौद्ध धम्माची संकल्पना आणि त्याचे आदर्श यांची आधुनिक काळाशी सुसंगत अशी पुनर्रचना करतात. हा इतिहासात मागे जाण्यासाठी केलेला मार्ग नसून तो एक सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या निश्चित केलेल्या ठोस रणनीतीचा भाग आहे, जो या देशाला आणि त्यातील कष्टकरी जनतेला भविष्याकडे घेऊन जाईल. प्रकरणाच्या दुसऱ्या भागात आंबेडकरांची मार्क्सवादासोबतच्या वादाची चर्चा आहे. आंबेडकरांनी जरी त्यांच्या विश्लेषणाची सुरुवात व्यावहारिकतावाद आणि पाश्चिमात्य उदारमतवादी विचारांकडून प्रेरणा घेऊन केली असली तरी त्यांच्या नंतरच्या काळात त्यांचा वाद मार्क्सवादाशी जवळीक साधणारा होता. आंबेडकर नेहमीच मार्क्सवाद आणि बौद्ध धम्म यांच्याकडे आकृष्ट झाले होते. त्यांची मार्क्सवाद आणि बौद्ध धम्माविषयीची समज परस्पर प्रेरणा देणारी आहे. ते बौद्ध धम्माला मार्क्सवादाच्या अंगाने स्पष्ट करतात आणि मार्क्सवादाला बौद्ध धम्माकडून प्रेरणा मिळेल, अशी आशा करतात. कदाचित अशा तऱ्हेच्या परस्पर प्रेरणा हे पूर्वेच्या देशाचे वैशिष्ट्य आहे.

पाचवे प्रकरण जात आणि वर्ग यातील विद्यमान प्रश्न-विशेषतः त्यातून तयार झालेले आणि सगळीकडे वाढत असलेले अस्मितेचे राजकारण-याविषयीच्या वादावर चर्चा करते. हे प्रकरण यासाठी आवश्यक आहे. कारण अस्मितेचे राजकारण आणि मार्क्सवादी वर्गीय राजकारण याविषयी काही अभ्यासही झाले आहेत. काही वेळा मार्क्सवादी आणि अस्मितेच्या राजकारणाचे समर्थक त्यांच्यामध्ये इतका विरोध निर्माण होतो, की काही वेळा हा विरोध त्यांना एकमेकांपासून अलग करतो. दोन्ही गटांना वर्ग आणि अस्मिता - विशेषकरून वर्गअस्मिता आणि जातअस्मिता - याविषयी विशिष्ट बाबतीतील स्पष्टीकरण असणे गरजेचे आहे. याविषयीच्या चर्चेला या निमित्ताने सुरुवात होईल, अशी या पुस्तकाचे लेखक आशा करतात. ●●●

**('मार्क्स आणि आंबेडकर संवाद चालू आहे' या डी. राजा व एन. मुथूमोहन यांच्या ग्रंथातील लेखकांचे मनोगत त्यांच्या व लोकवाङ्मय प्रकाशनाच्या सौजन्याने.)**

मुलाखत

# तमाशा कलावंत शिरढोणकर

**तमाशा कलावंत आतांबर शिरढोणकर यांना महाराष्ट्र राज्य शासनाचा विठाबाई नारायणगावकर जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला. त्यानिमित्त त्यांची घेण्यात आलेली मुलाखत...**



**डॉ. मोहन लोंढे**

मिरज-पंढरपूर रस्त्यावर वसलेल्या शिरढोण गावी धोंडीराम वस्ताद यांच्या पोटी बापूराव यांचा जन्म झाला त्यांनी तमाशा विश्वात आपल्या अभिनय व गायनशैलीने लौकिक मिळवला. बापूराव शिरढोणकर यांना एकूण पाच अपत्ये. त्यामधील द्वितीय पुत्र आतांबर शिरढोणकर यांचा १९५४ मध्ये जन्म झाला. ते तमाशा परंपरेच्या हलगी, ढोलकीच्या निनादात वडिलांकडून गुरुज्ञान घेऊन तमाशाकलेत रममाण झाले. उभी हयात त्यांनी तमाशा कलेची सेवा केली. रसिकांची सेवा केली. त्यातच आनंद मानून सुरू झालेला तमाशा कलाक्षेत्रातील प्रवास याबद्दल त्यांच्याकडून जाणून घेऊ.

**प्रश्न : तमाशा क्षेत्रात आपण कसे आला?**

**उत्तर :** तमाशा ही महाराष्ट्रामधील लोकप्रिय कला आहे. आमच्या घरामध्ये पिढीजात तमाशाचा फड सुरू आहे. आमची ही तमाशामधील तिसरी पिढी, तमाशा आमचा पिढीजात व्यवसाय आणि उपजीविकेचे साधन बनलेला आहे. म्हणूनच या तमाशा क्षेत्रामध्ये माझे पदार्पण झाले.

**प्रश्न : तमाशाची आवड कशी निर्माण झाली?**

**उत्तर :** माझे वडील तमासगीर होते. 'बापू शिरढोणकर' या नावाने त्यांचा तमाशाचा फड गाजत होता. लहानपणामध्येच हलगी, ढोलकीचा निनाद कानावर पडत होता. आम्ही भावंडे वाढत होतो. वडिलांच्या गोड गळ्यामुळे गायनाची आवड निर्माण झाली. वगनाट्यामधील वडिलांच्या भूमिकाही प्रभावी असायच्या. त्यामुळे तमाशाबद्दल आकर्षण निर्माण झाले आणि तेच माझे जीवन झाले

**प्रश्न : तमाशातील तुम्ही केलेली पहिली भूमिका कोणती?**

**उत्तर :** वडिलार्जित तमाशा घरामध्ये होता. 'राजा हरिश्चंद्र' आणि 'मोहना बटाव' ही दोन वगनाट्ये लोकप्रिय होती. सुरुवातीला वयाच्या दहाव्या वर्षी 'राजा हरिश्चंद्र' या वगातील बाळ रोहिदासची भूमिका केली.

**प्रश्न : 'मोहना बटाव' या वगातील एखादा प्रसंग सांगा?**

**उत्तर :** 'मोहना बटाव' ही एक प्रेमकथा आहे. ती प्रथम गाण्यातून सादर केली जाते व त्यानंतर त्या गाण्याच्या म्हणीचा विस्तार वगनाट्याच्या रूपाने संवादातून मांडला जातो. रसिकजनांना जागेवर



खिळवून ठेवण्याची ताकद या संहितेत आहे. आजही आमच्या तमाशा मंडळातून वग सादर केला जातो.

**प्रश्न : आतापर्यंत तुम्ही कोणकोणत्या तमाशा फडात काम केले?**

**उत्तर :** पहिल्याप्रथम झाडाखालच्या तमाशामध्ये बापूराव शिरढोणकर तमाशा मंडळामध्ये काम केले. खरा या तमाशा मंडळातच घडलो. १९७४ पासून महाराष्ट्रातल्या अनेक तंबूंच्या

फडांतून गायन, लेखन, अभिनय, सरदार अशा तमाशातील भूमिकेशी प्रामाणिक राहिलो. काळू बाळू, शिवराम बोरगावकर, रघुवीर खेडकरसह कांताबाई सातारकर, मंगला बनसोडे-करोडीकर, विठाबाई नारायणगावकर, दत्ता महाडिक, चंद्रकांत ढवळपुरीकर, मालती इनामदार, अशा अनेक फडांतून माझ्या भूमिका, लिहिलेली वगनाट्ये गाजलेली आहेत. एवढेच नाही तर विठाबाईसोबत तमाशामध्ये भूमिका करण्याची संधी मिळाली. नायक, खलनायक अशा भूमिका करत असतानाच ऐतिहासिक वगनाट्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराजांच्या भूमिका करण्याचं भाग्य मला लाभलं.

**प्रश्न : शिवाजी महाराजांच्या भूमिकेचा अनुभव, आनंदी क्षण कोणता?**

**उत्तर** : महाराष्ट्रामध्ये शिवराम बोरगावकरांच्या तमाशा फडाला लोकप्रियता मिळत होती. ऐतिहासिक वगनाट्ये बसवली जात होती. त्यामधील 'जावळीत फडकला भगवा झेंडा' या वगनाट्यात शिवरायांची भूमिका मला मिळाली होती. दसऱ्याच्या दिवशी कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी नारळ फुटणार होता. त्यासाठी सिनेअभिनेते चंद्रकांत, सूर्यकांत यांना निमंत्रण देण्यात आलं होतं. अभिनेते मांढरे बंधूंनी स्टेजवर जाऊन या नव्या वगाचा नारळ वाढवून शुभारंभ केला. नांदीने या वगाची सुरुवात झाली. प्रथम माझा प्रवेश झाला. दरबार झाला. सीन संपून मागे आलो. राहुटीत जाणार तोच मांढरे बंधूंनी माझ्यासमोर येऊन माझ्या दोन्ही पायांना हात लावून दर्शन घेतले. मनातून मला लाजल्यासारखं झालं. ते म्हणाले 'आपण आता छत्रपती आहात' माझ्या डोळ्यांतून आनंदाआश्रू ओघळले. तो एक आनंदाचा प्रसंग कधीही विसरू शकत नाही.

**प्रश्न : संतांच्या जीवनावरील वगनाट्यातील एखादा अनुभव सांगा?**

**उत्तर** : १९९३ च्या काळात मास्टर रघुवीर खेडकरसह कांताबाई सातारकर तमाशा मंडळाने संतांच्या जीवनावरील वगनाट्य बसवले होते. 'संत रोहिदास', (रंगला हरी रोहिदास घरी) हा निवडला होता. पावसाळ्यात वगाच्या तालमी झाल्या. सर्वच कलावंत जीव तोडून आपापल्या भूमिका वठवत होते. महाराष्ट्रात हा वग गाजत होता. हा वग संगीतप्रधान व अभंगाची मेजवानी देणारा होता. या वगात संत रोहिदासाची भूमिका जीव तोडून करीत होतो. यात्रेत दोन खांबी बादशाही तंबूमध्ये एकादशीच्या तोंडावर रोहिदाससारख्या महान संताचे दर्शन घडणार या अभिलाषाने वारकर आतल्या तमाशा रसिकांचा जनसागर तमाशाकडे लोटला जात होता. तंबू हाउसफुल झाला होता. खडक शिकलेल्या हलगीवर दोन-तीन थापा पडल्या, तसा पडदा वर गेला, सुरू झाली हलगी आणि ढोलकीची जुगलबंदी. दर्जेदार कार्यक्रमाचे ते प्रथम दर्शन. गण झाला. बाजारची गवळण झाली आणि मथुरेच्या बाजारला जाणाऱ्या गोपींच्या आडवा आला कृष्ण. ही कृष्णाचा परिचय करून देण्याची एक शैली आहे. मला ती उपजतच मिळालेली आहे. ती रसिकांच्या हृदयापर्यंत जाऊन भिडणारी आहे. गोड गळ्यातील पल्लेदार आवाजाची सुरावट रसिकराजाला अर्पण केली. 'त्रेतायुगात त्या वचनाचा योग जुळून आला, गोविंद वेडा झाला, राधेला गोविंद वेडा झाला.' त्याकाळी गाण्याला मागणी नव्हती. वगाचा चाहता वर्ग होता. वगाची नांदी झाली. आई-बापाच्या पाळण्याची दोरी आपल्या शेंडीला बांधून जोडे शिवणाऱ्या रोहिदासांच्या प्रथम दृश्याने रसिकांच्या हृदयावर स्थान पटकावले. रोहिदासाची भूमिका रसिकांनी डोक्यावर घेतली. वगाच्या उत्तरार्धात कर्मठांनी केलेला छळ असह्य होऊन दाटून आलेल्या कंठाने गहिवरताना डोळ्यांतील आसवांना मोकळी करून दिलेली वाट उपस्थित रसिकांच्या नजरेतून सुटली नाही. सर्व रसिकांनाही रडू कोसळले. बहिणीच्या मांडीवर रोहिदासाची प्राणज्योत मालवते. वग संपतो. पडदा पडतो. प्रेक्षकांतून रोहिदासाला स्टेजवरच थांबवण्याची विनंती होते. एकादशीच्या सुरुवातीलाच रोहिदासाच्या दर्शनाचा लाभ घेण्यास वारकऱ्यांची रांग लागते. भूमिकेशी एकरूप होऊन केलेल्या कामाची पोचपावती मिळते. हीच आनंदाची पर्वणी.

**प्रश्न : तुम्ही लिहिलेली वगनाट्य कोणती?**

**उत्तर** : आजपर्यंत मी अठरा वगनाट्ये लिहिली आहेत. त्यातील अंधाऱ्या रात्रीचे गुपित, ही कहाणी पुनर्जन्माची, एक माणूस नावाचं गिधाड, बरं होतं राज्य इंग्रजांचं, फडकला सीमेवर तिरंगा, रंगली रक्ताने मुंबई इत्यादी. यातील एकही वगनाट्य प्रकाशित करू शकलो नाही, ही खंत आहे.

**प्रश्न : तमाशाने काय दिले?**

**उत्तर** : मी भूमिहीन, बेरोजगार, तमाशा कलेने काम दिले. पोटापुरते दाम दिले. त्यातून रसिक सेवेचा आनंद दिला.

**प्रश्न : तमाशा जीवनाचा अनुभव सांगा?**

**उत्तर** : तमाशा कलेला राजाश्रय नाही. त्यामुळे उपेक्षाच वाट्याला आली. कार्यक्रमाच्या ठिकाणी गावातून गोळा करून आलेल्या भाकरी घरी नेऊन उन्हाळ्यात वाळवायच्या आणि पावसाळ्यात चटणीच्या पाण्यात मीठ टाकून शिजवून खाऊन दिवस काढले. अन्न टाकलं नाही. आजही टाकत नाही. परंपरा जपताना फार काही नाही; पण पोटापुरतं मिळालं. कधी पोटभर, तर कधी अर्धपोटी राहून वेळ मारून जीवन जगावं लागलं. असं असतानाही जीवनाचा त्याग करण्याचा विचार मनात कधीही डोकावला नाही. आहे त्यातच समाधान मानलं. आज सत्तरीत आहे. जीवनभर कलेची सेवा करून साधं घर बांधता आलं नाही. आजही पडक्या घरात राहावं लागतंय. पावसाळा सुरू झाला, की रात्री झोपेत असणाऱ्या मुला-नातवंडाकडे बघून झोपच उडते. अशा प्रकारचे जीवन कोणाच्याही वाट्याला येऊ नये.

**प्रश्न : तमाशा कलेमुळे मिळालेला अतिउत्कट आनंदी क्षण कोणता?**

**उत्तर** : घराण्याला तमाशाची एकशेतीस वर्षांची परंपरा आहे. आजपर्यंत फार काही मिळालं नाही; परंतु शासनानं उशिरा का होईना; पण अगदी योग्य वेळी दखल घेतली आणि विठाबाई नारायणगावकर जीवनगौरव पुरस्कार जाहीर केला. हा माझाच सन्मान नाही, तर मागील दोन पिढ्यांचाही आहे. माझी भावंडे तमाशा कलावंत आहेत त्यांचा आहे. त्यामुळे मी खूप आनंदी आहे. माझे सारे आयुष्य उजळून निघाले आहे. त्याबद्दल शासनाचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. ●●●

**(लेखक प्राध्यापक आणि आधुनिक वाङ्मयाचे अभ्यासक आहेत.)**

# सुसंस्कारित करणारी काटेरी पायवाट

जगण्याच्या घडणीत माणूस आपला प्रवास करत जातो. तो प्रवास कोणाच्या वाट्याला काटेरी, तर कोणाच्या वाट्याला सुखद आनंदाचा असतो. मात्र, या प्रवासात अनेक चांगले आणि वाईट अनुभव येत असतात. ते अनुभव त्या-त्या माणसाला जगण्याचे नवे भान देतात. माणूस म्हणून असलेल्या जाणिवेची जाण देतात. घडलेल्या चुकीबद्दल किंवा राहून गेलेल्या एखाद्या घटनेबद्दल सल मनात ठेवून जातात. ती सल आतून कुरतडत राहते. तरीही ती काहीतरी नवे शिकवते. माणूस आयुष्यामध्ये प्रत्येक वळणावर काही गोष्टी आत्मसात करतो; पण त्या सहजासहजी मिळत नसतात. त्यासाठी वेदना सोसाव्या लागतात. अनंता सूर हे मराठी साहित्यक्षेत्रात सर्वांना परिचित असणारे नाव. त्यांचा जीवनप्रवास विविधांगी अनुभवांचा असला तरी तो काटेरी आहे.




डॉ. सतेज दणाणे

**संस्कारशीलता वाचकांना घडवण्याचे कार्य करते**

नवविचारांची पेरणी लेखकाने केलेली आहे. या आत्मकथनाच्या वाचनातून आपल्या असे लक्षात येते, की फक्त लेखकच सुसंस्कारित झालेला नाही, तर वाचकालाही तो सुसंस्कारित करतो आहे. लेखक एका ठिकाणी म्हणतो, ''कामाची लाज बाळगून मी त्यावेळी कदाचित पळवाट काढली असती, तर कदाचित रात्रीला बाप रागवला नसता; परंतु डोक्यावर विचारांचं ओझं घेऊन मी सुखाने झोपू शकलो नसतो. त्यापेक्षा चांगल्या कामासाठी कोणाचे शिव्याशाप पचवावे लागले तरी चालेल; परंतु चांगल्या कामाची लाज कशाला बाळगायची, हेच जीवनाकडून मी त्यावेळी शिकलो.'' हे विचार, ही संस्कारशीलता वाचकांना घडवण्याचे कार्य करते.

हा 'काटेरी प्रवास' एकट्या अनंताचा नाही तर त्याच्या कुटुंबाचा आहे. त्या गावातील प्रत्येक तरुणाचा आहे. शिक्षण घेतलेल्या आणि प्राध्यापक म्हणून नोकरी करणाऱ्या प्रत्येक जिद्दी तरुणाचा आहे. संस्थाचालकांच्या लुटारू, बाजारू वृत्तीला बळी पडलेल्या आणि संघर्ष करून यशस्वी झालेल्या सर्वांचा आहे. शिक्षण घेण्यासाठी पाऊल टाकलेल्या आणि उच्चशिक्षण घेणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याच्या मुलाचा हा काटेरी प्रवास आहे. विदर्भातील गावागावांतील माणसाचे जीवन, त्याची बोलीभाषा, रीती, रूढी, परंपरा, त्याची शेती, त्याचे कष्ट, वेदना, दुःख, त्याच्या अपेक्षा, स्वप्ने यांचा एक ऐवज आहे.




**प्राध्यापक होण्यासाठी संस्थाचालकांना पैसे द्यावे लागतात**

अनंताने जे अनुभवले आहे. ते नेमकेपणाने त्यांनी या पुस्तकात मांडले आहे. पहिलीपासून त्यांचा शैक्षणिक प्रवास जसा आलेला आहे. तसा त्यांच्या गावातील, निसर्गातील बदल, जग रहाटी, खेळणे, बागडणे, शिकार करणे, ससे धरणे, शेतीची कामे करणे, गाव, घर, नात्यातील माणसे, गावातील माणसे, शेती यापासून तुटत जाणे, शहर संस्कृतीशी जोडले जाणे यातील आतली सल, शाळेतील गमतीजमती, अपमानकारक प्रसंग, नापास होण्याचे दुःख, पास होण्याचा आनंद आणि विविध महाविद्यालयांतील प्राध्यापकीचा अनुभव, हा सगळा व्यापक पट 'काटेरी पायवाट'चा आहे.

सामान्य कुटुंबातील शेतकऱ्याच्या पोराचा प्राध्यापक होण्यापर्यंतचा संघर्षमय प्रवास 'काटेरी पायवाट' या आत्मकथनात अनंता सूर यांनी कथन केला आहे. एम.ए., एम.फिल., नेट परीक्षा पास झाल्यानंतर अनंता यांना कॉलेजमध्ये तासिका तत्त्वावर प्राध्यापकी करावी लागते. प्राध्यापक होण्यासाठी संस्थाचालकांना पैसे द्यावे लागतात. तेथेही त्यांची फसवणूक होते; पण ते संस्थापकाच्या दारी फेऱ्या मारून पैसे परत मिळवतात. ही त्यांची चिकाटी संपूर्ण जीवनसंघर्षामध्ये पाहायला मिळते.

**दहावीत दोनवेळा नापास**

प्रांजळपणा हा या आत्मकथनाचा एक विशेष म्हणून नोंदवावा लागतो. लेखक जे सांगतो ते सरळपणे. कुठलाही आडपडदा न ठेवता तो आपले जीवन कथन करतो. लेखक दहावीमध्ये दोन वेळा नापास झालेला आहे. तो का नापास झाला, त्याचे कारण येथे स्पष्टपणे नोंदवले आहे. तो म्हणतो, खरं तर प्रेमाच्या व्याख्येच्या कोणत्याच पठडीत मी बसत नव्हतो. फक्त ती मला आवडायची. मोठं झाल्यावर आयुष्यात अशाच चेहऱ्याचं कुणीतरी साथीदार व्हावं, एवढी माफक अपेक्षा त्यावेळी मनाला, मेंदूला स्पर्श करून जात होती. त्यामुळे ती मला एकदा दिसली, की सारा दिवस आनंदात गेल्यासारखा वाटायचा. मात्र, हा आनंद कोणत्या प्रतीचा, कशासाठी होता, हे सांगता न येण्यासारखं गुपित असायचं. त्यासाठी लेखक त्या आकर्षक चेहऱ्याच्या सीमा या मुलीच्या घरासमोर शाळा सुटली की जाऊन बसायचा. त्यामुळे त्याचे अभ्यासात लक्ष राहिले नाही आणि दोन वेळा तो दहावीत नापास झाला. हे लेखकाने प्रांजळपणे नमूद केले आहे.

**उसवत जाणे खूप वेदनादायक असते**

आत्मकथा ही प्रक्रिया स्वतःला व्यक्त करणारी असते. साहित्यातील सर्व वाङ्मयप्रकारापेक्षा वेगळा आणि अवघड वाङ्मयप्रकार हा आहे. इतर वाङ्मयप्रकारात मी असतोच असे नाही; पण आत्मकथनात मी स्वतःची कहाणी सांगतो. एक प्रकारे तो स्वतःला उसवत जातो. हे उसवत जाणे खूप वेदनादायक असते. जगलेले, भूतकाळात गेलेले जीवन पुन्हा बघणे, अनुभवणे हे धाडस आहे. तशी सांगण्याची आणि लिहिण्याची, मांडण्याची एक कला आहे. जगलेले आयुष्य लेखनातून मांडताना त्या वेदना, दुःख किंवा आनंद हा माणसाच्या जीवनाशी जोडलेला असतो. माणसाचे जीवन 'सुख जवा पाडे, दुःख पर्वता एवढे' असे असते. अनंता सूर यांचे जीवन 'काटेरी पायवाट' आहे. तिथे सुख कसे आणि किती असेल? १८० पानांच्या पृष्ठसंख्येमध्ये शब्दांच्या माध्यमातून त्यांनी दृश्यमान केलेली सुखदुःखे, वेदनांकित हे जीवन आहे.

**भूसांस्कृतिकतेशी नाते**

शेतकऱ्याचा मुलगा असणे अर्थात भूसांस्कृतिकतेशी नाते असणे. लेखकाचे नाते शेतीशी आहे. शेतकऱ्याला ऊन, वारा, थंडी असो, कष्ट करीत राहणे हे त्याचे जीवन. लेखकाला शेतीवाडीची कामे करावी लागतात. ती करत करतच लेखक आपले शिक्षण घेत राहतो. लेखकाला त्याच्या मोठ्या भावाचा शिक्षणासाठी हातभार लागतो, ही जमेची बाजू. तासिका तत्त्वावर नोकरी मिळवण्यासाठी त्याला अनेकांचे उंबरे झिजवावे लागतात. अनेक ठिकाणी कॉलेजमध्ये तो लेक्चर देत राहतो. त्याची वाटचालीतील जिद्द, चिकाटी प्रकर्षाने जाणवते.

अनंता सूर यांनी भोगलेली जीवनाची काटेरी वाट त्याच्या आयुष्याला एका नव्या वळणावर घेऊन जाते. संघर्षातून काटेरी पायवाट चालणाऱ्या लेखकाची जीवन कहाणी वाचकांना प्रेरणादायी अशी आहे.

लेखक त्याच्या जीवनातील अनेक प्रसंग कथन करतो. ते प्रसंग वाचकांनाही अस्वस्थ करतात. त्या प्रसंगांतून लेखक नेहमीच नवीन काहीतरी शिकतो आहे. एवढेच नाही, तर त्यांनी वाचकाच्या मनावर प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे सुसंस्कार केले आहेत. नवे विचार, नवी दिशा, नवी दृष्टी आणि भूसांस्कृतिक समाजभान त्यांनी दिले आहे. पर्यावरणीय रचना, लोकव्यवहार, लोकभाषा आणि भोवताल याविषयीचे नेमकेपणाने आकलन करून घेण्यासाठी 'काटेरी पायवाट'मधील अनुभव आणि भाषा महत्त्वाची ठरणारी आहे. मला वाटते, अनंता सूर यांचा हा ग्रंथ फक्त आत्मकथन या संकल्पनेत मावणारा नाही, तर या ग्रंथाला अनेक पैलू आहेत. आत्मकथन म्हणून एक बाजू या ग्रंथाला आहे. भाषा अभ्यासाचा एक मोठा स्पेस म्हणूनही विचार व्हायला हवा. वाङ्मयीन अंगाने, सामाजिक, सांस्कृतिक अंगाने अतिशय महत्त्वाचा ठरावा असा हा वाचनीय ग्रंथ आहे. कृषिजन्य संस्कृती किंवा शेतकऱ्यांच्या जगण्याचे अनेक पदर यामध्ये आहेत. शेतकऱ्यांच्या मुलांचा शाळा, महाविद्यालय आणि शेतीशी असलेला परस्पर संबंध यामध्ये आहे आणि सर्व पदव्या घेतल्यानंतर शिक्षणाच्या पवित्र क्षेत्रात संस्थाचालकांनी सुरू केलेले धंदे, बाजार त्यामध्ये भरडून निघणारे शिक्षित तरुण, त्यांचे दुःख, त्यांची वेदना, त्यांची उपेक्षा आणि स्वप्न हे भयानक वास्तव अनंता सूर यांनी 'काटेरी पायवाट'मध्ये अतिशय धाडसाने मांडले आहे. हे सांगणे यामधून त्यांचे समाजभान व्यक्त होतेच, तसे वास्तव समाजाची स्थिती-गती समजते आहे. यादृष्टीनेही असलेली या ग्रंथाची मौलिकता विशेष महत्त्वाची आहे. ●●●

**(लेखक हे समीक्षक व प्राध्यापक आहेत.)**

**काटेरी पायवाट**

**लेखक : अनंता सूर**

**प्रकाशन : अथर्व पब्लिकेशन्स, धुळे**

**मूल्ये : ३५०**

**पृष्ठे : १८०**

# नामदेवरावांची जन्मशताब्दी



मराठी साहित्यात डोंगराएवढे काम करूनही अनेकांची उपेक्षा झाली आहे. त्यात नामदेवराव व्हटकर एक. कोरोना काळात जन्मशताब्दी आली म्हणून आणि आता जन्मशताब्दी निघून गेली म्हणून त्यांच्याकडे कोणाचे फारसे लक्ष गेले नाही. उशिरा का होईना; पण देशाचे एक नेते सुशीलकुमार शिंदे यांच्या उपस्थितीत अलीकडेच सोलापूरमध्ये एक कार्यक्रम झाला, हे समाधानकारक म्हणावे लागेल. नामदेवरावांच्या जातीने पुढाकार घेऊन हा कार्यक्रम घडवला. गौरव ग्रंथाचे प्रकाशन केले. हे चांगले झाले; पण एकूण साहित्य क्षेत्राने पण नामदेवरावांची उपेक्षाच चालवली आहे. शंकरराव खरात यांची जन्मशताब्दीही याच काळात आली आणि दुर्लक्षित झाली. त्यांच्या नावाने त्यांच्या जन्मगावी म्हणजे आटपाडीतील लोक एकत्र येऊन दोन दिवसांचे साहित्य संमेलन त्यांच्याच नावाने घेणार आहेत; पण मुख्य साहित्य प्रवाहाने मात्र त्यांच्याकडे अजून लक्ष दिलेले नाही. नामदेवराव आणि शंकरराव या दोघांनीही आपल्या कामाचे डोंगर उभे केले आहेत. जे आजही ठळकपणे दिसतात. अन्य काही सवर्ण लेखकांच्या जन्मशताब्दी आल्या; पण त्या गाजवल्या गेल्या. त्याबद्दल आक्षेप घेण्याचे कारण नाही; पण या दोन महान लेखकांच्या वाट्याला आलेली उपेक्षा संपणार की नाही, हा प्रश्न आहे.

नामदेवराव एक लेखक, एक कार्यकर्ता, एक कलावंत, एक चिंतक म्हणून वैशिष्ट्यपूर्ण होते. अशी वैशिष्ट्ये खूप कमी लोकांत आढळतात. त्यांनी तीन कादंबऱ्या, आठ नाटके, तीन लघुकथा संग्रह, शंभराहून अधिक वगनाट्ये, कवितासंग्रह, आठ वैचारिक ग्रंथ लिहिले. चित्रपट क्षेत्रात तर त्यांची कामगिरी अष्टपैलू म्हणावी लागेल. निर्माता, दिग्दर्शक, नायक, कथालेखक, पटकथालेखक, संवादलेखक, गीतलेखक, वितरक, अशी सर्व कामे करणारा माणूस दुर्मीळच म्हणावा लागेल. त्या काळात सुलोचनांसारख्या अभिनेत्री नामदेवरावांच्या नायिका बनल्या होत्या. जातीची दाहकता चटके देण्याच्या काळात आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर त्यांनी हे सारे घडवले. अनेक कलांचे शास्त्र लिहून काढले. नभोवाणीचे लेखनतंत्र, अभिनयशास्त्र, तमाशा कला, चित्रपट रसग्रहण, महाराष्ट्रातील चर्मोद्योग, रूपक कथांचे लेखन, असा एक मोठा पसारा त्यांच्या लेखणीतून अवतरला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'शूद्र पूर्वी कोण होते आणि ते शूद्र का झाले' या जगप्रसिद्ध ग्रंथाचा त्यांच्यावर इतका परिणाम झाला, की त्यांनी 'भारतातील जातिभेद आणि त्यावर उपाय' हा संशोधनपर ग्रंथ सिद्ध केला.

एकीकडे प्रचंड लेखन, नाटक-सिनेमाची निर्मिती चालू असताना त्यांनी माध्यमांकडेही लक्ष दिले. १९४५ ते १९६८ म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळ ते संयुक्त महाराष्ट्रानंतरचा काळ, अशी चार साप्ताहिके पदरमोड करून चालवली.

क्रांतिवीर नागनाथ नायकवडी, कर्नाटकातील तेव्हाचे एक लढाऊ कार्यकर्ते व्ही.एल. पाटील, प्रसिद्ध विचारवंत आचार्य जावडेकर यांनी सुरू केलेल्या 'गावराज्य' साप्ताहिकाचे संपादन त्यांनी केले. पुढे पत्री सरकार स्थापन केलेल्या क्रांतिकारकाबरोबर काम करणे म्हणजे मोठी जोखीम होती. या कामाला प्रेरणा देणारी स्वातंत्र्यलढ्याची प्रबळ भावना त्यासाठी आवश्यक होती, जी नामदेवरावांकडे होती. इंग्रजांचा ससेमिरा नेत्यांच्या मागे लागला होता. तो नामदेवरावांच्या मागेही लागला. ढोर समाजात त्यावेळी पदवीपर्यंतचे शिक्षण घेणारे खूप कमी तरुण होते, त्यात एक नामदेवराव होते. डॉ. बाबासाहेबांच्या चळवळीतही तेव्हा ढोर-चर्मकार समाजातील अनेकांनी हिरीरीने भाग घेतला होता. शिवतरकर, काजोळकर, दत्तोबा चव्हाण, पोळ, राजभोज, असे कितीतरी नेते सांगता येतील. काही जण मध्येच बाहेर पडले. काही जण टिकून राहिले. नामदेवराव काँग्रेस आणि त्यांच्या हरिजन सेवक संघात सक्रिय होते; पण बाबासाहेबांच्या विचारांच्या त्यांच्या मनावर खूप परिणाम होता. ६ डिसेंबरला बाबासाहेबांचे महापरिनिर्वाण झाले आणि त्याचदिवशी आपला प्रेस गहाण ठेवून नामदेवरावांनी या अंत्ययात्रेचे चित्रीकरण करून माहितीपट बनवला. बाबासाहेबांच्या अंत्ययात्रेवरचा तो पहिला माहितीपट म्हणून त्याला समाजमान्यता मिळाली. नामदेवरावांनी आपली लेखन परंपरा आपल्या मुलांपर्यंत पोहोचवली. या मुलांनी म्हणजे अशोक, जयवंत आणि यशवंत यांनी अतिउच्च शिक्षण घेऊन अतिउच्चपदे तर भूषवलीच, शिवाय वडिलांची लेखन परंपराही पुढे नेली. अशोकचे 'मेलेलं पाणी' हे आत्मकथन एक मैलाचा दगड ठरलेले आहे. आमदारपद भूषवण्याबरोबरच शासनाने दुर्बल, दलितांसाठी नेमलेल्या अनेक समित्यांत नामदेवरावांनी काम तर केलेच, शिवाय राज्य शासनाच्या पहिला दलित मित्र पुरस्काराचे ते मानकरीही ठरले. शेकडो पैलू झळकावत जगलेले आणि संघर्षशील बनलेला हा माणूस दुर्लक्षित व्हावा हे शोकजनक आणि संतापजनक आहे.

## आम्ही भारताचे लोक...

पाच-सहा हजार जाती, डझनभर धर्म-पंथ, असंख्य भाषा, वर्ग आदीत वर्षानुवर्षे अडकलेल्या हिंदू माणसांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या सर्वांतून बाहेर काढले आणि भारतीय बनवले. व्यवस्थेने या सर्वांना आम्ही ऐवजी मी आणि मीचेही अनेक तुकडे केले होते. या सर्व तुकड्या-तुकड्यांत विखुरलेल्या मीचे पुन्हा आम्ही करण्याचे काम बाबासाहेबांनी संविधानाच्या रूपाने

केले. आम्ही हिंदू, आम्ही अहिंदू, असे सांगणाऱ्या आम्हींना भारतीय बनवले. आम्ही भारतीय लोक हे संविधानाच्या उद्देशिकेत झळकले आणि संविधानाचेच नव्हे, तर देशाचे मालक झाले. आम्ही भारतीय लोक असे सांगणाऱ्यांनी देशाचे ऐक्य, बंधुता आदी कल्पना आकाराला आणण्याचे काम केले हे खरे आहे; पण गेल्या काही वर्षांपासून आणि हिंदू राष्ट्राच्या गर्जनेपासून आम्ही भारतीय लोकांना आतून-बाहेरून धक्के बसू लागले आहेत. सामाजिक, सांस्कृतिक, भावनिक ऐक्याला तडे जाऊ लागले आहेत. जाती डोके वर काढू लागल्या आहेत. त्या अधिक आक्रमक बनत सामूहिकपणे कोणाची तरी हत्या करत आहेत. धार्मिक भावना टोकदार बनत आहेत. धार्मिक संघर्षासाठी, सांस्कृतिक संघर्षासाठी चित्रपटापासून ते बुरख्यापर्यंत, आहारापासून ते समान नागरी कायद्यापर्यंत अनेक कलह कळत-नकळतपणे लादले जात आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर राज्यघटनेचे नायक-मालक असलेले आम्ही भारतीय लोक आणि त्यांच्यासाठीचे संविधान जोपासणे, त्याची प्रतिष्ठा वाढवणे, ते सक्रिय करणे अत्यावश्यक झाले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून जसजसा धर्मवाद, राष्ट्रवाद, मूलतत्त्ववाद वाढेल तसा संविधानाचा जागरही सुरू आहे. अनेक संस्था आणि व्यक्ती या कामात गुंतल्या आहेत. भोरसारख्या छोट्याशा खेड्यातील डॉ. रोहिदास जाधवसारखा तरुण आपल्या संस्थेच्या आणि सहकाऱ्यांच्या मदतीने संविधानसाक्षर गावे बनवण्याच्या प्रयत्नात आहे. अजूनही काही तरी दिलासादायक वाटावे, असे घडते आहे. या सर्वांची गती वाढायला हवी. परीघ वाढायला हवा. कारण लोकशाहीवादी, समाजवादी, कल्याणकारी, धर्मनिरपेक्ष राष्ट्र जगवायचे असेल, तर आपल्याला संविधान साक्षरता, संविधान सन्मान, संविधान आचरण याशिवाय पर्याय नाही. व्यवस्थेवर, माणसावर जेव्हा-जेव्हा वेगवेगळे आघात होतात, तेव्हा आपल्या हातात संविधानच ढालीसारखे राहत असते. आपल्या अस्तित्वासाठी त्याचा वापर करावा लागतो. बऱ्याच जणांना हे कळू लागले आहे, हेही महत्त्वाचे आणि चांगले आहे. अनेक नोकरदार आणि त्यांच्या संघटना संविधान जागराच्या कार्यक्रमात स्वेच्छेने उतरू लागल्या आहेत. मध्यमवर्गीय असे संविधान जागराच्या म्हणजे एकूणच राष्ट्रकार्यात पुढे येणे, हेही महत्त्वाचे आहे. कोणत्याही बदलात मध्यमवर्गीयांची भूमिका खूप महत्त्वाची असते. मध्यमवर्गीय म्हणून त्यांची हेटाळणी करून भागणार नाही, तर त्यांच्याकडून उपलब्ध होणारी ऊर्जा योग्य पद्धतीने आणि जाणीवपूर्वक वापरण्याची क्षमताही आपण मिळवली पाहिजे. पुढे येणाऱ्या या वर्गाला प्रोत्साहन दिले पाहिजे. औरंगाबादमध्ये जिल्हा परिषदेतील कर्मचारी आणि अधिकारी शिरीष बनसोडे यांच्या विधायक नेतृत्वाखाली एकत्र आले आणि त्यांनी 'आम्ही भारतीय लोक' या नावाने एक दिवसाचे संमेलन घेतले. खरे तर, याला संमेलन म्हणण्याऐवजी राज्यघटनेने सुचवलेले राष्ट्रकार्यच म्हणायला हवे. कसलेही राष्ट्रीय चष्मे डोळ्यावर न ठेवता केवळ संविधानाच्या सन्मानासाठी आणि तोच भारतीयांचा जीवनमार्ग आहे, हे सांगण्यासाठी हे संमेलन घेण्यात आले. कोणी कावीळ झालेल्या डोळ्यांनी त्याकडे पाहता कामा नये, तर अशा कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी पुढे आले पाहिजे.

खरे तर, आपली सर्व नोकरशाही ही कधीही, कोणत्याही सरकारला अथवा ते बनवणाऱ्या कोणा राजकीय पक्षाला जबाबदार



नसते. ती राज्यघटनेलाच जबाबदार असते, हे सर्वप्रथम गांभीर्याने लक्षात घेतले पाहिजे. राज्यकर्त्यांच्या सोयीचे धोरणे आखणारे आणि त्यांच्या मागे-मागे जात चमचेगिरी करणारे हे कधी संविधानाचे रक्षक नसतात, तर ते त्यांच्या लाभाचे रक्षक असतात. नोकरशाहीच्या जबाबदारीचे तत्त्व संविधानाशी जोडलेले आहे. म्हणूनच केंद्र सरकारच्या कारभाराविरुद्ध असमाधान व्यक्त करण्यासाठी सर्वप्रथम देशातील काही निवृत्त सनदी अधिकारी पुढे आले होते. संविधानाच्या सन्मानासाठी काम करणे म्हणजे एक नागरिक म्हणून, एक जबाबदार घटक म्हणून, एक अधिकारी वा कर्मचारी म्हणून संविधानाप्रती असणारे आपले मूलभूत कर्तव्य पार पाडणे असते. असे कर्तव्य पार पाडण्यासाठी मार्गदर्शकाच्या भूमिकेत आलेल्या शिरीष बनसोडे आणि त्यांच्या साथीदारांचे कौतुक करतच हा त्यांनी आणलेला विधायक आणि राष्ट्र बळकटीचा प्रवाह वाढत जावा; अशी अपेक्षा व्यक्त केली पाहिजे. आम्ही भारतीय लोकच जेव्हा संविधानसाक्षर भारत घडवण्यासाठी, संविधानाच्या प्रतिष्ठेसाठी पुढे येऊ तेव्हा स्वप्न पाहायला संधी मिळेल.

# हंडाभर पाण्यात हंडाभर बायका

पाणी जीवन आहे हे जसे खरे आहे तसे ते अभावग्रस्त झाले, की मरण असते. म्हणजे पाणी जीवन आणि ते मिळाले नाही तर मरण... ते पोषण आणि कुपोषण... पाण्याच्या साठ्याभोवतीच जिवांची निर्मिती आणि वसाहत होते. पाण्याच्या काठावरच माणूस आपली संस्कृती तयार करतो. जो पाण्यापासून जेवढा दूर त्याची संस्कृती तेवढीच वेगळी. इतर संस्कृतीपासून आगळीवेगळी असते. पाणी संस्कृती घडवते आणि बिघडवतेही. पाण्याचा अभाव आणि पाण्याची उपलब्धता या दोहोंच्या मध्ये संस्कृत्या आकार घेतात, वाढतात आणि क्षय पावतात.

जेथे पाणी भरपूर तेथील संस्कृती सर्वच अर्थाने वेगळी असते आणि जेथे थेंबा थेंबाचा अभाव तेथील संस्कृती वेगळी असते. स्थिर आणि प्रगत समाजाला आश्चर्यकारक वाटाव्यात अशा अनेक गोष्टी तेथे घडतात. अर्थकारण, शेती, शिक्षण, सांस्कृतिक आणि वैवाहिक जीवन आदी सर्वच बाबतीत काही आगळेवेगळे घडत राहते. पाणी जीवनाच्या सर्व अंगावर बरा आणि वाईट परिणाम घडवते. अशा गोष्टींच्या परंपरा तयार होतात. त्या मान्य पावतात. बऱ्याच वेळेला माणसाने माणसासाठीच केलेल्या कायद्याच्या चौकटीत बसत नाहीत; पण तरीही त्या रूढी आणि परंपरा म्हणून मान्यता पावतात. कुणाला त्याविषयी काही वाटतही नाही. त्या सर्वमान्य होतात.

कायद्याने आपल्याकडे एकपत्नी परंपरा आहे. तिचा भंग केला, की तो गुन्हा ठरतो; पण या कायद्याला चकवा देऊन किंवा तो झुगारून बहुपत्नीत्वाची म्हणजे अनेक बायका करण्याची प्रथा काही

गावांत रूढ झाली आहे. ही प्रथा आता बातम्यांचा आणि टी.व्ही. वरील मालिकांचा विषय बनते आहे; पण शेवटी हेही खरंय, की या प्रथांना प्रसिद्धी देणे म्हणजे त्या ज्याच्यातून जन्माला आल्या त्यावर हे उत्तर नसते. डेंगणमाळ (ता. शहापूर) हे मुंबई आणि नाशिक या प्रगत शहरांच्या मध्यावर असलेले असेच गाव. ते चर्चेत आलेय ते अनेक बायका करण्याच्या प्रथेमुळे. ही प्रथा काही चंगळवादातून, मस्तीतून आणि पुरुषप्रधान व्यवस्थेतून आलेली नाही, तर तिचा केंद्रबिंदू किंवा उगमस्थान  आहे ते पाणी. आता पाणी आणि बायकांचा संबंध काय, असा प्रश्न तयार होईल आणि त्याचे उत्तर पाणी आणि बायकांचा संबंधच या व्यवस्थेत अधिक असतो. पाण्याशी संबंधित सर्व कामे बायांच्या वाट्यालाच आलेली असतात. पाणी जमवण्यापासून ते खर्च करण्यापर्यंत बाईचीच भूमिका मध्यवर्ती असते. डेंगणमाळ येथेही असेच आहे. छोट्याशा खेड्यात पाण्याची उपलब्धता नाही. जणू काही रोज या गावातील बायांना पाण्याची शिकार करत दहा बारा किलोमीटरचे अंतर तुडवावे लागते. या गावाचा विकासाशी कधीच संबंध आलेला नाही. 'सब का साथ, सब का विकास' असो किंवा 'गर्जा महाराष्ट्र माझा' असो, सर्व धोरणांपासून हे गाव अलिप्त आहे. जगण्यासाठी आवश्यक असणारे पाणी मिळवायचे कसे हीच या गावासमोरची एक विवंचना आहे. या विवंचनेपोटी गावातल्या पुरुषांनी एक उत्तर काढले. ते म्हणजे, पाणी वाहून आणण्यासाठीच लग्नाच्या बायकोशिवाय आणखी दोन–तीन बायका करायच्या आणि त्यांना पत्नीऐवजी पाणीवाली बायको बनवून फक्त पाणी शोधून आणण्याचे काम द्यायचे. डोक्यावर हंडा घेऊन या बायांनी नुसते फिरायचे. दहा–पंधरा किलोमीटर अंतर तुडवायचे. हंडा डोक्यावर घेऊन घराकडे परतायचे. लग्नाच्या बायकोने स्वयंपाक आणि घरातील अन्य कामे करायची, अशी ती प्रथा तयार झाली आहे. म्हणजे जिचे प्रत्यक्षात लग्न झाले ती घरातल्या कामात आणि ज्यांना बायकोप्रमाणे असेच ठेवून घेतले त्यांची पाणी आणणारी फौज बनवा, असा मामला सुरू आहे. त्याला कोणी आक्षेप घेत नाही. कारण आक्षेप घेणारे पाण्याचा प्रश्न सोडवू शकत नाहीत. या बायांना पत्नी म्हणून कायदेशीर दर्जा नाही. बहुतेक बाया विधवा, परित्यक्त किंवा अन्य काही तरी बनून उघड्यावर पडलेल्या असतात. अशांची निवड बायको म्हणून केली जाते आणि त्यांना पाणीवाली बाई म्हणून हंड्यात अडकवले जाते. स्वतःचे आयुष्य कितीही कोरडे पडले तरी हंडा ओला करण्याची जबाबदारी त्यांच्यावर असते. नसलेले पाणी त्या शोधून काढतात. हंड्यातच अडकतात आयुष्यभर आणि तेथेच त्यांचा कोंडमारा होतो. त्यांना पत्नी म्हणून कायदेशीर दर्जा नसला, तरी सामाजिक सुरक्षा लाभते. निदान वरवर का होईना; पण त्या कुटुंबाचा घटक बनतात. त्यातच त्यांना आनंद असतो. एरव्ही गावगाड्यात विधवा आणि परित्यक्तेचे जीवन कठीण आणि यातनामय असते. पाण्याचा रिकामा हंडा आणि पाण्यासाठीची शिकार त्यांच्या मदतीला येते. अशा महिलांमुळे गावातील अनेक पुरुष तीन–चार बायकांचे मालक बनले आहेत आणि या महिला वेगळ्या अर्थाने गुलाम बनल्या आहेत. आता हा तिढा कसा सोडवायचा, असा प्रश्न आहे आणि त्यावर गावावर पाण्याची ओंजळ ओतणे, हे एकच उत्तर आहे. शासनासारख्या महाकाय व्यवस्थेने मनावर घेतले, की तो प्रश्न चुटकीसरशी सुटतो; पण मनावर घ्यायचे कुणी, हा प्रश्न उरतोच. पाण्याची टंचाई एक नवी संस्कृती खरं म्हणजे विकृतीच जन्माला घालते आहे. हंडाभर पाण्यात, हंडाभर महिला तडफडताहेत आणि एक नवा सामाजिक प्रश्न जन्माला येतो आहे. हा प्रश्न प्रगत समाजाला शोभणारा नाही. झेडपीचा टँकर पळवणे एवढेच त्यावर उत्तर असू शकत नाही. रूढ होऊ पाहणारा, समाजमान्य होऊ पाहणारा हा पाण्याचा प्रश्न सोडवायचा कसा आणि त्यासाठीची इच्छाशक्ती कशी आणायची, हा महत्त्वाचा मुद्दा आहे.



पाणीटंचाई केवळ नव्या बायका जन्माला घालत नाही, तर लग्नाच्या बायांना सासरमधून माहेरला पळवूनही लावते. रात्रंदिवस पाण्याचा शोध घेत, हाडे खिळखिळी करून घेणे आपल्याला जमणार नाही म्हणून अनेक टंचाईग्रस्त गावांतील विवाहित महिला नवऱ्याला 'जय हो' म्हणत घटस्फोट घेतात आणि माहेरी निघून जातात. टंचाईग्रस्त सासरपेक्षा माहेर बरे बा, असे त्यांचे म्हणणे असते. ते कोणीही खोडून टाकू शकत नाही. घटस्फोटाचे कारण पाणी ठरते आणि डेंगणमाळ ते लग्नाचे कारण ठरते. नाशिक जिल्ह्यात सुरगाणा तालुक्यातील दांडीची बारी या तीनशे लोकवस्तीच्या पाड्यातील अनेक विवाहिता नवरा सोडून माहेरी पळून जातात, अशी माहिती पुढे येत आहे. गावातल्या महिलांना पाण्यासाठीची मोहीम पहाटे चार वाजताच सुरू करावी लागते. इथे पाणी खूपच अडचणीच्या ठिकाणी आहे. दीड किलोमीटरची टेकडी चढून पाण्याच्या उगमाशी पोहोचावे लागते. डोक्यावर आणि काखेवर हंडा घेऊन टेकडी चढायची आणि उतरायची, अशी ही सर्कस आहे. पाण्याच्या ठिकाणी वाटीवाटीने पाणी हंड्यात भरावे लागते. आपला नंबर येईपर्यंत रांगेत थांबावे लागते. नंबर येतो तेव्हा सूर्यनारायण चाळीस सेल्सिअसची उष्ण किरणे उधळत असतो. एक मोठी कठीण लढाई या बायांच्या वाट्याला आली आहे. ती लढण्याची ताकद नसलेल्या अनेक बाया माहेरी पळून जातात. काहींनी वर डोंगरावरच हंडा ठेवून पळ काढल्याची उदाहरणे आहेत. दांडीची बारीत मुली द्यायला कोणी तयार होत नाहीत. नवरा आणि नवरी यांच्या आड पाण्याची टंचाई उभी राहते. गावाला असेच जगण्याची सवय लागली आहे. या गावापर्यंत ना कोणत्या भोंग्याचा आवाज पोहोचतो, ना कोणती समाधी कोणी बांधली याविषयीचा वाद पोहोचतो. उलट गावाकडच्या

दगडाधोंड्यांचे गाणे करून आपण गात असतो, दगडाधोंड्याच्या देशा... तर नव्या काळातला पाण्याचा प्रश्न अनेक ठिकाणी नव्या प्रथा-परंपरा निर्माण करतो आहे. टंचाई भोगणारा नवा समाज निर्माण करतो आहे. धर्मस्थळांकडे तीर्थ घेऊन धावणाऱ्यांच्या मनात असा कधीच प्रश्न निर्माण होत नाही, की तीर्थाचा एक थेंब घेऊन या गावाकडेही जावे... आता तसे होण्याचीही शक्यता नाही. कारण धर्म श्रेष्ठ आणि माणूस झुरळ बनवला जात आहे.

# हिंदुत्व गरळ ओकतो भारत माफी मागतो

दिल्लीतील एक उद्योगपती आणि वरिष्ठ अधिकाऱ्याच्या घरात जन्माला आलेली लाडली, सुंदर आणि उच्चविद्याविभूषित पोरगी म्हणजे नुपुर शर्मा. तिची जडणघडण आणि राजकीय कारकीर्द संघाच्या एक घटक असलेल्या अभाविपमध्ये झाली. दिल्ली विद्यापीठाच्या विद्यार्थी परिषदेत अध्यक्षपद भूषवून तिने तिथे अरविंद केजरीवाल यांच्याविरुद्ध विधानसभा निवडणूक लढवली. ती पराभूत झाली. आपच्या भक्कम ढालीवर तिच्या तोफेचा परिणाम झाला नाही. याच कालावधीत भाजपमध्ये अशा अनेक धडाडत्या तोफांना महत्त्वाचे स्थान मिळाले होते. त्या साध्वीही होत्या. प्रचंड वक्तृत्वाच्या जोरावर त्या कुणावरही तुटून पडतात. नामोहरण करू शकतात. मुख्यमंत्र्यांपासून राज्यपालांपर्यंत आणि केंद्रीय मंत्रिपदापासून ते पक्ष प्रवक्तेपदापर्यंत अनेक ठिकाणी महिलांची फौज तयार करण्याचा झपाटा भाजपने सुरू केला. अर्थात, अन्य पक्षांनीही भाजपची रि ओढली. जी भाषा पुरुष वापरू शकणार नाहीत, अशी भाषा त्यांनी वापरायला सुरू केली. परस्परांविरुद्ध खटले भरायलाही सुरुवात केली. महिलांच्या भांडणात सहसा कोणी भाग घेत नाही, तर भाजपमधील महिलापर्व खूपच चकाकत राहिले. सोनिया गांधी पंतप्रधान झाल्या, तर आम्ही मुंडण करू, असे सांगणाऱ्या महिला त्यावेळी भाजपमध्ये होत्या. गांधींवर टीका करून जणू काही रोज त्यांची हत्या करणाऱ्या बऱ्याच महिला भाजपमध्ये आहेत. प्रसारमाध्यमांमध्ये गांधी घराण्यावर, काँग्रेसवर आणि मुस्लिमांवर त्या तुटून पडू लागल्या, की त्यांच्या जिभेला नैतिकतेचे एखादे साधे हाड आहे की नाही, असा प्रश्न पडावा एवढे त्या गुरगुरतात. डरकाळ्या फोडतात. अर्थात, अशा प्रकारामुळे महिलावर्गाची निंदा करावी, असे नाही. कारण त्या ज्या काही बोलतात ते कोणी तरी वदवून घेत असते. त्या ज्या काही बोलतात त्याची संहिता तयार करणारे काही अदृश्य हात असतात. संहिता तयार करणाऱ्यांची संख्या संघ आणि भाजपमध्ये लाखोंच्या घरात आहे, दृश्य आणि अदृश्य स्वरूपात. काही काही वेळा संहिता उलटते तेव्हा सत्तेच्या जोरावर त्याचे परिणाम दाबून टाकले जातात. सावरकरांविषयी, गुरुजींविष०यी एक शब्द इकडचा तिकडे झाला, की राष्ट्रद्रोहाचा गुन्हा नोंदवला जातो; पण गांधी-नेहरूंची रोज बदनामी केली, की कधी राष्ट्रद्रोहाचा गुन्हा नोंदवला जात नाही. गाईवर खडा टाकला, की धर्मद्रोह होतो आणि सोनिया गांधी, प्रियंका गांधी यांची कितीही निंदा केली, त्यांच्या खासगी जीवनावर शिंतोडे उडवले, तर कसलीच निंदा घडत नाही. यालाच सत्तेचे राजकारण म्हणतात. यालाच विरोधकमुक्त भारत म्हणतात.

भाजपचे प्रवक्ते अन्य धर्मावर, अन्य धर्मांच्या नेत्यांवर जी गरळ ओकत असतात त्यास भारतात प्रत्युत्तर देणाऱ्या शक्ती क्षीण होत आहेत. त्या क्षीण होत आहेत म्हणून आणखी प्रतिकार वाढतो आहे. आपण ३७० रद्द केले किंवा आपण बाबरी मशीद पाडू शकलो, या साऱ्या गोष्टीतून या सर्वांना सैतानी बळ प्राप्त झाले आहे. परिणाम, अजून टीका चालू झाली. व्यक्तीपासून धर्मापर्यंत आणि धर्मापासून



प्रेषितांपर्यंत ती पोहोचली. अर्थात, अशा व्यूहरचनेत प्रतिस्पर्ध्यांची ताकद अजमावण्याचाही डाव असतो. कोणत्या खड्ड्यातून किती तरंग उठतात हे पाहण्याचा प्रयत्न असतो. तरंगाच्या रूपात अवतरणाऱ्या अनेक शक्तींचे भाजपशी संधान झाले आहे. त्यात दलित नेते आणि काही विचारवंत आहेत, मुस्लीम नेते आहेत आणि त्यांच्या काही संघटना भाजपची बी टीम असल्याप्रमाणे काम करतात. लाल किंवा भगव्या रंगाच्या गोफणीतून फेकले जाणारे दगड रोखणारे हातही कमी होत आहेत आणि भाजपच्या काही नेत्यांच्या जिभा सैल होत आहेत. अशीच नुपूर नामे महिलेची जीभ सैल झाली. तिने प्रेषित महम्मदसाहब पैगंबर यांच्या वैवाहिक जीवनाबद्दल आक्षेप घेणारी विधाने त्यांच्याच विचारांना वाहिल्या गेलेल्या एका टी.व्ही. चॅनलवर केली. हे चॅनल




मुद्दाम असे वाद घडवते. सत्ताधाऱ्यांचे पाठबळ असल्याने त्याच्यावर कुणी कारवाई करण्याचा प्रश्नच येत नाही. पैगंबरांच्या वैवाहिक जीवनावर भाष्य करताना नुपूरच्या लक्षात आले नाही, की असे भाष्य जर पलीकडून हिंदू देव-देवतांच्या वैवाहिक जीवनावर केले, तर किती मोठे संकट उभे राहील; पण नुपूर अशा संकटाची प्रतीक्षा करत असावी. कोणी आपला धर्म आपल्या तत्त्वज्ञानाच्या जोरावर वाढवते जसे की, गौतम बुद्ध. कोणी शस्त्रांच्या, युद्धाच्या जोरावर वाढवते, तर कुणी दुसऱ्या धर्माची निंदानालस्ती करून आपला धर्म श्रेष्ठ असल्याचे सांगते. त्यांचा धर्म भोंग्याला चिकटतो, हनुमानाच्या जन्मस्थळाला चिकटतो आणि अनेक जुन्या इमारती किंवा थडग्यांनाही चिकटतो. तशीच प्रतिक्रिया समोरून आली, की मग धर्मकलह सुरू होतो. हिंसाचार सुरू होतो. जसे की, तो नुपूरच्या विधानावर सुरू आहे. त्याविषयी भाजपचे नेते आणि सरकार यांना काहीच वाटत नसावे. कारण दंगलखोरांची धरपकड करण्यापलीकडे ठोस आणि गांभीर्याने काहीच घडत नाही. हिंदू राष्ट्राची घोषणा करू पाहणाऱ्या वातावरणात तसे काही घडण्याची अपेक्षा करणेही चुकीचे आहे.

नुपूरच्या विधानाची दखल भारताऐवजी आखाती राष्ट्रांत आणि त्यांच्या आखात सहकार्य समितीतून घेण्यात आली. तेथे निदर्शने झाली. पैगंबरसाहब यांच्यावर टीका करणाऱ्या भारतातील उत्पादनांवर बहिष्कार टाकण्याचा आदेश देण्यात आला. अनेक ठिकाणी भारतीय दूतावासांना बोलावून त्यांच्याकडे तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. दौऱ्यावर असलेल्या उपराष्ट्रपतींच्या कार्यक्रमावर बहिष्कार टाकण्यात आला. ज्या अरब राष्ट्रांशी आपल्या अनेक अर्थांनी आर्थिक, सांस्कृतिक आणि वाणिज्यविषयक नाड्या जोडल्या गेल्या आहेत तेथून येणारी प्रतिक्रिया सहजासहजी दुर्लक्षित करता येण्यासारखी नव्हती. नुपूरबाई उलटी करून गेली आणि तिची खूप मोठी किंमत देशाला चुकवावी लागली. मान खाली घालावी लागली आणि क्षमायाचना करावी लागली. जगात एक महाशक्ती बनण्याच्या प्रयत्नात असलेल्या देशावर अशा प्रकरणात माफी मागण्याची वेळ यावी, ही खूप नामुष्कीची गोष्ट आहे; पण भारतावर ती आली. भारत माफी मागताना हिंदुत्ववादी संघटना आणि त्यांची सर्व पिलावळ मूग गिळून गप्प होती. माफीनाम्यामुळे केवळ आखातातच नव्हे, तर जगात भारताची अप्रतिष्ठा झाली. याला जबाबदार कोण? सत्ताधारी पक्षाच्या प्रवक्त्याने जाणूनबुजून उलटी केली, की उलटी होण्याची संहिता त्यांना करून दिली, हेही उजेडात यायला हवे; पण ते कोण आणणार, हा मोठा प्रश्न आहे. ज्या बाईच्या विधानामुळे दीडशे कोटींच्या देशाला माफी मागावी लागली तिच्यावरच राष्ट्रद्रोहाचा गुन्हा दाखल केला पाहिजे, जसा नक्षलवाद्यावर होतो तसा. केवळ प्रवक्तेपण काढून घेण्यात काय अर्थ आहे?

नुपूर शर्माबरोबरच नवीन जिंदाल यांच्यावरही अशी वेळ आली. दोन वेळा हरयाणातून खासदार झालेल्या आणि सध्या जिंदाल स्टील आणि जिंदाल विद्यापीठाचे जे त्यांचेच आहे त्याचे ते प्रमुख आहेत. आग ओकणारी मशीन म्हणून तेही भाजपचे प्रवक्ते आहेत. कुणालाही राष्ट्रध्वज आपल्या घरावर लावता यावा यासाठी त्यांनी न्यायालयात आणि बाहेर आंदोलन केले होते. त्यांना न्यायालयात यश आले होते. त्यांनीही नुपूरप्रमाणेच प्रेषितांवर टीकाटिपणी केली आणि त्याच वेळेला मोदी आणि शहांचे तोंडभरून कौतुक केले. देशातील लोकांनी आपल्या चामड्याचे जोडे त्यांच्या पायात घालावेत इतके काम ते करत आहेत, असे जिंदाल यांनी म्हटले. शिवाय, आपल्या धार्मिक टिपणीबद्दल क्षमाही मागितली आहे. त्यांचेही पक्ष सदस्यत्व निलंबित करण्यात आले. महत्त्वाचा प्रश्न हा आहे, की साऱ्या जगावरच मूलतत्त्ववाद आणि धर्मवादाच्या सावल्या पडत आहेत. माणसांची मने आणि त्यांच्या भोवतालचे पर्यावरण एकदम नाजूक बनले आहे. कधीही कशाही स्वरूपात आणि कोठेही वणवा भडकू शकतो आणि स्वाभाविकच नेहमीप्रमाणे दोन डोंगरांच्या टकरीत झाडेझुडपेच नष्ट होत असतात. सध्या भारतात असंतोष निर्माण करू पाहणारे हे सगळे पाल्यापाचोळ्याप्रमाणे आहेत. हा जो ज्वालामुखीचा कडा तयार होतो आहे, त्यातून जगाला वाचवले पाहिजे. सुरुंगाच्या वातीला पहिली काडी कोण लावणार, या प्रश्नात कोणी आपल्या देशाला, धर्माला आणि लोकांना गुंतवू नये किंवा आपण त्यास जबाबदार ठरू नये, हाच आजच्या घडीचा संदेश आहे. पढवलेल्या पोपटांनी ओकलेल्या शब्दांमुळे महाकाय देशाला माफी मागावी लागणे, ही काही साधी गोष्ट नाही. म्हणून माफी मागणाऱ्या सरकारनेच या दोघांवर इतकी कडक कारवाई केली पाहिजे, की अशा प्रकारे माफी मागण्याची वेळ पुन्हा येणार नाही. •••

**- पंक्चरवाला**

# जिथे तिथे

कुणालाच कसे सुरक्षित
वाटत नाही आहे जिथे तिथे,
मारला जातो आहे माणूसच
रोज, जिथे तिथे

हे कसले पसरले आहे लोण,
जिथे तिथे,
कोणीही उठतो, जिवावर
कुणाच्याही, जिथे तिथे

विकत मिळतात का
माणसांना मारणारी
अशी माणसे
जिथे तिथे

कुठेही,
ठरवून विकत
घेतली जातात का ती
अशी, जिथे तिथे

एवढी कशी वाढली हो
बेरोजगारी, साऱ्याच चकचकीत
समृद्धीच्या युगात,
जिथे तिथे

कोण आहेत ते सारेच,
जे तरीही, हातावर हात आणि
तोंडाला पट्टीच बांधून
असतात जिथे तिथे

दूर चालले आहे की
जवळ हे सारे
जिथे तिथे,
हे महत्त्वाचे नाही आहे

काही दाणे जात्यात
तर काही सुपात
आहेत
जिथे तिथे

निर्भय असण्याच्या आपल्या अधिकाराचे
काय झाले,
जिथे तिथे

इथून तिथून
सारेच फक्त कसे
भयग्रस्त
जिथे तिथे

तरी बरे, कायदा आणि
सुव्यवस्था
उत्तमच आहे
जिथे तिथे

परकीयच आहे म्हणतात ते
कुठलेही स्वकीय, जिथे तिथे
बाकी सारे उत्तमच आहे म्हणतात जिथे
तिथे

येतात कसे ते इथपर्यंत
सारे सारे ओलांडून, जिथे तिथे
कोण आणते, कोण पळवते त्यांना, रक्त
सांडून जिथे तिथे

कोण कोणाला नेमके कशासाठी घाबरवते
आहे
जिथे तिथे, यासाठीच का ही सुरक्षा,
शस्त्र, अस्त्र, अण्वस्त्र, जिथे तिथे

कोणाच्या ताब्यात काय काय आणि
किती किती, जिथे तिथे
तेवढ्यासाठीच मारली जाताहेत का ही
माणसे जिथे तिथे?

**– श्रीपाद भालचंद्र जोशी**

# बुद्ध

मिरवणुका
रॅली
बुद्ध मूर्तींची
स्थापना करून
बुद्ध समजून घेता येईल का ?
परित्राण पाठ
ग्रंथांचं पठन
बुद्धाचा जयघोष
बुद्धाला नमन करून
बुद्ध समजून घेता येईल का ?
शुभ्र वस्त्र
बोधिवृक्षांची पानं
पंचशील ध्वज
शीलाचा धागा
भन्तेंना दान देऊन
बुद्ध समजून घेता येईल का ?
बुद्ध मैत्रीत
बुद्ध करुणेत
बुद्ध निसर्ग सृष्टीत
बुद्ध चराचरात
बुद्ध अंतरंगात
बुद्ध प्रज्ञेत
बुद्ध नालंदा
हा बोधिवृक्ष समजून घेता
येईल का ?
बुद्ध अहिंसेत
बुद्ध क्षमायाचनेत
बुद्ध शीलात
बुद्ध वैश्विक प्रेमात
बुद्ध विज्ञानात
बुद्ध चिकित्सेत
हा मनोशास्त्रज्ञ समजून घेता
येईल का ?
बुद्ध सत्यात
बुद्ध समतेत
बुद्ध कृतीत
बुद्ध चित्तात
बुद्ध उत्तर युद्धाचे
जगाला आज बुद्ध समजून
घेता येईल का ?
उद्ध्वस्त मनात
करुणेची बीजं पेरणारा बुद्ध
लोकशाही शिकवणारा बुद्ध
कबीराच्या फकिराला
श्रीमंत करणारा बुद्ध
शिवबाच्या स्वराज्याचा अर्थ
बुद्ध
तुकारामाच्या गाथेतला विद्रोह
बुद्ध
जोतिबाच्या लेखणीत बुद्ध
बाबासाहेबांच्या समग्र
जीवनात बुद्ध
जीवनाच्या संघर्षशील
गाण्याला
प्रकाशाचे गीत देणारा बुद्ध
अत्त दीप भवची मास्टर की
देणारा
मार्गदाता बुद्ध
भय, भ्रम, मोक्ष, गुलामगिरी,
कर्मकांडातून
मुक्त करणारा बुद्ध
बुद्ध स्वातंत्र्य
बुद्ध बंधुत्व
बुद्ध सामाजिक न्याय
बुद्ध निरागस वात्सल्याचं
प्रतीक
खरंच,
बुद्ध समजून घेता येईल का ?
बुद्ध समजून सांगता येईल
का ?

**– सुधीर इंगळे**

# नाटक

पाच-पाच वर्षांनंतर बदलतात अभिनेते
स्क्रिप्ट बदलते थोडी,
थोडे बदलतात संवाद
रंगमंच तोच,
थोडी रंगरंगोटी बदलते

म्हणावा असा, म्हणावा एवढा
पडत नाही फरक प्रयोगात
तुम्ही पाहा किंवा पाहू नका
तुम्हाला आवडो किंवा न आवडो
प्रयोग सुरूच राहतो
त्यांना गरज वाटत नाही तुम्ही दाद देण्याची
त्यांना वाटत नाही गरज तुमच्या टाळ्यांची
त्यांना वाटत नाही गरज तुमच्या प्रतिक्रियेची
त्यांना कशा कशाचीच वाटत नाही गरज
आणि
प्रयोग सुरूच राहतो
नाटक
तुम्ही पाहात राहायचं फक्त

तुम्ही सामील असूनही सामील नसता या
नाटक नावाच्या खेळात
आणि
आणि
आणि
प्रयोग सुरूच राहतो.

**– डी.के. शेख**

POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2020-22
RNI REG. NO. MAHMAR/2018/76460




Shapoorji Pallonji

# ACHIEVING EXCELLENCE IN INFRASTRUCTURE CONSTRUCTION THROUGH INNOVATION

**Afcons Infrastructure Ltd is part of the Shapoorji Pallonji Group**

- **Six decades of consistently delivering complex projects on, or, ahead of schedule**
- **A leader in Marine, Metro rail and LNG segments in India**
- **Focus areas include Marine works, Highways, Bridges, Railway, Metro, Tunnels, Oil & Gas, LNG terminals**
- **Present in over 25 countries across Asia, Africa and the Middle East**
- **Ranked in top 150 contractors globally; 6th in Marine & Ports and 21st in Bridges (as per latest ENR Survey)**
- **First out of 16 packages to complete overall work (PKG-2) ahead of schedule in Samruddhi Mahamarg project**
- **Completed India's widest road tunnels at Igatpuri (PKG-14) ahead of schedule in Samruddhi Mahamarg project**

**Contact:** Afcons Infrastructure Limited
Afcons House, 16, Shah Industrial Estate, Veera Desai Road,
Azadnagar, Andheri (W), Mumbai – 400 053, India
**Tel No:** +91 (0)22 67191000 **Fax:** +91 (0) 22 2673 0026 / 0047 / 1031
**CIN:** U45200MH1976PLC019335 **Website:** www.afcons.com

AFCONS